**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक – ४३**

**सभावृत्तांत**

दिनांक – २०.४.२०१५ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे एप्रिल-२०१५ ची मासिक मा.महापालिका सभा सोमवार दि.२०.४.२०१५ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर
२. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
३. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
४. मा.भालेकर अरुणा दिलिप
५. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
६. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
७. मा.थोरात वनिता एकनाथ
८. मा.जाधव साधना रामदास
९. मा.जाधव राहुल गुलाब
१०. मा.आल्हाट मंदा उत्तम
११. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१२. मा.काळजे नितीन प्रताप
१३. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१४. मा.जगदीश शेट्टी
१५. मा.बाबर शारदा प्रकाश
१६. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१७. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१८. मा.उल्हास शेट्टी
१९. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
२०. मा.उबाळे सुलभा रामभाऊ
२१. मा.तानाजी विठ्ठल खाडे
२२. मा.बो-हाडे शुभांगी संजय
२३. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर
२४. मा.भारती फरांदे
२५. मा.आर.एस.कुमार
२६. मा.जावेद रमजान शेख

२७. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
२८. मा.पांढरकर निलेश शंकरराव
२९. मा.राजू मिसाळ
३०. मा.नेटके सुमन राजेंद्र
३१. मा.तरस बाळासाहेब जयवंत
३२. मा.भोंडवे संगिता राजेंद्र
३३. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३४. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
३५. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३६. मा.लोंढे गणेश नारायण
३७. मा.शमीम पठाण (पठाणबाई)
३८. मा.†›.संदीप गुलाब चिंचवडे
३९. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
४०. मा.अपर्णा निलेश डोके
४१. मा.अनंत सुभाष को-हाळे
४२. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
४३. मा.पवार मनीषा काळूराम
४४. मा.प्रसाद शेट्टी
४५. मा.अविनाश (दादा) टेकावडे
४६. मा.काळभोर वैशाली जालिंदर
४७. मा.सौ.साळुंके सविता सुरेश
४८. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
४९. मा.मासुळकर समीर मोरेश्वर
५०. मा.वाबळे संजय मल्हारराव
५१. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
५२. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
५३. मा.सुपे आशा रविंद्र
५४. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
५५. मा.मोहिनीताई विलास लांडे
५६. मा.अजित दामोदर गव्हाणे
५७. मा.गोफणे अनुराधा देविदास
५८. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
५९. मा.गव्हाणे सुरेखा शंकर
६०. मा.महेशदादा किसन लांडगे
६१. मा.श्रध्दा बाजीराव लांडे
६२. मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

६३. मा.लोंढे शुभांगी संतोष
६४. मा.ननवरे जितेंद्र बाबा
६५. मा.सावळे सिमा रविंद्र
६६. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
६७. मा.भोसले राहूल हनुमंतराव
६८. मा.पालांडे सुजाता सुनिल
६९. मा.बहल योगेश मंगलसेन
७०. मा.सौ.पानसरे अमिना महंमद
७१. मा.कदम सदगुरु महादेव
७२. मा.कैलास महादेव कदम
७३. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास
७४. मा.टाक अरुण मदन
७५. मा.आसवाणी सविता धनराज
७६. मा.वाघेरे सुनिता राजेश
७७. मा.आसवानी हिरानंद ऊर्फ बब्बू किमतराम
७८. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ
७९. मा.पाडाळे निता विलास
८०. मा.विनोद जयवंत नढे
८१. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
८२. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
८३. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
८४.मा.ओव्हाळ शेखर अशोक
८५. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड
८६.मा.कलाटे स्वाती मयुर
८७. मा.नांदगुडे विलास एकनाथ
८८. मा.चौंधे आरती सुरेश
८९. मा.बोकड रामदास गेणभाऊ
९०. मा.जवळकर वैशाली राहुल
९१. मा.जगताप राजेंद्र गणपत
९२. मा.शितोळे शैलजा बाबुराव
९३. मा.जगताप नवनाथ दत्तु
९४. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
९५. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे
९६. मा.जम सोनाली पोपट
९७. मा.प्रशांत शितोळे
९८. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सन्नी

९९. मा.काटे रोहितअप्पा सुदाम
१००. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
१०१. मा.शेंडगे आशा सुखदेव
१०२. मा.मोटे किरण बाळासाहेब
१०३. मा.संजय केशवराव काटे
१०४. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती
१०५. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब
१०६. मा.पाटील सुजित वसंत
१०७. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.तानाजी शिंदे-अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.कांबळे-प्र.शहर अभियंता, डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.भोसले-मुख्यलेखापाल,मा.गावडे-सह आयुक्त,मा.पाटील,मा.चव्हाण,मा.तुपे-सह शहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.डोईफोडे,मा.गायकवाड,मा.खांडकेकर,मा.दंडवते,मा.दुरगूडे,मा.खोसे -सहा.आयुक्त,मा.पवार-कायदा सल्लागार, मा.सातव-प्र.शिक्षणाधिकारी,मा.निकम, मा.इंगळे, मा.पठाण, मा.कुलकर्णी, मा.बरशेट्टी-कार्य.अभियंता, मा.अष्टीकर-सह.व्यवस्थापकीय संचालक पीएमपीएमएल हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर** - उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका, आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

(१) टाळगाव चिखली येथे "जगदगुरु संत तुकाराम महाराज संतपीठ" स्थापन करणेबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता -

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

(२) मनपा हद्दीतील रिकाम्या झालेल्या विविध ३ जकात नाक्यांच्या जागा बस डेपो/बसस्थानकाचे वापरासाठी पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांना तात्पुरत्या स्वरुपात देणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता -

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----------

**मा.जितेंद्र ननवरे–** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.नगरसेवक, छत्तीसगड रायपूर येथे नक्षलवादी हल्ल्यात शहीद झालेले जवान तसेच ह्रषीकेश मुळगावकर-भारतीय हवाई दलाचे प्रमुख एअर चीफ मार्शल (निवृत्त), बळीराम हिरे-राज्याचे माजी मंत्री, सलिम झकेरीया-राज्याचे माजी मंत्री,विक्रमसिंह घाटगे-सहकार महर्षी माजी आमदार, डॉ.यशवंत सुमंत-ज्येष्ठ विचारवंत, अनितामाई धर्माधिकारी-ज्येष्ठ निरुपणकार डॉ.आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या पत्नी, मुश्ताक अब्दुल रेहमान सय्यद उर्फ बडे भाईजान-प्रसिद्ध उद्योगपती व सामाजिक कार्यकर्ते, सदानंद शेट्टी, सुनील गणेश डोळस, नंदा सुधाकर डोळस, राजेश काशिनाथ भोईर, द्रौपदाबाई सोनवणे यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.कैलास थोपटे -** मा.महापौर साहब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर** – श्रध्दांजली वाहणेसाठी सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**मा.तानाजी खाडे** – मा.महापौर साहेब, सभा बुधवार दिनांक १३/५/२०१५ रोजी दुपारी २.०० वा. पर्यंत तहकूब करणेत यावी अशी सूचना मांडतो.

**मा.नारायण बहिरवाडे** – मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन देतो.

**मा.महापौर –** सर्व सदस्यांच्या संमतीप्रमाणे बुधवार दिनांक १३/५/२०१५ रोजी दुपारी २.०० पर्यंत सभा तहकूब करण्यात येत आहे.

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक – ४३

## सभावृत्तांत

**(दि.२०/४/२०१५ ची तहकूब सभा )**

दिनांक – १३.५.२०१५ वेळ – दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची (माहे एप्रिल-२०१५) दि.२०.४.२०१५ ची तहकूब मा.महापालिका सभा बुधवार दि.१३.५.२०१५ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर
२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
९. मा.जाधव साधना रामदास
१०. मा.जाधव राहुल गुलाब
११. मा.आल्हाट मंदा उत्तम
१२. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१३. मा.काळजे नितीन प्रताप
१४. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१५. मा.जगदीश शेट्टी
१६. मा.बाबर शारदा प्रकाश
१७. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१८. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१९. मा.उल्हास शेट्टी
२०. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
२१. मा.पवार संगीता शाम
२२. मा.उबाळे सुलभा रामभाऊ
२३. मा.बो-हाडे शुभांगी संजय
२४. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२५. मा.भारती फरांदे
२६. मा.आर.एस.कुमार
२७. मा.नेटके सुमन राजेंद्र
२८. मा.तरस बाळासाहेब जयवंत
२९. मा.मोरेश्वर महादू भोंडवे
३०. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
३१. मा.शमीम पठाण (पठाणबाई)
३२. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
३३. मा.अपर्णा निलेश डोके
३४. मा.अनंत सुभाष को-हाळे
३५. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे
३६. मा.जयश्री वसंत गावडे
३७. मा.प्रसाद शेट्टी
३८. मा.अविनाश (दादा) टेकावडे
३९. मा.काळभोर वैशाली जालिंदर
४०. मा.शेख अस्लम शैकत
४१. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
४२. मा.मासुळकर समीर मोरेश्वर
४३. मा.वाबळे संजय मल्हारराव
४४. मा.मडिगेरी वर्षा विलास
४५. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग
४६. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
४७. मा.गोफणे अनुराधा देविदास
४८. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
४९. मा.महेशदादा किसन लांडगे
५०. मा.श्रध्दा बाजीराव लांडे
५१. मा.†›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
५२. मा.लोंढे शुभांगी संतोष
५३. मा.विश्वनाथ विठोबा लांडे
५४. मा.ननवरे जितेंद्र बाबा
५५. मा.सावळे सिमा रविंद्र
५६. मा.भोसले राहूल हनुमंतराव
५७. मा.पालांडे सुजाता सुनिल
५८. मा.बहल योगेश मंगलसेन
५९. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद
६०. मा.कदम सदगुरु महादेव

६१. मा.गिता सुशील मंचरकर
६२. मा.कैलास महादेव कदम
६३. मा.छाया जगन्नाथ साबळे
६४. मा.टाक अरुण मदन
६५. मा.आसवाणी सविता धनराज
६६. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम
६७. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)
६८. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ
६९. मा.काळे विमल रमेश
७०. मा.पाडाळे निता विलास
७१. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र
७२. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे
७३. मा.विमलताई सुरेश जगताप
७४. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
७५. मा.ओव्हाळ शेखर अशोक
७६. मा.यमुनाताई रमणनाना पवार
७७. मा.कलाटे स्वाती मयुर
७८. मा.चौंधे आरती सुरेश
७९. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे
८०. मा.बोकड रामदास गेणभाऊ
८१. मा.जवळकर वैशाली राहुल
८२. मा.जगताप राजेंद्र गणपत
८३. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
८४. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे
८५. मा.जम सोनाली पोपट
८६. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
८७. मा.काटे रोहितअप्पा सुदाम
८८. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
८९. मा.शेंडगे आशा सुखदेव
९०. मा.मोटे किरण बाळासाहेब
९१. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण
९२. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती
९३. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब
९४. मा.पाटील सुजित वसंत
९५. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.राजीव जाधव-आयुक्त,मा.तानाजी शिंदे-अतिरिक्त आयुक्त,मा.उल्हास जगताप-नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.कांबळे-प्र.शहर अभियंता, मा.ठाकुर-उपसंचालक नगररचना, मा.भोसले-मुख्यलेखापाल, मा.गावडे-सहआयुक्त, मा.पाटील,मा.तुपे-सहशहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.डॉ.साळवे-अति.वैद्यकीय अधिकारी, मा.डोईफोडे, मा.कडुसकर, मा.माने, मा.दंडवते, मा.दुरगुडे, खोसे-सहा.आयुक्त, मा.पवार-कायदा सल्लागार, मा.दुधेकर, मा.सवणे,मा.इंगळे,मा.साळवी,मा.पठाण, मा.पिरजादे, मा.बरशेट्टी, मा.गलबले, मा.केदारी- कार्य. अभियंता,मा.इंदलकर-कामगार कल्याण अधिकारी,मा.बोदडे-प्रशासन अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

**मा.महापौर** - उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका,आयुक्त,अधिकारी वर्ग,पत्रकार,नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.उल्हास शेट्टी** - मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.नगरसेवक, नेपाळ येथील भूकंपामध्ये मृत्यूमुखी पडलेले नागरीक तसेच अरुणाराजे भोसले-अजिंक्यतारा महिला सहकारी बँकेच्या संस्थापिका,शांताबाई मोडक-ज्येष्ठ अभिनेत्री, निनाद बेडेकर-ज्येष्ठ इतिहास संशोधक, बिंदुमाधव जोशी-ग्राहक पंचायतीचे संस्थापक,अशोक पाटोळे-ज्येष्ठ लेखक,संजय राणे व महेंद्र देसाई-मुंबई अग्निशमन दलाचे आगीमध्ये शहिद झालेले अधिकारी यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.जितेंद्र ननवरे -** मा.महापौर साहब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर** – श्रध्दांजली वाहणेसाठी सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

---------

मा.महापालिका सभा क्रमांक – ४० दिनांक २०/२/२०१५ व २६/२/२०१५ (दु.२.०० व २.४५) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले. .

---------

**मा.नगरसचिव –** प्रश्नोत्तरे-माहे एप्रिल-२०१५ चे मा.महापालिका सभेमध्ये मा.माया बारणे यांना विचारावयाचे प्रश्न.

**मा.महापौर** – प्रश्न विचारणारे सदस्य मा.माया बारणे या सभागृहात हजर नसल्याने त्यांचे प्रश्न वगळणेत येत आहेत.

---------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – १
दिनांक – १३/५/२०१५ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ :-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आप/७/कावि/१२/१५ दि.१६/१/२०१५
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र. १११८३ दि.३१/३/२०१५

सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षाकरिता आकाशचिन्ह जाहिरात कर व जागा भाडे आकारणी दर निश्चित करताना महानगरपालिकेचे उत्पन्नातील समतोल राखणेचे हेतूने जाहिरात कराचे दरात परिशिष्ठ अ प्रमाणे व जागा भाडे दरात परिशिष्ठ ब मध्ये नमूद केलेप्रमाणे दरनिश्चित प्रस्तावित करणेची मा.आयुक्त यांची मागणी असलीतरी प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार सन २०१४-१५ चे जाहीरात कर व जागा भाड्याचे दर सन २०१५-१६ साठी कायम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, सदर ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.मंदाकिनी ठाकरे–** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा अशी सूचना मांडते.

**मा.भारती फरांदे** – मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ६७२ विषय क्रमांक - १
दिनांक - १३/०५/२०१५ विभाग - मा.आयुक्त

संदर्भ :-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.आप/७/कावि/१२/१५ दि.१६/१/२०१५
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र. १११८३ दि.३१/३/२०१५

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – २

दिनांक – १३/५/२०१५ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ –१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. स्थापत्य BSUP प्र/७१/२०१५, दिनांक – २४/०२/२०१५

२) मा.शहरसुधारणा समिती सभा ठराव. क्र.४६ दि.४/३/२०१५

३) मा.महापालिका सभा ठ.क.६६२ दि.६/४/२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिके मार्फत JnNURM – BSUP अंतर्गत शहरात खालील ठिकाणी झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प राबविण्यात येत आहेत. १) से.क्र. २२ निगडी, २) अजंठानगर, ३) मिलिंदनगर, ४) वेताळनगर, ५) उद्योगनगर व ६) पत्राशेड, लिंक रोड उपरोक्त प्रकल्पांची माहिती खालीलप्रमाणे.

**अ) सेक्टर क्र.२२ निगडी झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प**

से.क्र.२२ निगडी येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प हा संरक्षण खात्याच्या रेड झोन च्या हद्दीमध्ये येत असल्याने सदरबाबत मा. उच्च न्यायालयमुंबई येथे क्र. १८०६/२०११ अन्वये याचिका दाखल करण्यात आलेली आहे. सदर याचिकेस अनुसरुन मा. उच्च न्यायालय, यांनी सेक्टर क्र.२२ निगडी येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पास दि. १२/०४/२०१२ रोजी स्थगिती दिलेली असून सदरच्या स्थगिती आदेशापासुन प्रकल्पाचे काम आहे त्या स्थितीत बंद करण्यात आलेले आहे. सदर प्रकल्पाबाबत वेळोवेळी सुनावणी झालेली असून अद्यापपर्यंत निर्णय झालेला नाही.

सुनावणीच्या तारखा :- १०/०३/२०११,०२/०२/२०१२, १९/०३/२०१२, ३०/०३/२०१२, १२/०४/२०१२, १८/१०/२०१२, २१/११/२०१२, २३/११/२०१२, १४/०१/२०१३, २५/०२/२०१३, १६/०४/२०१३, ०८/०७/२०१३, ०२/१२/२०१३, १३/०२/२०१४, ११/०६/२०१४, ११/०९/२०१४, ०२/१२/२०१४.

दरम्यान, विषयांकित प्रकल्पाचे ठेकेदार यांनी प्रकल्प आहे त्या स्थितीत बंद करण्याची मागणी करुन विविध Claims सादर केलेले आहेत (सोबत ठेकेदारांची पत्रे अवलोकनार्थ). सदर याचिकेवर निर्णय झाल्यानंतर याबाबत विचार करता येईल असे वेळोवेळीच्या बैठकीत ठेकेदारांना सांगण्यात येत होते. तथापि, सदर दाव्याची न्यायालयामध्ये सुनावणी होऊन दाव्याचा अंतिम निर्णय कधी लागेल याबाबत निश्चित अशी कालमर्यादा नाही. स्थगिती आदेशापासून प्रकल्पाची कामे पूर्णत: बंद आहे. सदरची कामे बंद असल्याने ठेकेदारांचे Claims मध्ये वाढच होत आहे. या पार्श्वभुमीवर सेक्टर क्र.२२ निगडी येथील प्रकल्प आहे त्या स्थितीत सिमीत (Curtailment) करणे योग्य राहील. प्रकल्पसिमीत करणे याकामी खालील बाबींचा विचार व्हावा.

१) मा. उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, MHADA यांनी त्यांचे पत्र क्र.एमएच/

मुअ-१/परीपत्रके/नक्र.१४८/२०१३ दि.१८/०६/२०१३ नुसार मनपाकडे अखर्चित पडून असलेल्या निधीवर ९.५ % दराने व्याज आकारुन ते केंद्रशासनाकडे परत करणे आवश्यक आहे असे कळविले आहे. सदर पत्राची छायांकित प्रत सादर करण्यात आलेली आहे.

२) से.क्र.२२ निगडी येथील प्रकल्पाच्या कामास मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी मनाई आदेश दिलेला असून सदरबाबत वारंवार सुनावण्या झालेल्या असून अद्यापपर्यंत कोणताही निर्णय झालेला नाही. सदर प्रकल्पाचे ठेकेदार Claims मागणीबाबत पत्रव्यवहार करत असून त्यांच्या Claims मध्ये दिवसेंदिवस वाढच होत आहे. वरील सर्व बाबींचा विचार करता से.क्र.२२ निगडी येथील प्रकल्प आहे त्या स्थितीत थांबविणेत यावा किंवा कसे याबाबत मा.डॉ. श्री. ए.के. मिश्रा, सचिव, Ministry of Housing & Urban Poverty Alleviation, Government of India यांना क्र.CivilBSUP/56/2014 दि.१५/०२/२०१४ रोजी पत्र पाठविण्यात आलेले असून सदरबाबत अभिप्राय मागविणेत आलेला होता.

३) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत से.क्र.२२ निगडी येथील प्रकल्प सिमीत करण्याबाबत क्र.CivilBSUP/56/2014 दि.१५/०२/२०१४ च्या पत्रान्वये मागविलेल्या अभिप्रायास अनुसरुन मा. श्री जॉयदेव प्रामाणिक, समन्वयक JnNURM& RAY Government Of India यांनी JnNURM अंतर्गत राबविण्यात येत असलेले प्रकल्प दि. ३१/०३/२०१५ पूर्वी पुर्ण करावयाचे आहेत. प्रकल्पासाठीची जागा, न्यायालयाची स्थगिती, लाभार्थ्यांचे प्रश्न इ. कारणांसाठी रखडलेला अथवा बंद असलेला प्रकल्प आहे त्या स्थितीत सिमीत करण्यात यावा. तसेच प्रकल्पासाठी देण्यात आलेल्या निधीपैकी न वापरलेला निधी Government Of India यांच्याकडे जमा करणेबाबत त्याचे दि. २४/०३/२०१४ चे पत्रानुसार कळविलेले असून सदर पत्राची प्रत सोबत जोडलेली आहे. JnNURMयोजनेअंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पासाठी केंद्रशासन व राज्यशासन यांच्यामार्फत मनपास निधी प्राप्त झालेला आहे. सदर निधी मनपाच्या खात्यावर जमा असून त्यावरील व्याज मनपाच्या खात्यावर जमा होत आहे.

४) Central sanctioning & Monitoring Committee of Ministry of Housing and Urban Poverty Alleviation (CSMC) कडील दि. ११/११/२०१४ रोजी झालेल्या १५८ व्या मिटींगमध्ये मिलिंदनगर, वेताळनगर, अजंठानगर, उद्योगनगर, लिंक रोड पत्राशेड व से.क्र.२२ निगडी येथील प्रकल्पामधील बांधकामास सुरुवात न केलेल्या सदनिका सिमीत करण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला असल्याबाबत उप मुख्य अभियंता, JnNURM, MHADA यांनी दि.०८/१२/२०१४ च्या email द्वारेकळविलेले आहे. सदरच्या Minutes of Meeting व email ची प्रत सोबतअवलोकनार्थ जोडलेली आहे.

५) मा. मुख्य अभियंता -२, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण यांनी बीसएसयुपी / आयएचएसडीपी अंतर्गत अद्यापही काम सुरु न झालेली घरकुले प्रकल्पातून वगळून सिमीत करण्याचा प्रस्तावसादर करणेविषयी त्यांचेकडील पत्र क्र. एमएच/मुअ-

२/उमुअ/काअ-२/जे/प्रा./न.क्र.२४/१५७२/१४ दि.१५/१२/२०१४ च्या पत्रान्वये कळविलेले आहे. सदर पत्राची प्रत सोबत अवलोकनार्थ जोडली आहे.

६) से.क्र.२२ निगडी येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील ठेकेदार मे. बी.जी.शिर्के व इतर यांनी सदरचा प्रकल्प सिमीत करण्याबाबत मागणी केलेली आहे. सदरची कामे बंद असल्याने ठेकेदाराच्या Claims मध्ये दिवसेंदिवस वाढच होत आहे. त्यामुळे "निविदा अटी व शर्ती CSD Volume – I Clause No.59 Pg. No. 53 &54 नुसार प्रकल्प आहे त्या स्थितीत सिमीत करणेबाबत प्रकल्पाचे सल्लागार श्री. मोहन साखळकर, मे. ओमकार क्रिएशन्स JVयांनी त्यांचेकडील पत्र क्र. OC/PCMC/14-15/50 दि.२७/०५/२०१४ च्या पत्रान्वये अभिप्राय दिलेला आहे. सदर पत्राची छायांकित प्रत सोबत जोडलेली आहे.

७) से.क्र.२२ निगडी येथील प्रकल्प आहे त्या स्थितीत सिमीत करणे आवश्यक असून यात फक्त सर्वार्थाने पुर्ण झालेल्या इमारतींचाच अंतर्भाव करणे योग्य राहील. सदर प्रकल्पातील अर्धवट बांधकाम अवस्थेत असलेल्या इमारती अपुर्ण इमारती मार्च २०१५ पूर्वी पुर्ण करणे अवघड आहे तसेच मा. उच्च न्यायालयाकडे सदर प्रकल्पाबाबत दाखल केलेल्या याचिकेवर निर्णय नंतर कधी लागेल याबाबतही सद्यस्थितीत निश्चित असा कालावधीचा अंदाज करता येत नाही.

८) भविष्यात अपुर्ण इमारतीसह उर्वरीत राहिलेल्या इमारतींचे बांधकाम करावयाचे झाल्यास म.न.पा.स केंद्रशासन (GOI) व राज्यशासन (GOM) कडून हिस्सा मिळणार नाही. बांधकाम साहित्यामध्ये भाववाढ होणार, त्यामुळे सदर इमारतींचे बांधकाम पूर्ण करणेसाठी नव्याने निविदा काढाव्या लागतील. नव्याने काढण्यात आलेल्या निविदांचे दरही त्यावेळच्या प्रचलित D.S.R. नुसार दर जास्त येतील व हा सर्व भार मनपास उचलावा लागेल.

वरील सर्व बाबींचा विचार करता सदरचा प्रकल्प आहे त्या स्थितीत सिमीत करण्यात यावा व केंद्रशासन व राज्यशासन यांचेकडून प्रकल्पासाठी प्राप्त झालेला निधी पैकी न वापरलेला निधी व्याजासह परत करणेत यावे असे या विभागाचे मत आहे.

**ब) लिंक रोड पत्राशेड ६७२ सदनिका**

लिंक रोड पत्राशेड चिंचवड येथे JnNURM – BSUP योजनेअतंर्गत झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प राबविणेत येत असून सदर प्रकल्पांतर्गत ६ इमारतींचे बांधकाम प्रस्तावित आहेत. सदर ६ इमारतींपैकी ५ इमारतींची बांधकाम पूर्ण झालेली असून १ इमारतीचे बांधकाम होणे बाकी आहे. सदर प्रकल्पाच्या जागेबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे क्र. ७४/२०१३ अन्वये जनहित याचिका दाखल करण्यात आलेली आहे. सदर प्रकल्पास मा. उच्च न्यायालयाने दि. ०९/०७/२०१४ रोजी लिंक रोड पत्राशेड येथील बांधकाम पूर्ण झालेल्या इमारतीमधील सदनिकांचे लाभार्थ्यांना वाटप न करण्याचे आदेश दिलेले असून प्रकल्पास स्थगिती दिलेली आहे. सद्यस्थितीत ५ इमारतींचे बांधकाम पूर्ण असून न्यायालयाच्या आदेशामुळे सदर इमारतींचा लाभार्थ्यांना ताबा देता येत नाही. उर्वरित एका इमारतीचे बांधकामासाठी स्वतंत्र निविदा काढून इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत न्यायालयाने आदेश दिलेले आहेत. सदर कामाबाबत मनपामार्फत निविदा प्रसिध्द करण्यात आलेली असून निविदा प्रक्रिया चालू आहे.

JnNURMकामांचा Mission Period मार्च २०१५ अखेर संपत असल्यामुळे सदर इमारतीचे काम Mission Period च्या निर्धारीत कालावधीमध्ये होणार नाही. सदर प्रकल्पातील एका इमारतीचे बांधकाम केल्यास उर्वरित पात्र लाभार्थ्यांना इमारतीचा ताबा देता येणार आहे. प्रकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टीने सदर इमारतीचे काम होणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर इमारतीसाठी लागणारा खर्च हा महानगरपालिकेच्या निधीमधून करावा लागणार आहे.

**क) मिलिंदनगर, वेताळनगर, अजंठानगर, विठ्ठलनगर व उद्योगनगर येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प**

JnNURM – BSUP योजनेअंतर्गत महापालिकेमार्फत मिलिंदनगर, वेताळनगर, अजंठानगर, विठ्ठलनगर व उद्योगनगर येथे झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प राबविण्यात येत आहे. झोपडपट्टीतील झोपडी धारकांचे सर्वेक्षण करणे, बायोमेट्रीक करणे, पात्र लाभार्थी ठरविणे, सोसायट्यांचे सोडत काढणे, पात्र लाभार्थ्यांचे रजिस्ट्रेशन करणे, बँक लोन प्रकरणे मंजूर करणे तसेच इतर प्रशासकीय कामे महानगरपालिकेच्या झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभागामार्फत करण्यात येतात. सदरचे सर्व प्रकल्प हे Insituप्रकल्प असून इमारतीचे बांधकाम करावयाच्या जागेवरील झोपड्या काढून सदर जागेवरील झोपडी धारकास मनपामार्फत बांधलेल्या पत्राशेड (Transit Camp) मध्ये हलविण्यात येते. सदरच्या झोपड्या काढून मोकळ्या झालेल्या जागेवर इमारती बांधून पात्र झोपडपट्टी धारकांना बांधण्यात आलेल्या इमारतींमध्ये ताबा देण्यात येतो.

मिलिंदनगर, वेताळनगर, अजंठानगर, विठ्ठलनगर,उद्योगनगर, से.क्र.२२ निगडी व लिंक रोड पत्राशेड या प्रकल्पांच्या ठेकेदारास कामाचे आदेश दिलेले आहेत. सदर प्रोजेक्टनुसार संबंधित ठेकेदारांना दिलेल्या कामाचे आदेशाची माहिती पुढीलप्रमाणे...

| अ. क्र. | ठेकेदाराचे नांव | प्रकल्पाचे नांव | कामाचा आदेश दिनांक | बांधकाम करावयाच्या एकूण इमारती | एकूण सदनिका |
|---|---|---|---|---|---|
| १ | मे.इंदु प्रोजेक्टस् लि. | विठ्ठलनगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | १४/१२/२००७ | १३ | १४५६ |
| | | अजंठानगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | १४/१२/२००७ | १३ | १४५६ |
| | | वेताळनगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | १४/१२/२००७ | १२ | १३४४ |
| | | उद्योगनगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | १४/१२/२००७ | ०४ | ४४८ |
| २ | मे. बी.जी. शिर्के | लिंक रोड पत्राशेड झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | १८/०२/२०१० | ०६ | ६७२ |
| ३ | मे. IVRCL | मिलिंदनगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | ११/१२/२००७ | ११ | १२३२ |
| ४ | मे.प्रतिभा | से.क्र.२२ निगडी झोपडपट्टी | १४/१२/२००७ | ५७ | ४५६० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | कन्स्ट्रक्शन | पुनर्वसन प्रकल्प (पॅकेज ५ व ६) | | | |
| ५ | मे. बी.जी. शिर्के | से.क्र.२२ निगडी झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प (पॅकेज क्र. ७ व ८) | ११/१२/२००७ | ६१ | ४८८० |
| ६ | मे. IVRCL | से.क्र.२२ निगडी झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प(पॅकेज क्र. ९) | ११/१२/२००७ | २९ | २३२० |
| | | | **एकुण** | २०६ | १८३६८ |

सदर प्रकल्पासाठी D.P.R रकमेवर GOI कडून ५०% व GOM कडून ३०% याप्रमाणे मंजूर निधी व प्राप्त निधीची माहिती पुढील प्रमाणे...

| **अ.क्र.** | **प्रकल्पाचे नांव** | **प्रकल्पासाठी GOI कडील निधी** | | **प्रकल्पासाठी GOM कडील निधी** | | **शेरा** |
|---|---|---|---|---|---|---|
| | | मंजूर निधी | प्राप्त निधी | मंजूर निधी | प्राप्त निधी | |
| १ | विठ्ठलनगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | १६.३० | १६.४४ | ९.१४ | ९.४८ | |
| २ | अजंठानगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | १६.०५ | १२.१५ | ९.०३ | ७.०५ | |
| ३ | वेताळनगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | १५.१५ | १६.३९ | ८.४२ | ९.४४ | |
| ४ | उद्योगनगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | ५.१२ | ६.८४ | २.८३ | ३.९६ | |
| ५ | लिंक रोड पत्राशेड झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | १२.८९ | ९.६६ | ७.७३ | ५.६१ | |
| ६ | मिलिंदनगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | १३.६९ | १४.३७ | ७.६४ | ८.३१ | |
| ७ | से.क्र.२२ निगडी झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प (पॅकेज५ व ६) | ४५.२२ | ३३.९२ | २९.८५ | २०.२७ | |
| ८ | से.क्र.२२ निगडी झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प (पॅकेज क्र.७व ८) | ४५.२२ | ४५.२२ | २९.८५ | २७.०३ | |
| ९ | से.क्र.२२ निगडी झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प (पॅकेज क्र. ९) | १६.७७ | १६.७७ | ११.०७ | १०.०३ | |
| | **एकुण** | १८६.४१ | १७१.७६ | ११५.५६ | १०१.१८ | |

सदर प्रकल्पांतर्गत प्रोजेक्टप्रमाणे सद्यस्थिती खालील प्रमाणे.....

| **प्रकल्पाचे नांव** | **प्रकल्पानुसार मंजूर सदनिका (Revised D.P.R.)(इमारती)** | **लाभार्थ्यांना हस्तांतरित सदनिका (इमारती)** | **हस्तांतरणासाठी तयार सदनिका (इमारती)** | **प्रगतिपथावरील सदनिका (इमारती)** | **सिमीत करावयाच्या सदनिका** |
|---|---|---|---|---|---|
| विठ्ठलनगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | १४५६ (१३) | ११२० (१०) | ३३६ (०३) | ० | ० |
| अजंठानगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | १४५६ (१३) | ४४८ (०४) | ३३६ (०३) | ० | ६७२ (०६) |
| वेताळनगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | १३४४ (१२) | ४४८ (०४) | ११२ (०१) | ४४८ (०४) | ३३६ (०३) |
| उद्योगनगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | ४४८ (०४) | ० | ० | ० | ४४८ (०४) |
| लिंक रोड पत्राशेड झोपडपट्टी पुनर्वसनप्रकल्प | ६७२ (०६) | ० | ५६० (०५) | ० | ११२ (०१) |
| मिलिंदनगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | १२३२ (११) | २२४ (०२) | ११२ (०१) | २२४ (०२) | ६७२ (०६) |
| से.क्र.२२ निगडी झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प (पॅकेज ५ व ६) | ४९६० (६२) | १०४० (१३) | २४० (०३) | ० | ३६८०(४६) |
| से.क्र.२२ निगडी झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प(पॅकेज क्र. ७ व ८) | ४९६० (६२) | १२८० (१६) | १६० (०२) | ४८० (०६) | ३०४० (३८) |
| से.क्र.२२ निगडी झोपडपट्टी पुनर्वसनप्रकल्प (पॅकेज क्र. ९) | १८४० (२३) | ४८० (०६) | २४० (०३) | ० | ११२० (१४) |
| **एकुण** | १८३६८ | ५०४० | २०९६ | ११५२ | १००८० |

**टिप –** १) से.क्र.२२ निगडी येथील प्रकल्पामध्ये एका इमारतीत (G+4) ८० सदनिका आहेत.

२) मिलिंदनगर, विठ्ठलनगर, अजंठानगर, वेताळनगर, उद्योगनगर, लिंक रोड पत्राशेड येथील प्रकल्पामध्ये एका इमारतीत (P+7) ११२ सदनिका आहेत.

सदरच्या आदेशानुसार त्या त्या झोपडपट्ट्यांच्या जागेवर ठेकेदारांमार्फत इमारतींचे बांधकाम सुरु करण्यात आले व काही इमारतींचे बांधकाम पूर्णही झाले परंतु झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभागाकडील पात्र लाभार्थी ठरविणे व इतर प्रशासकीय बाबी पूर्ण करणेसाठी बराच कालावधी लागला. त्यामुळे नियोजित वेळेमध्ये बांधण्यात आलेल्या इमारतींचा पात्र लाभार्थ्यांना ताबा देता आला नाही. सदरच्या कारणांमुळे वरील प्रकल्पांचे काम पूर्ण करणेस विलंब झाला. उद्योगनगर प्रकल्पातील इमारतींचे बांधकाम करणेसाठी जागा उपलब्ध झाली नसल्यामुळे सदर प्रकल्पातील इमारतींचे बांधकाम सुरु करता आलेले नाही.

JnNURMकामांचा Mission Period मार्च २०१५ अखेर संपत असल्यामुळे सदर प्रकल्पातील राहिलेल्या इमारतींचे काम Mission Period च्या निर्धारीत कालावधीमध्ये पूर्ण होणे शक्य नाही.त्यामुळे सदर प्रकल्पातील राहिलेल्या इमारतींचे बांधकाम हाती न घेण्याबाबत निर्णय होणे आवश्यक आहे. प्रकल्पांचे काम सुरु होऊन ७ वर्ष कालावधी झालेला असून वेळोवेळी ठेकेदारास मुदतवाढ दिलेली असल्याने भाववाढीच्या खर्चातही (Escalation Cost) दिवसेंदिवस वाढत आहे.

- सदर प्रकल्पासाठी आतापर्यंत झालेल्या खर्चाची माहिती पुढीलप्रमाणे...

| **प्रकल्पाचे नांव** | **R.A Bills** | **Escalation** | **एकुण** |
|---|---|---|---|
| विठ्ठलनगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | ५९.१९६ | ८.६१६ | ६७.८१२ |
| अजंठानगर व उद्योगनगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | १७.८७६ | २.९६९ | २०.८४५ |
| वेताळनगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | ३१.३९४ | ७.७७१ | ३९.१६५ |
| लिंक रोड पत्राशेड झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | २१.०७ | ५.६३६ | २६.७०६ |
| मिलिंदनगर झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | २४.७६९ | ६.४२५ | ३१.१९४ |
| से.क्र.२२ निगडी झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प (पॅकेज ५ व ६) | ४६.३५५ | ७.१२३ | ५३.४७८ |
| से.क्र.२२ निगडी झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प(पॅकेज क्र. ७ व ८) | ५७.९०२ | ८.२३१ | ६६.१३३ |
| से.क्र.२२ निगडी झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प(पॅकेज क्र. ९) | २८.९९६ | ४.२५५ | ३३.२५१ |
| **एकुण** | २८७.५५८ | ५१.०२६ | ३३८.५८४ |

**प्रकल्प वेळेत पूर्ण न होण्याची कारणे पुढील प्रमाणे –**

१) से.क्र.२२ निगडी येथील प्रकल्पाचे बांधकाम संरक्षण खात्याच्या Red Zone हद्दीमध्ये येत असल्याने सदर बाबत मा. उच्च न्यायालयामध्ये दावा दाखल करण्यात आलेला आहे. सदर दाव्याबाबत न्यायालयाकडील निर्णय प्रलंबित आहे.

२) लिंक रोड पत्राशेड येथील प्रकल्पाच्या जागेबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका दाखल करण्यात आलेली असून सदर याचिकेवर न्यायालयाकडील निर्णय प्रलंबित आहे.

३) JnNURM – BSUP या योजनेअंतर्गत राबविण्यात येत असलेल्यामिलिंदनगर, विठ्ठलनगर, अजंठानगर, वेताळनगर, उद्योगनगर व से.क्र.२२ निगडी येथील प्रकल्पांसाठी Environment Clearance व Consent to Operate मिळणेसाठी बराच कालावधी लागला.

४) इमारतीतील पात्र ११२ लाभार्थ्यांची सोसायटी करण्यास होणारा विलंब.

५) सोसायटी तयार झालेनंतर लाभार्थ्यांचे बँक खाते काढणे, लाभार्थींना स्वहिस्सा भरणेकरिता बँक लोन करणे तसेच बँक लोन मंजूर होणेकामी संबंधित बँकांकडून होणारा विलंब.

६) कामाचे आदेशानुसार नियोजित कालावधीमध्ये इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेले परंतु पात्र लाभार्थ्यांना इमारतीचा ताबा देण्याबाबत महानगरपालिकेच्या झोपडपट्टी निर्मुलन व पुनर्वसन विभागाकडून प्रशासकीय बाबींची पूर्तता विहित मुदतीत झाली नसल्याने बांधकाम पूर्ण झालेल्या इमारतींचा ताबा लाभार्थ्यांना वेळेत देता आला नाही.

७) इमारतींचा ताबा वेळेत न दिल्या गेल्याने पुढील इमारतींचे बांधकामासाठी जागा (Site) उपलब्ध झाली नाही त्यामुळे पुढील इमारतींचे बांधकाम करता आलेले नाही.

वरील सर्व बाबींचा विचार करता मिलिंदनगर, वेताळनगर, अजंठानगर व लिंक रोड पत्राशेड येथील प्रकल्पातील सुरु असलेल्या इमारतीचे बांधकाम पूर्ण करुन उर्वरित इमारतींचे बांधकाम न करता तसेच से.क्र.२२ निगडी येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील अपूर्ण अवस्थेत असलेल्या इमारतींचे बांधकाम आहे त्या स्थितीत सिमीत (Curtailment) करणेत यावा असे या विभागाचे मत आहे.सदरबाबत याप्रमाणे निर्णय झाल्यास केंद्रशासन (GOI) व राज्यशासन (GOM) यांचेकडून प्रकल्पासाठी प्राप्त झालेल्या निधीची उर्वरीत रक्कम व्याजासह परतावा करणे आवश्यक आहे.

| **प्रकल्पाचे नांव** | **प्रकल्पानुसार मंजूर सदनिकांची संख्या** | **लाभार्थ्यांना हस्तांतरित सदनिका (इमारती)** | **हस्तांतरणा साठी तयार सदनिका (इमारती)** | **प्रगतिपथा वरील सदनिका (इमारती)** | **सिमीत करावयाच्या सदनिका** |
|---|---|---|---|---|---|
| विठ्ठलनगर, अजंठानगर, वेताळनगर, उद्योगनगर, लिंक रोड पत्राशेड, मिलिंदनगर, से.क्र.२२ निगडी (पॅकेज ५, ६,७,८ व ९), झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प | १८३६८ | ५०४० | ११५२ | १४७२ | १००८०** |
| **एकुण** | १८३६८ | ५०४० | ११५२ | १४७२ | १००८० |

****टिप –** सिमीत करावयाच्या एकूण १००८० सदनिकांपैकी ७८४० सदनिका ह्या से.क्र.२२, निगडी येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील आहेत.

तरी उपरोक्त सर्व बाबी लक्षात घेता से.क्र.२२ निगडी, मिलिंदनगर, वेताळनगर, अजंठानगर व उद्योगनगर व लिंक रोड पत्राशेड येथील प्रकल्प आहे त्या स्थितीत सिमीत करणे योग्य राहील तसेच केंद्रशासन व राज्यशासन यांना प्रकल्पासाठी प्राप्त झालेल्या निधीची उर्वरीत रक्कम नियमानुसार परतावा करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, सदर ठरावास मी अनुमोदन देते.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सदस्य, मी विनंती करते की, आमच्या माहितीप्रमाणे आज केंद्र सरकारकडून या प्रकल्पाला दोन वर्षांची मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात येतो आहे. मुदतवाढ मिळणार असेल तर आपण हा विषय मागे घ्यावा अशी विनंती राहील. आयुक्त साहेबांनी याबाबत खुलासा करावा व हा विषय मागे घ्यावा.

**मा.महापालिका आयुक्त** – मा.महापौर साहेब, सर्व सन्मा. सदस्य, आत्ताच सन्मा.सदस्यांनी जी काही माहिती दिलेली आहे ती मी सभागृहाला सांगू इच्छितो की, ती खरी आहे, योग्य आहे. मा.केंद्र शासनाने जेएनएनयूआरएम योजनेअंतर्गत बीएसयुपी व ईडब्ल्यूएस या दोन योजनांसाठी दि.३१/३/२०१७ पर्यंत दोन वर्षांची मुदतवाढ दिली आहे. म्हणून माझी मा.महापौर साहेब व सभागृह यांना विनंती आहे की, पूर्वी जो विषय मांडला होता तो केंद्र शासनाच्या सूचनेप्रमाणेच मांडला होता. केंद्र शासनाने मुदतवाढ दिली असल्यामुळे हा विषय मागे घेऊ इच्छितो. कृपया सभागृहाने त्याला परवानगी द्यावी.

**मा.सिमा सावळे** – मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सदस्य,प्रथमतः केंद्र शासनाचे मनापासून अभिनंदन करेन की त्यांनी दोन वर्षांची मुदतवाढ दिली आहे. मुदतवाढ मिळणारच होती त्याचबरोबर नवीन नावाने योजना सुद्धा येणार आहे. हरकत नाही. आत्ता उशीरा का होईना मुदतवाढ मिळाली आहे. मुदतवाढ मिळाल्यानंतर तरी किमान कायद्याला धरुन काम करावे अशी प्रामाणिक अपेक्षा करते. खरेतर अशा प्रकारचा विषय सभागृहापुढे येणे हा तुमचा,माझा,या शहराचा अपमान आहे. गेले चार महापालिका सभा झाल्या. आम्ही या विषयावर बोलण्यासाठी वाट पाहतोय. त्यात प्रशासनाने वारंवार लिहिले होते, कोर्टात केस आहे म्हणून याठिकाणी आपण सगळ्या योजना सिमित करण्याचा विषय मांडला होता. त्याचबरोबर आयुक्त साहेबांनी खुलासा करावा की, जे १७२ कोटी दिले आहेत, ते माघारी घेणार आहेत का. ते हे पैसे मागणार नाहीत ना. हे पैसे सुद्धा आपल्याला परत मिळाले पाहीजेत. त्यांनी

आपल्याला अनुदान न देताही या पैशांमध्ये आपले भागू शकते. खरेतर या विषयासंदर्भात बोलायचे झालेतर बोलण्यासारखे खूप आहे. जसे आपण दुस-याच्या माथ्यावर खापर फोडतो, तसा एक शब्द एक ओळ लिहिला- हा प्रकल्प थांबला. तो प्रकल्प थांबला. मा.हायकोर्टात बसणारे जज कायद्याचे शिक्षण घेऊन बसलेले असतात. त्यांनी काहीतरी कायद्याचा अभ्यास केलेला असतो. ते उच्चशिक्षित असतात. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या संविधानानुसार त्यांनी जे कायदे लिहिलेले आहेत, या देशात लागू आहेत, त्या कायद्याचा अभ्यास करुन ते कायदेपंडित झालेले आहेत. म्हणून आज तुम्ही केलेल्या चूकांवर, त्रुटींवर बोट ठेवून मी हायकोर्टात गेले. साहेब, प्रामाणिक अपेक्षा आहे की, केलेल्या चूकांवर कुठे पांघरुण घालू नये. आपण मोठ्या मनाने चूक कबूल केली असतीतर आज ही वेळ या सभागृहावर, या शहरावर आली नसती. ही योजना खूप चांगली आहे. योजना खूप चांगली असलीतरी तेथे होणारी घुसखोरी असेल, भ्रष्टाचार असेल, नियमांचे उल्लंघन असेल. मा.आयुक्त साहेब, तुमचे पेपरमधील स्टेटमेंट मी दररोज वाचत असते, मी आज या या अधिका-यांवर कारवाई करणार. त्याचे पुढे काय होते माहित नाही. परंतू या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत ज्या ज्या अधिका-यांकडून नियमांचे उल्लंघन झाले होते, त्यांचा एकदा तरी आपण आढावा घेतला का? घेतला असेल तर तो या सभागृहापुढे यायला पाहिजे होता की, या या अधिका-याची ही चूक होती, म्हणून या या अधिका-यांवर कारवाई केली आहे. इथे येणारा प्रत्येक आयुक्त, प्रत्येक अधिकारी आम्हाला सागंतो, मागच्यांनी केले आहे मला काय माहित. मग खुर्ची कशासाठी आहे. आपण विषय आणायला हरकत नाही. हाय कोर्टात गेल्यामुळे का होईना तुम्हाला विषय आणावा लागला. त्यामुळे आम्हाला चर्चा तरी किमान करायला मिळते आहे.

मा.महापौर साहेब, याठिकाणी मा.शहर सुधारणा समितीमध्ये हा विषय जेव्हा आला होता. खरेतर त्यावेळी सुद्धा त्याठिकाणी या गोष्टीचे आपण विश्लेषण करु शकलो असतो की कुठला प्रकल्प कशामुळे बंद पडला आहे. पण आपण केले नाही. आपण डायरेक्ट हायकोर्टावर ढकलून मोकळे झाला आहात. मा.महापौर साहेब, तुम्ही म्हाडाने आपल्याला दि.१७.७.१३ रोजी पत्राची छायांकित प्रत दिली होती. त्यात उल्लेखित होते, जेएनएनयूआरएमचे समन्वयक यांनी दि.२४/३/१४ चे पत्रात जोडून आपली सीएनसी कमिटी आहे, त्यांचे मिनिटस् ऑफ मिटींग ई मेलची प्रत मा.मुख्यअभियंता, म्हाडा यांना, प्रकल्प सल्लागार सन्मा.मोहन साकरकर, मे.ओंकार क्रिएशन यांचे जे जे.ई. आहेत यांना दिले होते. जसे मनपाला पत्र देण्याआधी त्यांना दिले होते. हे पत्र केव्हा दिले होते, २०१४ च्या तिस-या महिन्यातले. सभागृहात विषय कधी आला. साहेब, आपण सभागृहापुढे हे पत्र ठेवायचीसुद्धा तसदी घेतली नाही की, असे असे सेंट्रल गव्हर्नमेंटने कळवले आहे. युति शासनाचे गव्हर्नमेंट केंद्रात आले तरी केंद्रात डायरेक्ट पत्राचे ठरले काय काहीही झालेतरी पिंपरी चिंचवडमध्ये पहिले प्रोजेक्ट रद्द करायचे म्हणून. याआधी

केंद्र शासनात काहीतरी प्रोसेस झाली असेलच. त्या मिटींगला कोण होते. पण बीले फाडायची कामे झाली आहेत ती सुद्धा कुठेतरी थांबली पाहीजेत. मा.महापौर साहेब, मी त्यावेळी जे पत्र दिले होते. झोपडपट्टी पुनर्वसन व बीएसयुपीसाठी जे सल्लागार नेमले आहेत, त्यांना पत्र दिले होते. महापालिकेला दिले. आपण सभागृहापुढे आणले नाही. खरेतर सभागृहापुढे आणून त्याच्यावर विचार विनिमय व्हायला पाहीजे होता. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, मी याठिकाणी आपल्याला वारंवार सांगते की, अशा प्रकारची आलेली महत्वाचे पत्रे आहेत ती आमच्यासमोर आणा. तुम्ही ते पत्र आणले नाही. डायरेक्ट विषय घेऊन आलात. आम्ही घाबरलो ना. ज्या गरीबांना, २७ लाख झोपडपट्टीधारकांना मुंबईत घर देणार किंवा राज्यात घर देणार अशी भिमगर्जना करणारे आमचे स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांची ही योजना होती, घोषणा होती. मग आमचे सरकार असे कसे करु शकते. याचा अभ्यास करण्यासाठी आम्ही सुद्धा काही कागदपत्रे मागवली होती. तेव्हा लक्षात आले, ११८ व्या मिटींगमध्ये ठरले होते. हे आघाडी सरकारमध्येच ठरले होते, हे प्रकल्प गुंडाळायचे. आणि बिल मात्र आमच्या नावाने फाडायचे काम चालले आहे हे याठिकाणी नमूद करते. याचा मी कडाडून निषेध करते. खासकरुन प्रशासनचा करते की, प्रशासनाने हेतूपुरस्सर २०१४ला आलेले हे पत्र दडवून ठेवले. २०१४च्या तिस-या महिन्यात आलेले हे पत्र आणि तुम्ही २०१५ मध्ये सभागृहात विषय आणता. खरेतर असे महत्वाचे पत्रव्यवहार नगरसचिव या नात्याने नगरसचिव यांनी सभागृहात आणणे महत्वाचे आहे. मी तुम्हाला वारंवार सांगते, त्यांच्यावर काहीतरी कारवाई करा. परंतू ते आपल्याकडून होत नाही. दूर्दैव आहे. मा.महापौर साहेब, इथून पुढे मा.नगरसचिव व मा.आयुक्त यांना स्ट्रीक्टली वॉर्निंग द्या की, अशाप्रकारचा कुठलाही पत्रव्यवहार असेल तर तो सभागृहापुढे आला पाहीजे. मा.महापौर साहेब, थोडेसे या विषयासंदर्भात आज जरी बाकी सदस्यांना वाटले, एक/दोन वर्षे मुदतवाढ आपल्याला मिळालीच आहेतर मग कशाला बोलायचे. एकिकडे मी कोर्टात आहेच. मला तर बोलावेच लागेल. कारण तुम्ही कारण दिले आहे, कोर्टात असल्यामुळे निर्णय घेता येत नाही. म्हणून आम्ही हा विषय सिमित करतोय.

२००५ साली आपण ज्यावेळी सिटी डेव्हलपमेंट प्लॅनला मंजूरी मिळाली, त्याचा तपशीलवार अहवाल, डीपीआर, जेएनएनयूआरएमच्या सीएनसी समितीच्या मिटींगमध्ये दि.२८ सप्टेंबर २००६ मध्ये झालेल्या चौथ्या मिटींगमध्ये सेक्टर २२ प्रोजेक्ट क्र.१/२/३ अन्वये ११७६० सदनिका करायला याठिकाणी मान्यता मिळाली होती. प्रति सदनिकेचा रेट रु.१,७६,००० + मुलभूत सुविधा खर्च असा होता. खरेतर रु.१,७६,०००/- हा खर्च होता, याच्या अनुषंगाने आपण त्यांच्याकडून लाभार्थी हिस्सा १० टक्के रक्कम घ्यायला पाहीजे होती. एक वर्षासाठी झोपडपट्टीधारकांना लागू होत नाही. त्यांना मोबदलाच द्यायचा आहे. परंतू २००० पासून द्यायचाच होता, तर लाभार्थीकडून १० टक्के रक्कम म्हणजे किती आले. रु.१७,०००/- आले.

आपण आज किती घेतो, ५४,०००/-, ६२,०००/-, रु.७०,०००/-. आपण कॉस्टवाईज जातो. इथे आपण नियमांचे उल्लंघन केलेल हे केंद्र शासनाला कुठेही कळवलेले नाही. एकतर हायब्रीड केले. एसआरए व बीएसयुपी मनानेच तुमची काहीतरी नवीन संकल्पना आली. पुण्यात असे होत नाही. पुण्यात एसआरए म्हणजे प्युअर एसआरए होतो. तिथे एफएसआय दिला जातो, जो टीडीआरचा लोड होतो. तिथे रु.५ कोटी ते १० कोटी मिळतात, ते आपल्याकडे मिळत नाहीत. पण आपल्याला काहीतरी मिळाला असता. आपल्याकडे यासंदर्भात प्रयत्नच केलेला नाही. सेक्टर २२ च्या प्रोजेक्टला रु.२२५.१९ची मान्यता होती. तसेच जेएनएनयूआरएमचे सीएमसी कमिटीच्या दि.२८ नोव्हेंबर २००६ च्या झालेल्या ६व्या मिटींगमध्ये वेताळनगरमध्ये १४४० सदनिका बांधायला मंजूरी झाली होती. प्रति सदनिकांचा रेट रु.१,७८,०००/- + मुलभूत सुविधा खर्च, रक्कम ३६.१२ कोटी उद्योगनगरसाठी ८०० सदनिका बांधायच्या होत्या. त्याठिकाणी रेट रु.१,७६,०००/- होता. मिलिंदनगरसाठी १२८० सदनिका बांधायच्या होत्या. त्यासाठी रेट होता ३१.७० कोटी. विठ्ठलनगर असेल, अजंठानगर असेल एकाही ठिकाणी रु.१,७६,०००/- च्या वर शासनाचा खर्च गेलेला नाही. जवळपास या सगळ्या सेक्टर २२ वगळता विठ्ठलनगर, अजंठानगर, मिलिंदनगर, वेताळनगर येथील ६४०० + ११७६० = एकूण १८१६० सदनिका बांधण्यासाठी शासनाने ३६५.६० कोटींच्या पुनर्वसन प्रकल्पाला मंजूरी दिली होती. जेएनएनयूआरएम बीएसयुपी अंतर्गत सदर प्रकल्पाला मान्यता देताना मंजूर प्रकल्प खर्चाच्या ५० टक्के अनुदान द्यायचे केंद्र शासनाने मान्य केले होते. त्यांनी त्यांचा शब्द सुद्धा पाळला. त्यानंतर खरा खेळ झाला. महापालिकेने सदर प्रकल्पाच्या कामासाठी निविदा जाहीर करुन प्राप्त निविदा मंजूर देखील केल्या. त्यात सेक्टर २२ निगडी मध्ये प्रोजेक्ट क्रमांक १, २ व ३, ११७६० घरांसाठी सदनिका बांधायचे कंत्राट आय.बी.आर,सी.एल, मे.प्रतिभा कन्स्ट्रक्शन, बी.जी.शिर्के यांना देण्यात आले. खरेतर याठिकाणी बी.जी.शिर्के यांना ब्लॅकलिस्ट करायला पाहीजे होते. भाटनगरचा प्रकल्प पूर्णतः फसलेला आहे. एक प्रकल्प फसलेला असताना त्यांना इथे घ्यायला नको होते. तरी त्यांना कन्टेस्ट करु दिले. दुस-या प्रकल्पाला घ्यायला नको होते. तरीसुद्धा आपण त्यांना याठिकाणी कन्टेस्ट करुन दिले आहे. त्यांनी इथे सुद्धा काम केले. ते काही ठिकाणी चांगले काम करतात. निगडीच्या सदर प्रकल्पाची किंमत केंद्र शासनानुसार रु.२२५.१९ कोटी असताना प्रत्यक्षात निविदा रु.३७२.१५ कोटी मंजूर करण्यात आली होती. संपूर्ण हा खेळ २००६चाच आहे. २००६-०७ च्या दरम्यान म्हणजे ६ महिन्यांत मला वाटत नाही, रु.२२५ कोटी कुठे व रु.३७२ कोटी कुठे. एसआरप्लस जो आहे यातच एवढा मोठा फरक आहे. त्यात आपले इंजिनिअर, प्रकल्प सल्लागार यांनी नेमके काय केले. खरोखरच त्याठिकाणी आपला अभ्यास होता का. २२५ कोटींचा पहिला डिपीआर दिला असेल तर आपण ३७२ कोटींची निविदा कशी स्विकारली. ती स्विकारली म्हणजे केंद्र सरकार त्यासाठी पैसे

वाढवून निधी देणार नव्हते. महाराष्ट्र शासन त्यासाठी पैसे वाढवून देणार नव्हते. बोजा शेवटी महापालिकेवर पडणार होता. तरीसुद्धा त्या निविदा स्विकारल्या. इंदू प्रोजेक्टमध्ये वेताळनगरमध्ये १४४० सदनिकांऐवजी १५६८ सदनिका बांधण्याचे कॉन्ट्रॅक्ट रु.५९.४० कोटींना मंजूर करण्यात आले होते. त्याच ठिकाणी ११४० ऐवजी १५६८ सदनिका बांधायचे काम त्याला देण्यात आले. आयबीआरचे लोकांना मिलिंदनगरला १२८० सदनिकांऐवजी १४५६ सदनिका बांधायचे काम रु.५५.२६ कोटींना दिले. इंदू प्रोजेक्ट उद्योगनगरच्या ८०० सदनिका, अजिंठानगर प्रोजेक्टच्या १४४० अशा एकूण २२४० सदनिकांऐवजी १६८० सदनिका बांधण्याचे रु.६४.१२/- कोटींचे कंत्राट देण्यात आले. म्हणजेच मा.महापौर साहेब, विठ्ठलनगर, वेताळनगर, मिलिंदनगर, उद्योगनगर व अजिंठानगर येथे मंजूर असलेल्या ६४०० सदनिकांऐवजी ६२७२च सदनिका बांधायचे काँट्रॅक्ट देण्यात आले होते. या ५ ठिकाणी १५९.८६ लाख इतका रेट असताना प्रत्यक्षात २३७ कोटींची निविदा आपण स्विकारली होती. याठिकाणी आपण आपल्या १५०/१५० कोटींच्या निविदा मंजूर केल्या होत्या. एकिकडे शासनाने मंजूर केलेली जे अनुदान होते त्यात आपल्या मनपाचा पैसा जास्त लागणार होता हे माहित असतानासुद्धा जे कोणी सल्लागार असतील त्यांच्यावर आपण खरोखर काय कारवाई केली आहे. आयुक्त म्हणून तुम्ही काय केले. जे कोणी येऊन गेले त्यांनी काहीच केले नाही.

याठिकाणी लिंक रोडचा नवीन विषय आहे. सगळ्यात शेवटी त्याबद्दल बोलते. केंद्र शासनाने मंजूरी दिलेले ८५.७ कोटींचे पुनर्वसन प्रकल्पाचे काम करण्यासाठी महापालिकेने तब्बल ६१० कोटी मोजले. मंजूर केले. दुपटीने खर्च केला. ३८५ कोटी कुठेत व ६१० कोटी कुठेत. कुठे कसे मला वाटत नाही यात गरीब कुठे आहे. तुम्ही डीपीआर (Deduct Project Report) दिला, तुम्ही सांगितले, आम्हाला १,७६,०००/- ला सदनिका परवडते आहे. मग दुप्पट रेट कसा काय झाला. मग त्याच्यावर बोललो तर आम्ही गरीबांचे विरोधक. ही संस्था जनतेच्या पैशांनी चालणारी आहे. त्यांच्या पैशाचे रक्षण करायचे काम तुमचे, माझे,प्रत्येकाचे आहे. आयुक्तांचे देखील आहे. पण दुर्दैवाने ते याठिकाणी घडलेले नाही. म्हणूनच मला सन्मा.हायकोर्टाचे दार वाजवावे लागले. २००६ मध्ये मंजूर झालेल्या प्रकल्पांची किंमत २००७ मध्ये रु.२२५ कोटींनी वाढली होती. वाढीव दराने मंजूर केलेल्या निविदांना दि.११ व १४ डिसेंबर २००७ रोजी वर्कऑर्डर दिली होती. सदर प्रकल्पाचे बांधकाम १४ जून २०१० व १४ सप्टेंबर २०१० रोजी पूर्ण होणे अपेक्षित होते. मा.महापौर साहेब, तारखा अत्यंत महत्वाच्या आहेत. आपण त्यांना बाईंडींग केले होते. २००७ला वर्कऑर्डर दिली. २०१० मध्ये ३ वर्षांत बांधून हातात सदनिका द्यायची होती. केंद्र शासनाने १११६० सदनिकांच्या बांधकामांसाठी मंजूरी दिली असताना मनपाने केवळ ८०३२ सदनिकांचे बांधकामाला मंजूरी दिली. इथेच पहिली चोरी केली. १८०३२ व १८१०७ इथेच कपात केली. का केली, कशी केली, कारण काय घडले ते सांगितले नाही. केंद्राचा

पैसा होता, राज्याचा पैसा होता. आपले मत आपण स्पष्टपणे मांडायला पाहीजे होते, ते आपण स्पष्टपणे मांडले नाही. कोणी काय केले हे आजपर्यंत कोणत्याही सदस्याला आपण सांगितलेले नाही. आमच्या १५८ सदनिका न बांधण्याचा निर्णय महापालिकेने परस्परच घेतलेला आहे. एकिकडे २२५ कोटींनी रेट वाढला असताना सुद्धा खरेतर त्या प्रोससमध्ये जेवढे होते त्यांचे पोट भरलेले नव्हते. एस्कलेशनच्या नावाखाली आत्तापर्यंत आपण ५१.२६ कोटी त्या ठेकेदारावर खर्च केला आहे. महापालिकेने केंद्र शासनाकडे सादर केलेल्या डीपीआरप्रमाणे केंद्र शासनाने मंजूर केलेल्या प्रकल्प खर्चाद्वारे १८१६० सदनिकांसाठी एकूण ३८५.७ कोटी रुपये खर्च अपेक्षित होता. परंतू महापालिकेला ८२८८ सदनिका बांधण्यासाठी ३३८ कोटी रुपये लागले. मंजूर किती झाले होते, १८०००. ८२८८ सदनिका बांधण्यासाठी आपल्याला ३३८.५८४ कोटी रुपये लागले. कुठे राहीले गरीब. कुठे राहीला गरीबांचा कळवळा. जे कोण माझ्या नावाने शिमगा करत असतात. त्यांनी त्यावेळी शिमगा का केला नाही. करायला पाहीजे. मी गरीबांचा कैवारी. मग त्यावेळी शिमगा का केला नाही. त्यावेळी का सांगितले नाही. दु खते कुठे, पट्टी दु सरीकडेच लावली जाते आहे. मा.महापौर साहेब, ११५२ सदनिकांचे बांधकाम अजूनही अर्धवट स्थितीत आहे. त्यासाठी अजून खर्च होणार आहे. २७४ स्के. फूटाची एक सदनिका बांधण्यासाठी मनपाला सुमारे १६०० चौ.फूट इतका दर त्याठिकाणी आहे. आज आपण २०१५ मध्ये आहोत. २००७ पासून चालते आहे. ७ वर्षे पुढे आलोतरी आजही रु.१६००/- रेटने चांगल्या पद्धतीचे बांधकाम करु शकतो. आजही झोपडपट्टी पुनर्वसनाच्या कुठल्याही प्रकल्पात गेलोतरी वरच्याच्या पायरीत खालच्याला आंघोळ करावी लागते. त्याठिकाणी त्यांना मुलभूत सुविधा सुद्धा पुरविल्या गेल्या नाहीत. आज घरे बघितलीत तर ड्रेनेज वर रस्ता खाली असे झाले आहे. घराच्या उंचीमध्ये बॅक पाणी मारते. यात कोणी लक्ष घातलेलेच नाही. कारण आमचे लक्ष वेगळ्याच गोष्टीत केंद्रीत झाले असल्यामुळे आम्ही हे बघितलेलेच नाही. मा.महापौर साहेब, सभागृहासमोर मांडलेल्या प्रस्तावामध्येच सेक्टर २२निगडी, वेताळनगर, मिलिंदनगर, विठ्ठलनगर, उद्योगनगर, अंजठानगरच्या प्रकल्पाच्या सुधारीत डीपीआरप्रमाणे केंद्र शासनाने मंजूरी दिलेल्या १८१६० सदनिकांऐवजी १७६९६ सदनिका बांधायचा निर्णय प्रशासनाने परस्परच घेतलेला आहे. शासनाने मंजूर केलेल्या सदनिकेऐवजी ४६४ सदनिका रद्द करायचा निर्णय प्रशासनाने परस्पर घेतला आहे. यासाठी सभागृहाची मान्यता घेतलेली नाही. कुणाला सांगितले नाही, विचारले नाही. याठिकाणी खरेतर कडक शब्दांत प्रशासनाचा निषेध करते. मा.महापौर साहेब, या प्रकल्पासाठी सेक्टर २२ निगडी, विठ्ठलनगर, वेताळनगर, मिलिंदनगर, उद्योगनगर व अजंठानगर येथील प्रकल्पासाठी मे.ओंकार असोसिएटस या संस्थेला विना निविदा थेट पद्धतीने प्रकल्प सल्लागाराचे काम देण्यात आले होते. केंद्र शासनाने ३२५ कोटींच्या निविदेला मंजूरी दिली. आपण निविदा ६०० कोटींच्या स्विकारल्या व विनानिविदा दिले. याला भ्रष्टाचार म्हणायचे नाहीतर दु सरे काय

नाव देणार. मग आम्ही बोललो तर आम्ही गरीबांच्या विरोधातले. आम्ही भ्रष्टाचार सांगितला तर आम्ही विकासकामाला खोडा घालतो. आम्ही विकासकामाला खोडा घालत नाहीतर तुमच्या घर भरण्याला खोडा घालतो. म्हणून आम्ही वाईट ठरतो. तुमच्या वाईट किंवा चांगल्या म्हणण्याने आमचे काही कमी जास्त होत नाही. आपण त्यांना विनानिविदा थेट पद्धतीने काम दिले होते. प्रकल्प सल्लागार नेमला होता. एवढे सगळे प्रकल्प बंद पडले मग त्यांच्यावर काय कारवाई केलीत यासंदर्भात मी केंद्र शासनाकडे विचारणार आहे. मी केंद्र शासनाकडे, हायकोर्टाकडे यासाठी दाद मागणार आहे. असा भ्रष्टाचार करुन नामानिराळे राहणार असालतर आम्ही गप्प नाही राहणार. मा.महापौर साहेब, ओंकार असोसिएटसला एवढी फी का दिली होती? त्यात त्यांचे काम काय होते? त्यांनी बांधकाम नकाशे तयार करुन त्यास पुणे पिंपरी चिंचवड क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्याकडून आवश्यक असलेल्या सर्व परवानग्या, कागदपत्रांची पूर्तता करुन प्रकल्पाचे बांधकाम नकाशे मंजूर करण्याचे काम हे प्रकल्प सल्लागार यांचे काम होते. आपले अधिकारी बिनपगारी फुल अधिकारी तिथे होते. आपण आपले घर बांधायला घेतले, कॉन्ट्रॅक्टरला, बिल्डरला घर बांधायला दिलेतर चार वेळा बघतो की, वाळू नीट टाकली आहे का, सिमेंट बरोबर लावले आहे का. पाणी बरोबर टाक. इथे हे केलेले नाही. कारण हे घर श्रीमंताचे घर नव्हते. ते होते गरीबीत राहणा-या, झोपडात राहणा-या दलित, मागासवर्गीय, मांग, महार या वर्गाचे होते. त्यांची काळजी इतरांनी करायचे काही कारणच नव्हते. तुम्हाला ही काळजी वाटावी यात आश्चर्य आहे. मग आम्हाला गरीबांचा खूप पुळका आहे. या सगळ्या परवानग्या न घेतल्यामुळे या प्रकल्पाला खिळ बसली आहे. हम करे सो कायदा. सल्लागार नेमला होता. या महापालिकेला बाप नेमला नव्हता, परंतू तो बापासारखा वागला व निघून गेला. आज गोरगरीब त्या घरावाचून राहणार आहेत.

या सल्लागाराने खरेतर कोणत्याही कागदपत्रांची पूर्तता न केल्यामुळे दि.२७ ऑक्टोबर २००८ रोजी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे तत्कालिन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविणसिंह परदेशी यांनी महापालिकेचे आयुक्त, अतिरिक्त अधिक्षक अभियंता, शहर अभियंता, उपसंचालक नगररचना, सहा.आयुक्त झो.नि.पू. व प्रकल्प सल्लागार मे.ओंकार असोसिएटस् यांना सात पानी पत्र लिहिले होते. मा.प्रविणसिंग परदेशी नावाचे अत्यंत चांगले, कामसू अधिकारी इथे होते. दिनांक २७/१०/२००८ ला त्यांनी दिलेले सात पानी पत्र आहे. त्यात त्यांनी सांगितले आहे, ७० टक्के पात्र झोपडपट्टीधारकांच्या संमतीची अट शिथिल करण्याची धारणा पक्की करण्यात आलेली नाही. म्हणजे १) झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प राबविताना ७० टक्के झोपडपट्टीधारकांची संमती घ्यावी लागते ती न घेतल्यामुळे त्यांनी त्याचवेळी आक्षेप घेतला होता. २) अद्यापही सहाही योजनांच्या जागेचा मोजणी नकाशा सादर करण्यात आलेला नाही. विकास योजना अभिप्राय संबंधित विभागाकडून घेऊन सादर करण्यात आलेला नाही. या

सभागृहात बसलेले काही माझे सहकारी बांधकाम व्यावसायिक आहेत त्यांना विचारा. त्यांना माहित असेलच की, विकास योजना अभिप्राय घेतला नाहीतर आपण बांधकाम परवानगी देतो का. तुम्ही जर त्यांना परवानगी देत नाही. सर्वसामान्यांना परवानगी देत नाही मग तुम्ही हे चुकीचे काम केले होते. आपले अधिकारी डोळे मिटून बसले होते का, अज्ञानी होते का. त्यांना सुद्धा माहिती होते. परंतू त्याठिकाणी विकास योजना अभिप्राय संबंधित विभागाकडून घेऊन सादर केलेला नाही. जागा मालकी हक्काची कागदपत्रे, पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नावाने उदा. सात/बारा, प्रॉपर्टी कार्ड उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. मी पत्र वाचून दाखवते. जागेचा तपशील अद्याप दाखल केलेला नाही. उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. घोषित दाखले व नकाशे नस्तीमध्ये दिसत नाही. ते दाखल करणे जरुर आहे. झोन दाखला उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. झोपडपट्टयांचे एरियल फोटोग्राफ्स् सुस्पष्ट प्रतींत उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. महापालिकेच्या अग्निशामक विभागाकडून नाहरकत दाखला उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. सर्व पात्र झोपडपट्यांचे सेवाशुल्क व इतर कर भरणे बाकी नसलेबाबत संबंधित विभागाकडून दाखला घेऊन तो या कार्यालयाकडे उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. प्रकल्पाच्या जागेवरील विकास योजनेतील रस्त्याची आखणी संबंधित विभागाकडून नगररचना व विकास विभाग व जागेवरुन आखून घेतलेबाबत संबंधित विभागांचे दाखले उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. मा.महापौर साहेब, हे पत्र वाचलेतर दुसरा कोणताही चवथी पाचवी शिकलेला माणूस त्याला सुद्धा कळेल. पाणीपुरवठा, जलनिस्सारण विभाग यांचे नाहरकत प्रमाणपत्र घेतलेले नाही. मिळकत शेतसारा भरल्याबाबतची मा.जिल्हाधिकारी पुणे यांची मान्यता आवश्यक होती, ती घेतलेली नाही. उपरोक्त विषयातील झोपडपट्टी पुनर्वसन कलम ३(क), ३(ड) म्हणजेच झोपडपट्टी घोषित करणे हे सुद्धा आपण केलेले नाही. असे कसे केले. तुमच्यामुळे आमचे सगळे प्रकल्प डबघाईला आले. ३(क), ३(ड) जे झोपडपट्टी पुनर्वसनचे बेसिक नियम आहेत, ते सुद्धा फॉलो केलेले नाही. तुमची इच्छा होती, आम्ही सगळे पाठिशी घालावे. आयएएस ऑफीसर प्रविणसिंग परदेशी हे अत्यंत उमदे कमिशनर आपल्या शहराला भेटले. मी त्यावेळी नगरसेवक नव्हते पण रस्त्यावरील साफसफाई होते का नाही, कच-यावर पावडर टाकली जाते का नाही, ते वेषांतर करुन फेरफटका मारायचे. लोकांना हे नंतर कळायचे. कोणीतरी कमिशनर बघायला आले होते म्हणून. इतके जागरुक कमिशनर मनपाला मिळाले होते. त्यांनी ७ पामी पत्र दिले होते. मग या पत्रावर बसून ऊबवायचे काम चालले होते का? आणि मग सांगायचे, हायकोर्टात गेल्यामुळे हे सगळे प्रकल्प सिमित करण्यात येत आहेत. चूक करायची तुम्ही आणि दुस-याच्या नावावर पावत्या फाडायचे काम बंद करा. मा.महापौर साहेब, झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प राबविताना ३(क), ३(ड) करणे आवश्यक असते. कार्यालयाकडून निर्गमित केल्यानंतर त्या संबंधित झोपडपट्टीमध्ये आदेश असतात ते डकविणे, त्याचे चावडी

वाचन करणे, पात्र अपात्र लाभार्थ्यांच्या याद्या असतात त्या सुद्धा त्याठिकाणी लावल्या जातात. ते सुद्धा बेसिक वर्क तुमच्याकडून झाले नाही. म्हणून त्यांनी इथे पत्र दिले होते.

प्रत्येक प्रकल्पवाईज त्यांनी पत्र दिले आहे. वेताळनगरसाठी त्यांनी पत्र दिले आहे. वेताळनगरमधील सदर झोपडपट्ट्यांतील काही झोपडीधारक संक्रमण शिबिरात हलविण्यात आले आहेत. परंतू सदर संक्रमण शिबिरास या कार्यालयाची परवानगी घेणे आवश्यक होते, ती घेतली नाही. मौजे पिंपरी, सर्वे नं. १०० पैकी विठ्ठलनगर यासाठी काय काय त्रुटी काढल्यात ते सांगते. सदर योजनेसाठी बांधकाम परवानगी सध्या झोपडपट्टीच्या ठिकाणी देण्यात आली आहे. विठ्ठलनगर इथेच परवानगी देण्यात आली होती. परंतू प्रत्यक्षात काम दुस-याच जागेवर चालू आहे. अत्यंत महत्वाचा विषय आहे. म्हणजे सदरचे बांधकाम अनधिकृतपणे चालू आहे ही बाब योग्य नाही. दि.२७/१०/२००८ ला सन्मा.प्रविणसिंग परदेशी हे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे सीईओ होते. त्यादिवशी त्यांनी ७ पानी पत्र लिहीले. त्यांनी त्यावेळी विभागवार पत्रे दिली होती. म्हणजे एका ठिकाणी नकाशा मंजूर केल्यानंतर दुसरीकडे अनधिकृतपणे बांधकाम चालू आहे, म्हणून त्यांनी त्या दिवशी सांगितले. आपण त्यावर काही केले नाही. सेक्टर २२ निगडी बद्दल त्यांनी काय सांगितले, सेक्टर २२ निगडी ही जागा देहू ॲम्युनिशन डेपोजवळ आहे. देहू ॲम्युनिशन डेपोच्या सिमाभिंतीपासून २,००० यार्ड अंतरापर्यंत रेड झोन नाविकास क्षेत्र संरक्षण खात्याकडून घोषित आहे. तिथे रेडझोन आहे. प्रशासनाची वाजवलीच पाहीजे. प्रविणसिंग परदेशी या महापालिकेचे आयुक्त असताना त्यांना सुद्धा माहित होते, रेडझोन कुठपर्यंत आहे. आम्हाला रेड झोन कुठपर्यंत आहे माहित नाही म्हणून तुम्ही हात वर करुन मोकळे होता. २००८ च्या पत्रात कमिशनर तिथे सांगतात, तिथे रेडझोन आहे. संरक्षण खात्यामार्फत रेड झोन घोषित आहे. सदर योजनेची जागा रेडझोनमध्ये नसल्याबाबत संरक्षण कार्यालयाकडून दाखला देऊन जागा उपलब्ध करुन देणेबाबत या कार्यालयाकडे कळविणे आवश्यक आहे. २००८ला त्यांनी आपल्याला हे महापालिकेला कळवले होते. २०११ मध्ये मी हायकोर्टात गेले. प्रशासनाला लाज वाटली पाहीजे. तुमच्या चूका लपवण्यासाठी दुस-याचे नाव बदनाम करताय. तुमच्या सगळ्यांची गेंड्याची कातडी झालेली आहे. आम्ही काहीही म्हणालो तरी तुम्हाला काही फरक पडत नाही. म्हणूनच मला कोर्टात जावे लागते. हे मी या सभागृहाच्या निदर्शनास का आणून देते आहे, कारण ज्यांना ज्यांना कोणाला वाटते, सिमा सावळे हायकोर्टात गेली म्हणून हा प्रकल्प बंद पडला. पण जे कोणी बांधव आहेत त्यांना सांगते की, तुमचे सीईओ यांनी २००८ला कळवले होते, येथे रेडझोन आहे. आणि महापालिका सपशेल हात वर करते. महापालिकेचे वकील हायकोर्टात खोटं बोलायला भीत नाहीत. आम्हाला माहितच नव्हते. रेडझोनमध्ये आहे का नाही. आमच्याकडे नकाशाच उपलब्ध नव्हता. वाट्टेल ते खोटे बोलतात. आकुर्डी सर्वे नं.८८ मध्ये सदर प्रकल्पाची जागा महाराष्ट्र औद्योगिक विकास

मंडळाच्या मालकीची आहे. सदर जागेवर महापालिकेला विकास करायला नाहरकत दिलेली आहे. परंतू सदर जागेचे पिंपरी चिंचवड महापालिकेकडे रितसर हस्तांतर होणे आवश्यक आहे. कधी कळवले होते, २००८ ला १० व्या महिन्यात. उद्योगनगर, दळवी नगर सर्वे नं.१९५ मधील त्रुटी सांगते, सदर प्रकल्पाची जागा ही रेल्वे हद्दीत येत नसल्याबाबत, याठिकाणी बांधकाम परवाना देण्यासाठी नाहरकत दाखला संबंधित विभागाकडून घेऊन या कार्यालयास उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. तो आपण दिला नाही. मिलिंदनगर सर्वे नं. १२, १३ व १४ पैकी सदर प्रकल्पाची जागा पूरनियंत्रण रेषेच्या आत येत नसल्याबाबत संबंधित विभागाकडून नाहरकत दाखला सादर करणे आवश्यक आहे. मा.महापौर साहेब, २००९ला आम्ही पूरनियंत्रण रेषा आखली. सभागृहात विषय होता. त्यावेळी पूररेषेचा विषय नव्हता. तरीसुद्धा त्यावेळी जी मानांकने असतात, ती सदरच्या अनुसार पाळली गेली नाहीत. म्हणून त्यांनी पत्र दिले होते. एवढ्या सगळ्या त्रुटी लपवून ठेवल्यात. आपण सांगून मोकळे झालात, हायकोर्टात केस असल्यामुळे प्रकल्पाला सिमित करत आहोत. हे का लिहिले नाही. मा.महापौर साहेब, राग हा वेगळ्या कारणांसाठी येतो. परंतू प्रशासनाने जे केले त्याला खरोखर माफीच देता येणार नाही. मा.महापौर साहेब, २००८ ला एसआरए यांनी दिलेले पत्र केराच्या टोपलीत टाकले. त्याच्यावर काही कारवाई केली नाही. दि.१४ डिसेंबर २०१० रोजी झोनिपू प्राधिकरणाला मी पत्र दिले होते. माहिती अधिकारातून माहिती मागवली होती त्याचे उत्तर त्यांनी दिले होते. त्यात हे मा.प्रविणसिंग परदेशी यांचे पत्र मला मिळाले. जे दाखले नव्हते. कोणकोणत्या परवानग्या घेतल्या नव्हत्या. तुमच्याकडे हे पत्र सापडले नसेल. जशी नेहमी इतर कागदपत्रे सापडत नाहीत तसे हे पत्र सापडले नसेल. म्हणून काय यांना माफी देणार का? आमचे सन्मा.अनंत को-हाळे साहेब असतील. त्यांच्याबरोबर सगळे मनसेचे नगरसेवक होते. आम्ही चार वेळा मोर्चा घेऊन आलो. किमान त्यांना बघून तरी प्रकल्प सिमित करणार नाही. याला टेकनीक म्हणता येणार नाही. आम्हाला गरीबांचा कळवळा होता. तरीपण आपल्या ह्रद्याला पाझर फुटला नाही.

मा.महापौर साहेब, राज्यशासनाच्या नगरविकास विभागाने दि.२७/०७/२००७ रोजी आदेश क्रमांक टीपीएस/१८०६/१३८५/सीआर/२६१/०६ नावि १३ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये, महापालिका हद्दीत व हद्दीलगत असलेल्या संरक्षण विभागाच्या आस्थापनाच्या दृष्टीने आवश्यक असलेले प्रतिबंध महापालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीत समाविष्ट करण्याकामी फेरबदल करण्याची कारवाई करण्याचे आदेश महापालिकेला दिले होते. २००६ ला दिले होते. त्यांचे २००६चे पत्र आहे. हरकत नाही. आपण जागा शिफ्ट करुन केले असते. परंतू सेक्टर २२ची जागा आपण शिफ्ट केली नाही. शासनाचा सदर आदेश दि.२४ ऑगस्ट २००७ रोजी आ.क्र.२०५३ अन्वये मनपाच्या नगररचना विभागाला प्राप्त झाला होता. तुमचा सेक्टर २२ चा नकाशा व आदेश एकाच दिवशी होते. तरीसुद्धा

रेडझोनमध्ये नकाशा जूनमध्ये पास केला. रेडझोनमध्ये प्रकल्प उभा केला. हे त्यावेळी राज्य शासनाला कळवायला पाहीजे होते. इतकी डोळेझाक, इतका बेपरवाईपणा, इतका माजोरीपणा प्रशासनाकडे कशामुळे आला. आमच्यामुळेच. आम्ही तुमच्या पाठिशी उभे राहतो म्हणून आला. आज उभे रहात नाही मग आज काय करणार? मा.महापौर साहेब, ज्यादिवशी झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प चालू केला, त्यादिवशी आपल्याला माहित होते सेक्टर २२ हा रेडझोनमध्ये येतो म्हणून. तरीसुद्धा याकडे पूर्णपणे दूर्लक्ष करुन त्याठिकाणी प्रकल्प रेटायचे काम आपण केले होते. रेडझोनची हद्द आहे की नाही हे ज्यावेळी समजले त्यावेळी सभागृहापुढे हे पत्र यायला पाहिजे होते. ८ वर्षे आजही ते पत्र धूळखात पडलेले आहे. शेवटी हायकोर्टात गेल्यानंतर सन्मा.हायकोर्टाने रेडझोनची रेषा आखायचे काम प्राधिकरणाला व महापालिकेला दिले आहे. संरक्षण विभागाच्या दक्षिण कमांड मुख्यालयाचे ऑफीसर इन कमांडट मेजर जनरल अमित सरीन यांनी दि.१२ जुलै २०१० रोजी पत्र क्र.३०३०५०१/डब्ल्यूकेऑफडिफेन्स/ओएस अन्वये महापालिकेचे तत्कालिन आयुक्त आशिष शर्मा यांना एक पत्र दिले होते. या पत्रामध्ये त्यांनी लिहिले होते, डिअर आशिष. प्रोटोकॉलप्रमाणे डिअर लिहीत नाहीत. म्हणजे मेजर सरीन व आशिष शर्मा यांचे संबंध चांगले होते. त्यांनी लिहिले, त्यांनी सांगितले त्यात, देहू दारूगोळा कोठारात खूप मोठ्या प्रमाणात अत्यंत शक्तीशाली व संवेदनशील दारूगोळा व मिसाईल्स, रॉकेट साठवला जात असून, रेडझोनच्या क्षेत्रात होत असलेल्या बेकायदेशीर बांधकामामुळे डेपोच्या सुरक्षेला धोका असून घातपात घडल्यास हजारो निष्पाप नागरीकांचे जीव धोक्यात असून देशाच्या सुरक्षेला धोका आहे, असे कळकळीने नमूद केले होते. त्यामुळे रेडझोनमध्ये महापालिकेने चालू असलेले बांधकाम हे त्वरित थांबविण्याची विनंती मेजर जनरल सरीन यांनी केली होती. परंतू आपण इतके भ्रष्ट्राचारात गुंतलो होतो की आपल्याला कोणाचीच हाक ऐकू आली नाही. सीईओ यांचेही ऐकले नाही. मग कोण मेजर जनरल सरीन यांचे कधी ऐकणार. यांच्यापुढे यांनी देशाच्या सुरक्षेची सुद्धा पर्वा केली नाही.

मा.महापौर साहेब, राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने दि.७ फेब्रुवारी १९८० रोजी महापालिकेच्या सभा संचलनाचे कामकाज आहे, त्यात ३ (आय) नियमाप्रमाणे शासनाकडून आलेली जी काही पत्रे आहेत ती कमिशनर तुम्ही ठेवा, त्यावर चर्चा होऊ द्या. तुम्ही पत्र ठेवतच नाही. ती ठेवायची तरतूद आहे. तरीसुद्धा पत्र ठेवले जात नाही. नगरसदस्यांकडून लपविले जातात. असे त्या पत्रात काय असते. त्यावेळचे सी.ई.ओ. प्रविणसिंग परदेशी यांनी मागितलेली रेडझोनची एनओसी आपण दिली असतीतर मला वाटते, सेक्टर २२चा प्रकल्प वेळीच रद्द झाला असता. आज जे नुकसान होते आहे ते झाले नसते. हे नुकसान तुम्ही केले आहे. प्रशासनाने केले आहे. तुमच्या सल्लागाराने केले आहे. तुम्ही तुमचे निस्तरा. आम्हाला प्रकल्प मात्र पूर्ण करुन पाहिजे आहे. तुम्ही हायकोर्टाला सांगा. शरण जा. हो आम्हाला माहित होते आम्ही केले

होते. मग मात्र मला सांगू नका, अमुक अधिकारी जेलमध्ये गेला, तमुक अधिकारी जेलमध्ये गेला. तुम्ही आजही कोर्टापुढे सरेंडर होत नाही. आजही वस्तुस्थिती सांगत नाही. तुम्ही आजही सांगितले तर शंभर टक्के कोर्ट तुमच्या पाठिमागे आहे. तुम्ही पळवाटा शोधता म्हणून तुमच्या मागे लागतात. मा.महापौर साहेब, हे सगळे विषय मी हायकोर्टात जाण्याआधी घडले आहेत. २०११ ला मी हायकोर्टात गेले होते. २००७ पासून २०११ पर्यंत सगळ्यांना माहित होते. आम्हाला काहीही माहीत नव्हते. आम्ही नवीन होतो. माहिती असताना तुम्ही केलेल्या पापाची फळे तुम्हालाच भोगायची आहेत. आम्ही भोगणार नाही. तुम्ही जो विषय पहिल्यांदा सभागृहात आणता. कमिशनर म्हणून पहिल्यांदा तुमचा निषेध करते. तुम्ही तुमच्या लोकांची इतकी पाठराखण करता की, आम्हाला म्हणावे लागते, बास कमिशनर बास, आता कुठेतरी थांबा. तुम्ही त्यांच्यावर एक टक्का सुद्धा आक्षेप घेतलेला नाही. तुम्ही माझ्यावर आक्षेप घेतला म्हणून मला आक्षेप नाही. त्यामुळे विषय सभागृहापुढे तरी आला. सेक्टर २२ मध्ये ११७६० सदनिकांच्या प्रकल्पाचे बांधकाम २००७ मध्ये सुरु झाले होते. वर्कऑर्डरप्रमाणे २०१० ला ते पूर्ण व्हायला पाहिजे होते. तुम्हाला मैदान मोकळेच होते. खरेजर गरीबांसाठी घरे बांधायची असतीतर जे जे गरीबांचे कैवारी आहेत, त्यांना खरेतर प्रकल्पाची घाई होती. २०१० ला लोकांना वाटून देऊन आजपर्यंत रहायला दिले असते. परंतू २०१० ला जे प्रकल्प पूर्ण करायचे होते. मी २०११ ला कोर्टात गेले. २०१२ मध्ये मला हायकोर्टाने स्टे दिला. २००७ ते २०१२ ५ वर्षे गेली. ५ वर्षांत प्रकल्प पूर्ण करता आला नाही. एखाद्या प्रायव्हेट ठेकेदाराने ५ वर्षे प्रकल्प ठेवला असता का? प्रतिभा कन्स्ट्रक्शनवाल्यांना विचारा. बी.जी.शिर्के यांना विचारा. त्यांनी ५ वर्षापर्यंत प्रकल्प रखडवला असता का? तिथे असे एस्कलेशन मिळाले नसते. विकास करुन पैसा खर्च करावा लागला असता. इथे महापालिकेची तिजोरी लुटायला मिळते. महापालिकेचे भ्रष्ट अधिकारी त्यात सामिल होते. त्यांनी त्यांची जबाबदारी पूर्ण केली नाही. ५ वर्षानंतर त्या प्रकल्पाला स्टे मिळाला. २०१० मध्ये प्रकल्प पूर्ण झाला असता तर हायकोर्टात देखील जावे लागले नसते. चूका तुमच्या, खापर आमच्यावर ठेवता. वर्कऑर्डर दिल्यानंतर ५ वर्षे प्रशासन झोपा काढत होते. २००८ मध्ये रु.२२५ कोटींचा प्रकल्प ३७२ कोटी मिळून सुद्धा ठेकेदाराने पूर्ण केला नाही. पूर्ण महापालिका विकून खायची होती का? किती भ्रष्टाचार करायचा, त्याला काही मर्यादा. मग आम्ही बोलतो, मग आम्ही गरीबांच्या विरोधातले, कळ लावणारे, विकास कामाला खोडा घालणारे, काय काय विशेषणे आम्हाला लागत आहेत. नावामागे पहिल्या पदव्या होत्या, आज या पदव्या लागतात चांगले वाटते.

ज्या प्रकल्प सल्लागारांनी रेडझोनची एनओसी घेतली नाही, त्याचे काय केले तर काही केले नाही. त्या सल्लागाराला नोटीस पाठवली, काही पत्र दिले, काहीच केले नाही. सल्लागार आला की आपले अधिकारी घाबरुन उठायचे. इतकी ओंकार असोसिएटसवाल्याची दहशत होती.

ज्या गोष्टी प्रकल्प सल्लागारांनी केल्या नाहीत. त्याची फी त्यांना दिली. ती फी परत घ्या. त्यांच्यामुळे हे सगळे प्रकल्प अडचणीत आले. त्यांच्यावर फौजदारी दाखल करा. त्यांना जेलमध्ये पाठवा. हे लोकांचे पैसे आहेत. आमचे पैसे परत घ्या. नागरीकांचे पैसे आहेत. तुम्ही, नागरीकांनी त्याला जाब विचारायला पाहीजे होता. मी जागरुक नागरीक आहे. मी मागणी करते. मी महापालिकेला कर देते, तुम्ही मला माझ्या पैशांचा हिशोब देणे लागता. प्रकल्प सल्लागाराला एवढी फी कशी दिलीत. जे काम त्यांनी केले नाही त्याचे पैसे तुम्ही त्याला कसे दिलेत? माझे दुसरे म्हणणे आहे. आयुक्त साहेब, तुम्ही तुमच्या विषयपत्रिकेत म्हटले आहे, सेक्टर २२ साठी आयुक्तांनी मोठे कारण दिले आहे. तुम्ही तुमच्यावर काहीही घेतलेले नाही. हायकोर्टात स्टे असल्यामुळे सिमित करतो. लिंकरोडचा तोच विषय आहे. सगळे नियमाप्रमाणे होते तर कोर्टाने स्टे द्यायला कोर्ट काय वेडे आहे का? आपण त्याच्यापेक्षा हुशार कसे. आपण हायकोर्टाला कसे मुर्खात काढू शकतो याचसाठी तुमचा सगळा खटाटोप चालला आहे. तिथे बसणारे जज, तिथे चालणारा कायदा, माझ्या डॉ.बाबासाहेबांनी लिहिलेले संविधान त्यानुसार निर्माण झालेला कायदा याला तुम्ही चॅलेंज करु शकत नाही. मी तुम्हाला चॅलेंज करु देणार नाही. कारण मी त्याच समाजाचे देणे लागते, ज्या समाजाचे डॉ.बाबासाहेब होते. जिथे रु.१७,०००/- लागणार होते तिथे रु.५५,०००/- लाटले आहेत. या महापालिकेच्या अधिका-यांच्या घरांत घुसले पाहिजे व पैसे परत मागितले पाहिजेत. १९९५ च्या झोपडपट्टीधारकांना मोफत घरे देण्याचा आपण नियम,कायदा असताना कायदा पायदळी तुडवला. खरेतर तुमच्यावर फौजदारी व्हायला पाहीजे. आणि म्हणतात गरीबांचे कैवारी. झोपडपट्टीधारकांचा पुळका आलाय ना तुम्हाला. आणि त्यांच्या मनासारखे करायचे नाही. बीएसयूपीमध्ये तुम्ही १० टक्के घेता मग घरकूल योजनेत १० टक्के का घेतले नाहीत. तुमच्यावर फौजदारी झाली पाहीजे. फक्त लोकांना घरे मिळावीत म्हणून आणि म्हणून, त्यांचे स्वप्न भंगवायचे नव्हते म्हणून सुटलात तुम्ही. कोणी तुमच्याकडे भीक मागायला आले नव्हते, घर द्या घर द्या म्हणायला. आजही लोक झोपडपट्टीत सुखाने, आनंदाने राहतात. तुम्ही जागा, मग केलेच पाहीजे. शासन आहे. शंभर टक्के काम केले पाहीजे. काम करताना मात्र नुसता आवेश आणू नका. त्याची जबाबदारी सुद्धा खरोखरच कळाली पाहीजे. त्यांच्याबद्दल ओलावा पाहीजे. मी भारी, मी भारी, जोरात बोलले होते. जेव्हा दहा हजार, पन्नास हजार घेत होते तेव्हा तू कुठे गेला होता? १९९५च्या झोपडपट्टीधारकांना मोफत घर देण्याचा कायदा तुम्ही पायदळी तुडवला. टिका करणे सोप्पे असते. काम करायला नको. प्रकल्प सल्लागाराला सेक्टर २२ चा बांधकाम नकाशा मंजूर करण्यासाठी तब्बल ९.३० कोटी दिले. सेक्टर २२चे ७८४० सदनिकांचे बांधकाम मात्र होणार नाही. एखाद्या वेळेस रेड झोन असल्यामुळे केंद्र शासनाकडून त्याचे काही होऊ शकणार नाही. झालेतर वेल ॲण्ड गुड. युतीचे सरकार आहे. आम्ही गरीबांसाठी काम करणारी माणसे आहोत.

आवेश नाही आणत. ढोंग नाही करत. बरीच वर्षे ऐकले, आत्ता रेडझोन जाणार, महिन्याने जाणार, वर्षात जाणार, महिनोनमहिने कॅलेंडर बदलत गेले पण रेडझोन काही गेला नाही. युती शासनात प्रयत्न चालू आहेत. शंभर टक्के रेड झोन जावा म्हणून देवाकडे प्रार्थना करते व देशाच्या संरक्षण मंत्र्यांकडेही प्रार्थना करते. पर्रीकर साहेब अत्यंत हुशार आहेत. ते जो निर्णय घेतील तो देशहिताचा असेल. लोकहिताचा असेल का नाही माहित नाही. पण इथले सो कॉल्ड जे स्वतःला गरीबांचे कैवारी म्हणतात त्यांच्या हिताचा नसेल. पण देशहिताचे व देशभक्त नागरीकांच्या हिताचे निर्णय नक्कीच घेतली. त्या निर्णयाची आम्ही वाट पाहतोय. अनेक शिष्ट मंडळे जाऊन भेटतात. आज ना उद्या नक्कीच यश येणार आहे. काहीतरी घडेल पण चांगले काहीतरी घडेल या आशेवर आम्हीसुद्धा आहोत. प्रकल्प सल्लागाराला जी फी दिलेली आहे, ती फी परत मागितली पाहीजे. ही फी कोण मागणार? आपण एकतरी पत्र लिहीले का नाही लिहीले. दिलेतर विचारायची तसदी सुद्धा घेत नाही. प्रकल्प सल्लागार आला की तो बसतो व आपले अधिकारी हात बांधून पाठिमागे उभे राहतात. हो साहेब, नाही साहेब. आपल्याला सांगावे लागते. मी, मा.उल्हास शेट्टी, मा.प्रशांत शितोळे आम्ही मा.शहर सुधारणा समितीत मेंबर होते. तेव्हा आम्ही या अधिका-यांना पायदळी तुडवले होते. गुडघ्यावर आणले होते. दूर्दैवाने आम्हाला प्रशासनाकडून साथ मिळाली नाही. मा.प्रशांत शितोळे असतील, मा.उल्हास शेट्टी असतील, मा.सुरेश म्हेत्रे,मा.आर.एस.कुमार होते, ही सगळी मंडळी आली होती. ही सगळी हुशार मंडळी बंगल्यात रहायला आहेत. तरीसुद्धा त्यांना गरीबांसाठी कळवळा आहे. गरीबांसाठी काहीतरी करायचे म्हणून आम्ही सगळे एकत्र आलो होतो. झोपडपट्टी कमिटीत विषय गाजवायचो. कमिटीची मिटींग तीन तीन/चार चार तास चालायची. किती टॉयलेट ब्लॉक्स बांधले, कुठे काय बांधले याचा सगळा लेखाजोखा आम्ही घ्यायचो. आम्हालापण गरीबांचा कळवळा आहे. बंगल्यात राहतो, फ्लॅटमध्ये राहतो म्हणून काहीच वाटच नाही असे नाही. अभीभी दिल धडकता है, मेलेला नाही. मा.महापौर साहेब, केंद्र शासनाने उद्योगनगरमध्ये ८०० सदनिकांचा पुनर्वसन प्रकल्प रु.२०.१२ कोटींमध्ये राबवायला मान्यता दिली होती. त्यानंतर सुधारीत डी.पी.आर.प्रमाणे ८०० सदनिका बांधायचा घेतलेला निर्णय व प्रत्यक्षात एकही सदनिका त्याठिकाणी बांधण्यात आलेली नाही. उद्योगनगरच्या प्रकल्पाबाबतीत हायकोर्टात कोणतीही याचिका दाखल नाही. मग हा प्रकल्प का रद्द केला. हे सांगायची तसदीसुद्धा तुम्ही घेतली नाही. अधिकारी म्हणजे महापालिकेचे जावई आहेत. मग जावयाला कसे विचारायचे म्हणून आम्हीपण भीतभीत विचारतोय, का रद्द केला, ते तरी सांगा. मा.महापौर साहेब, प्रशासनाकडून या विषयाचे स्पष्टीकरण निश्चितपणे घ्यावे.

मा.महापौर साहेब, मिलिंदनगर, विजयनगर, अजंठानगर, वेताळनगर, उद्योगनगर व सेक्टर २२ या प्रकल्पांसाठी एनव्हायर्नमेंट क्लिअरन्स आत्ता घेतले आहे. मग त्यासाठी

अभिनंदन करायचे का दंड मारायचा. खरेतर तुमच्यावर कारवाई झाली पाहीजे. तुमचे रु.१० लाखाचे डिपॉझिट जप्त केले. उशीरा का होईना ते मिळाले हरकत नाही. तुमच्या विषयपत्रात आहे. कन्सेन्ट टू ऑपरेट मिळायला बराच कालावधी लागला असे आपण नमूद केले आहे. खरेतर पूर्व परवानगी घ्यायची गरज असताना, नियम असताना आपण पोस्ट परवानगी घ्यायला गेलो. एखादा प्रायव्हेट बिल्डर आलातर त्याला फि असते मग तुम्हाला सूट का द्यायची? हे आम्ही समजू शकतो तुम्ही महापालिका आहे, शासन आहे. परंतू याठिकाणी तुमच्यावर आक्षेप घेतला. शासनाला कळवले होते. एनव्हायर्नमेंट विभागाने पत्रव्यवहार केल्यानंतर आपण दि.१५ जुलै २०१० रोजी अर्ज केला होता. खरेतर एनव्हायर्नमेंट क्लिअरन्स घ्यायचे काम कोणाचे होते. सल्लागार यांना हा प्रश्न कोणी विचारलेला नाही. तो महापालिकेत यायचा, मेल आयडीवर कोरे पत्र मागवायचा, व त्यावर पेनाने लिहायचा. त्याने कोट्यावधी रुपये घेतले आहेत. टाईप करुन दे पण नाही. तो तिथे बसून अधिकारी किंवा एखाद्या कर्मचा-यांकडून पत्र लिहून घ्यायचा, खर्डेघाशी करायची. काही पत्रे तर त्याच्या सहीचीच नाहीत. त्याला नंतर आपण इनवर्ड केले आहे. त्याला इन-वर्ड नंबर नाही, आऊट-वर्ड नंबर नाही. ठेकेदारांना किती दिवस पोसायचे काम करणार आहात. आपण लोकहिताचे काम करण्यासाठी नगरसेवक झालो आहोत. त्यांना पोसण्यासाठी आलो नाहीत. मा.महापौर साहेब, खरेतर याठिकाणी शिक्षाच व्हायला पाहिजे होती. जी एनव्हायर्नमेंटची पोस्ट आपण घेतली आहे. खूप गुन्हे केले आहेत. त्यातला हा एक गुन्हा. मला फक्त गरीबांचा कळवळा नाही तर खरोखरच त्यांच्याबद्दल ओलावा आहे, माझ्या मनात दया आहे, माया आहे. माझी आपल्याला विनंती असेल, आयुक्तांनी खरेतर प्रकल्प सल्लागारांवर काय कारवाई करणार याचे स्पष्टीकरण द्यावे. प्रकल्प सल्लागार यांनी जे बेजबाबदारपणे काम केले. त्यांच्यावर दंड लावला पाहीजे. नाहीतर चुकीचे काम रेटून नेणा-या प्रवृत्तीला चाप लागणार नाही. याठिकाणी सभागृहात मांडायचा आम्ही सनदशीर मार्गाने प्रयत्न करतोय. परंतू नगरसेवक म्हणून असे असते. काहीतरी कोणीतरी विरोधात असतो. कोणी काहीतरी वेगळा चित्रपट तयार केलेला असतो. त्यात आम्ही फीट बसत नाही म्हणून आम्ही कायम बाहेर फेकले जातो. आमचे म्हणणे ग्राह्य न धरून तुम्ही इथे काम करु शकणार नाही. नियमांत राहून काम करा. नियम दाबून काम करत असालतर अजिबात योग्य नाही. खरेतर हे सगळे विषय हायकोर्टापुढे मांडले. खूप लोक विचारतात. हायकोर्टात माझे चारशे/पाचशे पानांचे रिट पिटीशन आहे. त्यातला सेक्टर २२चा रेडझोनचा माझा विषय सगळ्यात छोटा आहे. त्यात मी भ्रष्टाचारावर जास्त बोट ठेवले आहे. दूर्दैवाने रेड झोन आला. माझ्या आधी मे.एस.एन.असोसिएटस् यांचे रेडझोनवर रिट पिटीशन चालू होते. त्यांच्या रिटी पिटीशनला माझे हे रिट पिटीशन जॉइंट केले. त्यांच्या केसमध्ये निर्णय दिला की सेक्टर २२ रेडझोनमध्ये येते. आणि मला त्यांच्याबरोबर फरफटत जावे लागले. माझ्या रिट

पिटीशनवर अजून निर्णय व्हायचा आहे. टेक्निकल सँक्शन हा प्रकार असतो का नाही? कोणत्याही कामाची निविदा काढण्यापूर्वी त्या कामाची तांत्रिक मान्यता घ्यावी लागते. सेक्टर २२, वेताळनगर, मिलिंदनगर, उद्योगनगर, विठ्ठलनगर येथील प्रकल्पांवर रु.६१० कोटींची निविदा सँक्शन करताना टेक्निकल सँक्शन घेण्यात आले नव्हते. वर्कऑर्डर दिल्यानंतर २ वर्षांनंतर प्रकल्पाचे टेक्निकल सँक्शन घेण्यात आले. मी याठिकाणी सभागृहापुढे महापालिकेच्या भ्रष्टाचाराचा एक छानसा नमूना सादर करते. तत्कालिन अति.अधिक्षक अभियंता एम.एम.सावळे यांनी दि.१३/१०/०९ रोजी क्रमांक-अअअ/ताम/१४/२००९ रोजी सदर प्रकल्पापैकी सेक्टर २२ येथील २२४० सदनिकांच्या बांधकामासाठी रु.४७.८ कोटी खर्चाचे टेक्निकल सँक्शन दिले. व या कामासाठी त्यांना विना क्रमांक असलेले अंदाजपत्रक दि.२३ डिसेंबर २००९ रोजी मिळाले. ऑक्टोबर पहिल्यांदा का डिसेंबर येतो. त्यांना शरम सुद्धा वाटली नाही. १३ ऑक्टोबरला सांगतात, की २३ डिसेंबरला म्हणजे जे पुढे होणार आहे ते मला आजच कळाले आहे. किती भ्रष्टाचार करणार. आयुक्तांनी यात लक्ष घालावे. सोन्याचा धूर निघणारी ही महापालिका आहे. आता हातात कटोरा घेऊन भीक मागायची वेळ आणणार आहात आमच्यावर. यात करदात्यांचा काही दोष नाही. तुमच्या नाकर्तेपणामुळे व प्रशासनाच्या भ्रष्टाचारामुळे आज या परिस्थितीला आलो आहोत. खुशाल सांगतात, २००९ रोजी ही माणसे पत्र लिहीतात. दि.२३ डिसेंबर २०१३ रोजी टेक्निकल सँक्शन मिळाले, काय बोलणार. असे कसे होऊ शकते. मग आम्ही विरोध करायचा नाही, आम्ही बोलायचे नाही. हे पत्र आहे, ते तुम्ही बघितलेतर तुम्हाला कळेल लेटर कम्प्यूटरवर छापले आहे. सही नाही, पत्ता नाही, फोन नंबर नाही. टेक्निकल सँक्शन घेतो म्हणजे काय करतो. फोन नंबर, पूर्ण नाव, पत्ता, ई-मेल आयडी, लॅण्डलाईन नंबर असतो. यावर काहीच नाही. दिनांक १३ ऑक्टोबर २००९ रोजी अतिरिक्त अधिक्षक अभियंता एम.एम.सावळे यांना दि. २३ डिसेंबर २००९ चे रु.४७.८ कोटींचे अंदाजपत्रक मिळाले म्हणजे त्यांना ३ महिने अगोदर अंदाजपत्रक मिळाले. ही किमया फक्त पिंपरी चिंचवड महापालिकेतच घडू शकते. श्री.एम.एम.सावळे यांनी दि.२२ ऑक्टोबर २००९ रोजी क्रमांक अअअ/ताम/१६/२००९ रोजी सेक्टर २२ साठी २४०० सदनिकांचे बांधकामासाठी रु.५०.४४ कोटींचे टेक्निकल सँक्शन दिले व या कामाचे विना क्रमांक असलेले अंदाजपत्रक त्यांना दि.२३ डिसेंबर २००९ रोजी मिळाले असे नमूद केले. अशा खोट्या मान्यता सर्व प्रकल्पांसाठी तयार करण्यात आल्या. पुरावे दिले तर काहीतरी कारवाई झाली पाहीजे. तुम्ही कारवाई केली नाहीतर तुम्हाला वेगळ्या पद्धतीने करावेच लागेल. पुरावा दिला आहे. तुम्ही म्हणता, मला माहितच नव्हते. मला वाटते कमिशनरांना माहित नसताना अधिकारी असे कसे खोटे बोलतात नंतर कळते. कमिशनर यांना सगळे माहित असते. ते फक्त आमच्यापुढे आव आणतात की मला माहितच नव्हते. खोटे काम करण्यासाठी कमिशनरांपुढे अहवाल जातो. मलाही हे माहित नव्हते. या विषयपत्रिकेत एका

अधिका-यावर कारवाई करायचा विषय आला आहे. यांच्यावर सुद्धा कारवाई करायचा विषय समोर आणा. तुमच्यापुढे डोके टेकले. म्हणजे चोरी केली, भ्रष्टाचार केला, डाका टाकला काहीही केलेतरी मी सुटलोच का. मा.महापौर साहेब, ज्या गरीबांच्या कष्टांच्या पैशांचे मग ते मागासवर्गीय असतील, गोरगरीब, खालच्या स्तरावर काम करणारी मंडळी आहेत, त्यांच्या पैशांची अशा प्रकारे विल्हेवाट लावता. तुमच्या मनात त्यांच्याबद्दल काय भावना आहेत. खोट्याला पाय नसतात आणि सत्य कधी लपत नसते. एक खोटे केले की दहा खोटे करावे लागते. खोटं वर येणारच. ज्या गरीबांच्या पैशांवर आज त्या ठेकेदाराला व सगळ्यांना आम्ही पोसले त्यांच्या कष्टांची, पैशांची काही किंमत आहे का नाही? काही करणार आहात का नाही? खरेतर आयुक्त साहेबांनी याचे उत्तर सांगायचे आहे. तुम्हाला उत्तर द्यावेच लागेल. इथे नाही दिलेतरी तिथे द्यावे लागेल. पण द्यावे लागेल. जळगावला एक प्रकरण झाले. त्यात मोठमोठे नेते गेले, अधिकारी सुद्धा गेले. उद्या आपल्या महापालिकेचा नंबर लागू नये. लागलातरी कोणाला नवल वाटू नये एवढेच सांगते. मा.महापौर साहेब, झोपडपट्टी पुनर्वसनाची परत एकदा आठवण करुन देते. २६९ फूटाची सदनिका विनामूल्य देण्याची अट असताना त्यांच्याकडून पैसे घेतले. १० टक्के हिस्सा घेण्याऐवजी तुम्ही तयार सदनिकेच्या १० टक्के घेतले. डिपीआर प्रमाणे १० टक्के घ्यायला पाहीजे होते. डीपीआरप्रमाणे घेतले नाही. तयार सदनिकेची जी कॉस्ट येते त्याच्या १० टक्के प्रमाणे घेतले. संविधानाने तयार झालेला कायदा व कायद्याने तयार झालेले नियम, नियम हे कायद्याला कधी सरपास करु शकत नाहीत. म्हणून तुम्ही झोपडपट्टीधारकांना पैसे देणे लागता. तुम्हाला द्यायला लावणार. त्यांचे पैसे आज किमान वाटप चालू आहे. इथेतरी तुम्ही दुरुस्ती आणा. १९९५चे लाभार्थी असतील त्यांना इथे करा.

मा.महापौर साहेब, एक विषय पुढे आला. वेताळनगरला चिंचवडमध्ये ज्याठिकाणी २६९ फूटाचे गाळा द्यायला पाहीजे. जो झोपडपट्टीत राहतो त्याला २६९ फूटाची सदनिका द्यायला पाहीजे. मग त्याचे दुकान असू दे. त्याचे घर असू दे. घरातच त्याचे दुकान असते. तुम्ही गाळे बांधले पण प्रशासनाने विचारायची तसदी सुद्धा घेतली नाही. काहींचे १०० फूटांचे, काहींचे १५० फुटांचे आहेत. सरसकट असे उल्लंघन करता. कमर्शियल असेल म्हणून काय झाले. झोपडपट्टीधारक घरापुढे छोटे दुकान टाकतो व पाठिमागे राहतो. एकच खोली असते. देताना तसेच देणार आहात ना. त्यांना वेगळी घरे दिलेलीच नाहीत. असे काम कसे काय केले आहे. तुमच्या प्रशासनाला, सन्मा.राजन पाटील आहेत त्यांना विचारा. त्यांनी हा चमत्कार कसा काय घडवला आहे. खरेतर मला इतके बोलायचे आहे. परंतू काही गोष्टी सांगितल्याशिवाय सुद्धा राहवत नाही. प्रत्येकाला जायची घाई आहे. झोपडपट्टी पुनर्वसनाचा विषय आहे व आयुक्त साहेबांनी हा विषय हायकोर्टात पेंडींग असल्यामुळे सिमित करतो आहोत असे सांगितले. आयुक्त साहेबांनी जे बील फाडायचे काम केले म्हणून बोलावेच लागते आहे. मा.महापौर साहेब,

पुनर्वसनाच्या प्रत्येक योजनेत काही क्षेत्र विक्रिसाठी ठेवले आहे. त्याठिकाणी फ्रंट भाग आहे तो विक्रीसाठी ठेवला आहे. राज्य शासनाच्या नगरविकास विभागाला दि.२४ डिसेंबर २००८ रोजी जेएनएनयूआरएम बाबतीत आदेश दिला होता. सदर आदेशामध्ये ज्याठिकाणी व्यवहार्य होत नसेलतर, म्हाडाच्या पूर्व मान्यतेने २५ टक्के विक्रीयोग्य दर्जा म्हणून अनुज्ञेय होऊ शकेल अशी तरतूद करण्यात आली होती. महापालिकेच्या सर्वसाधारण सभेने गोरगरीब झोपडीधारकांकडून केवळ रु.१०,०००/- लाभार्थी हिस्सा घ्यावा व उर्वरीत रक्कम विक्रीयोग्य घटकांच्या माध्यमातून अदा करण्यात यावी, असा ठराव दि.२२ ऑक्टोबर २००७ रोजी ठ.क्र.१८५ अन्वये या सभागृहाने मंजूर केला होता. परंतू या महापालिका सभेने आत्तापर्यंत जे जे ठराव केले असतील, जे ठराव होतील, ते ब-याच अंशी यांनी कच-याच्या टोपलीत टाकले आहेत. पुढील महिन्याच्या सभेत माझे प्रश्न असणार आहेत. एकदा आदेश दिल्यानंतर त्याचे पालन व्हायलाच पाहीजे. तुम्ही पालन न करता तुमच्या सोयीचे काय आहे ते बघून तुम्ही काम करता. केंद्र शासन व राज्य शासनाच्या प्रकल्पाच्या मंजूर खर्चाच्या प्रमाणात मंजूर हिस्सा देता. मग वाढीव खर्च झाला तो तुमच्या भ्रष्टाचारामुळे झाला. तुम्ही दर जास्त दराच्या निविदा स्विकारल्या नसत्यातर गाळ्यांची किंमत सुद्धा वाढली नसती. गाळ्यांची किंमत वाढली तर वाढू दे पण तुम्ही डीपीआरप्रमाणे घेतले असते तर त्या लोकांना परवडणारी घरे होती. त्याचा भार तुम्ही झोपडपट्टीधारकावर का टाकलात. याचा सुद्धा जाब विचारला पाहीजे. प्रत्येकाच्या भागात झोपडपट्टी आहे. तिथे छोटी/मोठी घरे आहेत. त्या त्या भागाचा प्रतिनिधी म्हणून आमची नैतिक जबाबदारी आहे.

मा.महापौर साहेब, प्रकल्प वेळेत पूर्ण न होण्याची कारणे प्रशासनाने दिलेली आहेत. त्यामध्ये लाभार्थ्यांना इमारतीचा ताबा देणा-या महापालिकेच्या झोपडपट्टी पुनर्वसन व निर्मूलन विभागाकडून प्रशासकीय बाबींची पूर्तता विहीत मुदतीत न झाल्यामुळे बांधकाम पूर्ण झालेल्या इमारतीचा ताबा लाभार्थ्यंना वेळेत देता आला नाही. इमारतीचा ताबा वेळेत न दिल्यामुळे इमारतींच्या बांधकामासाठी जागा साईट उपलब्ध झाली नाही. म्हणून घरे उपलब्ध करता आली नाहीत असे कारण प्रशासनाने दिलेले आहे. जेएनएनयूआरएम व बीएसयूपी या योजनांना मंजूरी देताना पात्र ठरलेल्या लाभार्थ्यांची यादी बांधकाम सुरु करण्यापूर्वी निश्चित करायला पाहीजे होती. तसे बंधनकारक आहे. नियम आहे. तसेच झोपडपट्टी पुनर्वसनाच्या कायद्यातील तरतूदीप्रमाणे प्रकल्प मंजूर झाल्यानंतर पात्र लाभार्थ्यांची यादी घोषित करणे बंधनकारक आहे. याने काय झाले असते, याद्या पहिल्या घोषित झाल्या असत्या. कळाले असते, सिमा सावळे, मी म्हणाले असते माझी काय हरकत नाही मला लगेच स्थलांतरीत करा. शकुंतला धराडे, त्या म्हणाल्या असत्या माझी काय हरकत नाही मला लगेच स्थलांतरीत करा. तुम्ही बेसिक वर्कच केले नाही. कारण तुमच्या झोपडपट्टी पुनर्वसन विभागामध्ये मोठा बाजार चालतो. लाख-लाख,

दीड-दीड लाख घेतले जातात. वेताळनगरला एका सदगृहस्थाने आत्महत्या केली होती. कारण तो पैसे देऊ शकला नसता. त्याने गळफास घेतला. त्यावेळी मीच होते. सगळे झोपडपट्टीधारक ऑफीसमध्ये घुसले होते. लोकांनी तोंडावर सांगितले होते. हा एवढा पैसा घेतो. हा एवढे पैसे मागतो. हा अधिकारी सांगतो, तु पात्र नाही मी तुला पात्र करतो. १५६ लोकांची यादी होती. १५६ पैकी १४६ लोक पात्र होते. त्याठिकाणी असणारे कर्मचारी लाख दीड लाखाखाली पैसे मागत नव्हते. नागरीकांनी तोंडावर सांगून सुद्धा त्यांच्यावर कारवाई केली नाही. आम्ही त्याठिकाणी इन-कॅमेरा सुनावणी घेतली. महापालिकेच्या कक्षात बसून १५६ पैकी १४६ लोक पात्र केले. त्या गरीबांचे आम्हाला आशिर्वाद मिळाले आहेत. आम्ही म्हणालो नाही, आम्हाला एवढे टक्के द्या. आम्ही तुमचे काम करतो. त्यावेळी तुम्हाला गरीबांचा कळवळा आला नाही. उसने आवसान आणतात. जो कॅमेरा होता तो ओपन करायला पाहिजे होता. मा.महापौर साहेब, सेक्टर २२ येथील प्रकल्पामध्ये २०० लाभार्थ्यांनी पात्रतेसाठी सादर केलेल्या पुराव्यांची मी पडताळणी केली. त्यापैकी तब्बल १४१ पात्र नावे बोगस निघालीत. २०११ पासून तुमच्याकडे हा अहवाल धूळ खात पडलेला आहे. माझ्याकडे त्या प्रकल्पातील काही नागरीक मला भेटायला आले होते. त्यांची नावे या यादीत होती. त्यांची कागदपत्रे बोगस होती. त्यात एक मुलगी एका विशिष्ट समाजाची होती. ती म्हणाली, हमारी कायको कंम्प्लेण्ट करे है। मी म्हणाले, काय को नही कर रहे है, तुम्हारे कागदपत्र गलत है। ती म्हणाली, नाही असे करु नका. आम्ही बरेच वर्षांपासून तिथे रहात आहोत. मी म्हणाले, तुझे आईवडील रहात होते का, तुझे सासू सासरे रहात होते का. तू कुठून आलीस. तुझे मूळ गाव कोणते आहे. ती म्हणाली, जिल्हा परगणा. हा जिल्हा परगणा कुठे आला तर तो बांग्लादेशमध्ये आहे. मी तिला म्हणाले, यहाँ कबसे आए है। ती म्हणाली बच्ची पेट में थी तबसे आए है। मी तिला म्हणाले, बच्ची कितने साल की है? ती म्हणाली, बच्ची दो सालकी है। तिला २ वर्षाची मुलगी आहे. त्या बाईने आपल्या महापालिकेच्या वैद्यकीय विभागाकडून जो जन्मदाखला मिळतो, त्यात तिला ही मुलगी दि.१/१/९५ आधीची झालेली सांगते. म्हणजे वयाच्या दुस-या वर्षी तिला मूल झाले. असे २०० लोकांचे पुरावे तपासले. त्यात १४१ लोक बोगस निघाले आणि तरी तुम्ही म्हणता मी बोलायचे नाही. जर मी नगरसेवक आहे, माझ्या वॉर्डातली पात्रता यादी बघितली असेल. मला माहित आहे, माझ्या वॉर्डमध्ये कोण राहते, कोण नाही. मला माहितीच पाहीजे. माझी जर नाळ गरीबांबरोबर जोडली असेलतर मला शंभर टक्के माहितीच पाहीजे. जर मला हे माहित नाही तर मी का म्हणेन मी भ्रष्टाचार केला नाही म्हणून. तुमच्याकडून एखाद दुसरा कागद बघितला जाऊ शकत नाही. पण २०० पैकी १४१. तुमचे त्यात प्रमाण काय होते? तरी म्हणता बोलायचे नाही. कोणीतरी तुमचे पोट भरायचे दुकान बंद केले, म्हणून बोलायचे नाही. तिथे छोटे मोठे कार्यकर्ते असतील, कोणी असतील, तुम्ही तिथे गल्लीत जाऊन विचारा. अंध लोक भीक

मागतात. लोणावळ्याच्या गाडीत बसून भीक मागतात. त्यांच्याकडून सुद्धा या नराधमांनी पैसे घेतले होते. मला लाज वाटते. मी या महापालिकाची सदस्य आहे म्हणून माझ्याकडे व्हिडिओ रेकॉर्डींग आहे. ते लोक माझ्याकडे आले होते. मी त्यांना सांगितले, तुम्ही चहा घ्या. छानपैकी नाष्टा करा. मी आत्ता कॅमेरा चालू करते. मग तुम्ही सगळे माझ्याशी बोलायचे. तुम्ही कॅमेरा का चालू करता असे ते म्हणाले. मी त्यांना म्हणाले, माझ्यावर वारंवार आरोप करतात. मी इथे ही क्लिपींग दाखवायला तयार आहे. मला कोणाला बदनाम करायचे नाही. माझे कोणाशी वैयक्तिक भांडण नाही. त्यांनी सांगितले. मी त्यांना सांगून कॅमेरा चालू केला. आणि सांगितले, आता तुम्ही माझ्याशी बोलू शकता. का तर मला या सगळ्या आरोपातून कुठेतरी बाहेर पडायचे होते. मी त्यांना विचारले, तुम्ही काय काम करता. नवरा बायको दोघेही अंध आहेत. ते म्हणाले, ताई आम्ही भीक मागतो. कोण म्हणाले मी खंजीरी वाजवतो, कोण म्हणाले मी बेल विकतो. तुम्हाला लोकांचे मागवलेले अन्न व भीक मागून जमा केलेले पैसे पूरत नसतील तर थू आहे तुमच्या जिंदगानीवर, त्या अधिका-यांवर, ज्यांनी यांच्याकडून पैसे घेतले असतील. तुमची पोरंबाळं कधी सुखी राहणार नाहीत. गरीबांचा आव आणता. १४१ लोकांचा अहवाल सभागृहासमोर का ठेवत नाहीत? दूध का दूध, पानी का पानी होईल त्या दिवशी. जिल्हा परगणातून आलेल्या बाईला वर्षभरात घर मिळतेच कसे? मग बोलले, मग आक्षेप घेतला तर हे गरीबांच्या विरोधातले. विकास कामाला घोडा घालणारे. त्यांच्या पायात चप्पल नव्हती, पाय फाटलेले, कपडे फाटलेले. लाज वाटली पाहीजे त्यांच्याकडून पैसे घ्यावेत. त्यांच्याकडून पैसे घ्यायला कोणाला काहीच वाटू नये. वर्ष/सहा महिन्यांत रहायला आलेत त्या लोकांना घर मिळते आणि जे २० वर्षे, २५ वर्षे झोपडपट्टीत राहतात त्यांना घर मिळत नाही. म्हणून पात्र अपात्र यादी त्याचवेळी जाहीर करायला पाहीजे होती. म्हणजे तिथे भ्रष्टाचाराला जागा राहीली नसती. पण कसे करणार? कारण तुमचे प्रशासन या खेळात तेवढेच भागीदार आहे. तुमच्यामुळे आम्ही व आमच्यामुळे तुम्ही फुगवता. २०११ पासून यासंदर्भातल्या तक्रारी टेबलवर होत्या. सन्मा.इंगळे साहेबांनी त्यासाठी चौकशी केली. त्यांनी अहवाल दिलेला आहे. अहवालात स्पष्टपणे नमूद आहे. हे १४१ दाखले बोगस आहेत. आपल्या वैद्यकीय अधिका-यांच्या त्याच्यावर सह्या आहेत. मा.महापौर साहेब, तुम्ही लग्नाला जा. तुम्ही नसलात तर दुस-या कोणाला तरी बसवा तरी चालेल. पण झोपडपट्टीविरोधात मी अजिबात खपवून घेणार नाही. मा.महापौर साहेब, आयुक्तांकडे मी लेखी मागणी केली आहे. हा अहवाल प्रसिद्ध करायला पाहीजे. तुम्ही सभागृहासमोर ठेवा. आणि नाव द्या माझे की सिमा सावळेमुळे हा अहवाल ठेवला. मला चालेल कारण २५ वर्षे तिथे राहिलेल्या माणसाला घर मिळालेच पाहीजे. तो पात्र आहे. त्याचा अधिकार आहे. त्याच्या जागेवर दुसरा कोणी घुसखोरी करत असेलतर ते बघणे सुद्धा तुमचेच काम आहे. दि.११ फेब्रुवारी २०१३ रोजी आयुक्तांना लेखी स्वरुपात मी मागणी दिलेली आहे. सदर प्रकाराची

सखोल चौकशी करायची मागणी केली होती. मा.आयुक्त साहेब, तुम्ही चौकशी केलीत पण अजून काही कारवाई केली नाही.

तत्कालिन आयुक्त डॉ.श्रीकर परदेशी, अति.आयुक्त श्री.प्रकाश कदम यांच्या अध्यक्षतेखाली मनपाचे सहा.आयुक्त श्री.सतिश कुलकर्णी, मुख्यलेखापरिक्षक श्री.बबन धाडगे यांच्यासह त्रिसदस्यीय समिती स्थापन करण्यात आली होती. तत्कालीन अति.आयुक्त श्री.प्रकाश कदम यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी सुरु करण्यात आली होती. दरम्यानच्या काळात त्यांची बदली झाली. त्यानंतर रुजू झालेले अति.आयुक्त श्री.तानाजी शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली पुढील चौकशी संपन्न झाली. मा.महापौर साहेब, या त्रिसदस्यीय समितीने प्रकरणाची चौकशी करुन त्याबाबतचा चौकशी अहवाल दि.२८ ऑक्टोबर २०१३ रोजी महापालिका आयुक्तांना सादर केला आहे. सदर अहवालात उपस्थित केलेले जवळजवळ सर्वच मुद्दे मान्य करण्यात आले होते. सेक्टर २२ पुनर्वसन प्रकल्पामधील लाभधारकांकडून पात्रतेसाठी बनावट कागदपत्रे सादर केल्याची बाब त्रिसदस्यीय समिती अहवालात दिलेल्या निष्कर्षात मान्य केली. व संबंधित अधिका-यांकडून विचारणा करण्यात यावी असेही या त्रिसदस्यीय अहवालात नमूद आहे. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, जे २०० पैकी १४१ लोक तिथे बोगस निघाले. म्हणजे तुम्ही सांगा. १९९५ चे जे लाभार्थी असतील त्यापैकी किती लोकांवर अन्याय झाला आहे. इथे २००च तपासले आहेत. तुमच्याकडे तर तपासायला खूप यंत्रणा आहे. मग जे जुने होते. खरोखरीच इतकी वर्षे जे गोरगरीब खितपत पडले होते त्यांना घर द्यायला पाहीजे. यांना दिले याचा राग नाही. त्यांना डावलून यांना दिले याचा राग आहे. खरे लाभार्थी बाजूलाच ठेवायचे. मग हा किती देतो, तो किती देतो. मग जे पैसे देतात त्यांना घर द्यायचे. जे खरे लाभार्थी आहेत त्यांना द्यायचेच नाही. आजही खरे लाभार्थी झोपड्यांतच, संक्रमण शिबिरांतच रहात आहेत. त्यांचे हक्काचे झोपडेसुद्धा काढून घेतले. त्यांना पक्के घर सुद्धा देत नाही. कारण काय तर ते तुमच्या व्यवहारात बसत नाहीत. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, या पात्र झालेल्या लोकांवर खरेतर आपण कारवाई केली पाहीजे. झोनिपू विभागाच्या सक्षम प्राधिकारी यांनी चौकशी अहवालात बोगस अहवाल सादर करणा-या १२९ लाभार्थी अपात्र ठरत असल्यामुळे पुढील कार्यवाही करण्यास मान्यता मिळावी म्हणून प्रस्ताव मागील वर्षी सादर केला आहे. कारचे साहेब असताना हा निर्णय झाला होता. त्यांनी सुद्धा १४१ पैकी १२९ जणांना बोलवले. बाकी १२ लोक आले नाहीत. १२९ आले त्यांना सुनावणी घेऊन सुद्धा प्रत्यक्ष बसून विचारले. ते कागदपत्रे सादर करु शकले नाहीत. जे खरे लाभार्थी असतील त्यांना द्या. त्यांचे घराचे स्वप्न पूर्ण होऊ दे. महापालिकेने राबविलेल्या पुनर्वसन प्रकल्पातील पात्र करण्यात आलेल्या लाभार्थ्यांनी पात्रतेकामी सादर केलेल्या कागदपत्रांची यादी सक्षम प्राधिका-यांनी करावी असे मा.तानाजी शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या त्रिसदस्यीय समितीने निर्णय केला व आयुक्त

साहेबांना अहवाल सादर केला आहे. मी सेक्टर २२ मधील एक किस्सा सांगते. एक सन्माननीय आहेत, प्राधिकरणात राहणारे. त्यांनी मला सांगितले, माझ्याकडे धुणी-भांडी करणारी एक बाई आहे. तिला पन्नास हजार पाहीजेत. तिला झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत घर मिळते आहे, असे तिने त्यांना सांगितले. ते तिला म्हणाले, तू पंचवीस/तीस वर्षांपासून तिथे रहायला आहे. तुम्हाला पैसे कशाला लागत आहेत. तुम्ही कास्टमध्ये येता. तुमचे काम कमी पैशांत भागणार आहे. असे ते तिला म्हणाले. त्यांनी तिथे असणा-या संबंधित व्यक्तीला फोन केला. या बाई माझ्याकडे आल्या आहेत. १७/१८ हजार लागतात ते द्यायला मी तयार आहे.. ती मला म्हणाली, माझ्याकडे पन्नास हजार जमा आहेत. पन्नास हजार तुम्ही द्या. मला एक लाख द्यायचे आहेत पात्रता यादीत येण्यासाठी. त्या बाईचे नाव आजही पात्रता यादीत नाही. त्यांच्या मुली आज माझ्या वयाच्या आहेत. त्या पात्र झाल्या नाहीत. म्हणजे त्या पैसे देऊ शकल्या नाहीत म्हणून त्यांना घर मिळाले नाही. त्यांचे कोणीच वाली नाही काय? त्यांना घर कधीच मिळणार नाही का. जोपर्यंत वरच्यांच्या हातात पैसा देत नाही. जे पात्र होते, त्यांना सुद्धा पैसा द्यायला लागला आहे. जे नव्हते त्यांना तर दिलेच. तो सुद्धा गुन्हा आहे. एकतर उसनवारी करुन आणलेले पैसे, इकडे दिलेले पैसे, दहा टक्के भरलेली रक्कम. एखाद्याने पोट भागवायचं का हप्ता भरायचा. त्यांच्या दारावर बँकेची नोटीस लागलेली दिसते. मा.महापौर साहेब, हे आपलेच लोक आहेत, गोरगरीब आहेत, हातावर पोट भरणारे आहेत. ज्यांच्यावर अन्याय झाला त्यांना न्याय देण्याचे काम तुम्ही केले पाहीजे. त्यांचे पैसे परत करा. जेणेकरुन बँकेचे हप्ते तरी भरतील. मा.महापौर साहेब, खरेतर पैसे कोणाकडून घ्यायचेत याचा ताळमेळ प्रशासनाला राहिलेला नाही. घाण उचलणारे, धुणी-भांडी करणारे, रस्त्याच्या कडेने भंगार शोधत फिरणारे हातात मॅग्नेट घेतात व रस्त्याच्या कडेने फिरवत बसतात, कुठे लोखंड मिळते का काय, अशांकडून पैसे घेतात. देव त्यांना आयुष्यात कधीच सुखी करणार नाही. तुमच्यामागे कायम भोंगा राहणार. कारण भीक मागवून आणणा-या लोकांकडून यांनी पैसे घेतले असतील तर याची शरम वाटली पाहीजे. तुमचे नक्कीच वाट्टोळे होणार आहे. एक दिवस देव तुम्हाला गरीबांच्या दारात हातात कटोरा घेऊन उभं रहायला लावणार. गरीबांचा कैवारी असल्याचा नुसता आव आणून भागत नाही. त्यांचा कळवळा असल्याचे नाटक करुन भागत नाही. तेवढी आंतरीक क्षमता लागते, तसे तुमचे मन सुद्धा लागते. याठिकाणी अंध झाले, गोरगरीब झाले, धुणीभांडी करणा-या झाल्या, हे सगळे लोक प्रशासनाला तेवढेच माहित आहेत. माहितअसून सुद्धा पात्र लोकांना अपात्र केले आहे. आत्ता एक कायदा आला आहे, त्यात आपण सगळ्यांना घर देऊ शकतो. रेट्रोस्पेक्टीव्हप्रमाणे तुम्ही काम करु शकणार नाही. खरे पात्र आहेत त्यांची चौकशी करा. त्यांना घर द्या. आमचे महापालिकेचे जावई आहेत त्यांना तिथून हलवा. तुम्ही सगळीकडे बदल्या करतात, तिथे बदल्या करत नाहीत. लाभार्थ्यांना घरांचा ताबा देण्याबाबत

मनपाच्या झोनिपू विभागाकडून प्रशासकीय बाबींची पूर्तता विहीत मुदतीत झाली नसल्यामुळे बांधकाम पूर्ण झालेल्या इमारतीचा ताबा वेळेत देण्यात आला नाही असे कारण प्रशासनाने दिले आहे. खरेतर प्रशासकीय बाबींची पूर्तता केली नसल्याचे झोनिपू विभागानेच मान्य केले आहे. झोपडपट्टी निर्मूलन विभागाने कामात कुचराई, प्रशासकीय बाबींची पूर्तता केली नसल्यामुळे कोणत्या अधिका-यांवर कारवाई केली ते सांगा. इतरांच्या दूर्दैवाने व आमच्या सुदैवाने आम्ही निवडून येतो हेच आमचे भाग्य आहे. म्हणून किमान प्रश्न तरी विचारु शकतो. तुम्ही आमच्या प्रश्नाचे उत्तर दिलेतरी काही लोकांच्या पोटांत पोटशूळ उठतो. मा.महापौर साहेब, एकातरी अधिका-यावर आयुक्तांनी कारवाई केली का याचा खुलासा करावा. कोणत्या कर्मचा-याला निलंबीत केले ते सुद्धा सांगावे. मा.आयुक्त साहेब,अशोक पासलकर नावाचा माणूस तिथे आहे. सेक्टर २२ च्या पात्र अपात्र पडताळणीसाठी २००८ पासून तिथे काम करतो. आत्ता त्याला लिंक रोडचे काम देण्यात आले आहे. त्याची चौकशी का केली नाही. तिथे गेल्यावर त्याचा ॲटीट्यूड बघा. तिथे काय चालते ते जाऊन बघा. जे सीसीटीव्ही इथे लावले आहेत, ते तिथे लावा. लोकं नाव घेऊन तिथे समोर बोंब मारतात. मी म्हणेन का मी कमिशनरांना पैसे दिले. दिले असलेतरी नाही म्हणणार. लोकं सांगतात. मोबाईलवर क्लिप काढतात. त्याला वेगवेगळ्या ठिकाणी बोलवतात. त्याचा आवाज टेप करतात. तरीसुद्धा २००८ पासून तो त्याच ठिकाणी आहे. ३ वर्षांत बदली व्हायला पाहीजे. आपण ३ वर्षांत त्याची बदली केलेली नाही. मा.महापौर साहेब, आपण कमिशनरांना त्याची त्वरित बदली करायचे आदेश द्यावेत. त्याच्या पाठिमागे कोणाचे आशिर्वाद असतील तर त्यांनी ते थोडे कमी करावेत. पैसे कुठून खायचे, कुठल्या घाणीतून खायचे याचीसुद्धा मर्यादा आहे. मी त्याची बदली करा म्हणून सांगीतले आहे. तो जर तुमच्याकडे माझी बदली करु नका म्हणून सांगायला आलातर मला सांगा मी त्याच्या पाया पडेन.

लिंकरोड संदर्भात ६७२ सदनिका बांधायला केंद्र शासनाने दि.२१ फेब्रुवारी २००९ ला मंजूरी दिली होती. प्रकल्पाचे बांधकाम २००९ मध्ये १५ महिन्यांत म्हणजे दि.२१ ऑगस्ट २००९ ते दि.२१ नोव्हेंबर २०१० मध्ये सुरु होणे खरेतर अपेक्षित होते. प्रकल्पाच्या बांधकामासाठी परत मे.बी.जी.शिर्के यांना विनानिविदा काम दिले आहे. रु.२५.३० कोटींचे काम विनानिविदा दिले होते. जर रु.२५.३० कोटींचे काम डायरेक्ट देणार असू, तर झोपडपट्टीत छोटे-छोटे ठेकेदार रु.९.५० लाखाचे काम करतात. छोट्या ठेकेदाराला पिळून पिळून घेणार. बी.जी.शिर्के मोठा म्हणून त्यांना डायरेक्ट काम. निविदा काढा मग बघा काय होते. नाव मोठे आहे त्यामुळे लगेच काम दिले. लिंक रोड पत्राशेड या प्रकल्पाचा डी.पी.आर केंद्रशासनाला सादर करण्यात आला. या डी.पी.आर. मध्ये प्रकल्पाचे ठिकाणी कोणतेही आरक्षण नसल्याचा दाखला तत्कालिन अधिक्षक अभियंता श्री.एम.एम.सावळे यांनी केंद्र शासनाला सादर केला होता. आडनाव एकच

आहे पण त्यांची व माझी कधी भेटच झाली नाही. त्यांनी जो कोणतेही आरक्षण नसल्याचा दाखला दिला म्हणजे स्वतःची तिजोरी स्वतःच लुटायची आणि घरात चोरी झाली म्हणून कांगावा करायचा. यांनी याठिकाणी शासनाला खोटे कळवले. यांच्यावर आरोपपत्र दाखल झाले पाहीजे, गुन्हा दाखल झाला पाहिजे. प्रत्यक्षात लिंक रोड पत्राशेडचा प्रकल्प, मैला शुद्धीकरण प्रकल्प व भाजी मंडई या जागेवर राबविण्यात येतो आहे. महापालिकेच्या डी.सी. रुलप्रमाणे आरक्षणाच्या जागेत प्रकल्पाचे काम करता येत नसल्यामुळे प्रकल्प सल्लागार मे.ओंकार असोसिएटस् यांनी पुण्याच्या झोपटपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या नियमावलीचा वापर करुन प्रकल्पाचे नकाशे सादर केले. दुस-याची प्लॅनिंग ऑथोरीटी वापरुन आपण आपल्याकडे नकाशे कसे सादर केलेत? ओंकार असोसिएटस् या प्रकल्प सल्लागाराला नोटीस निघालीच पाहीजे, त्याच्यावर कारवाई झालीच पाहिजे. या सभागृहाच्या वतीने मी विनंती करते. दूस-याचे नियम वापरुन आपण अशा पद्धतीने नकाशा पास करतो यापेक्षा दूर्दैव काय? तुम्ही विकास कामाला घोडा घालता असे म्हणता. हा कसला घोडा आला. मग आमच्या अंगावर लोक सोडायची. ज्यांनी हार घातले त्यांना खेटर मारायचा शंभर टक्के अधिकार आहे. तुम्ही सत्ताधारी आहात म्हणून तुम्ही काहीच बघायचे नाही. प्रशासन तुमच्या हातात आहे. म्हणून कोणताच नियम बघायचा नाही असे असेलतर तसे चालणार नाही. तुम्हाला नियमाने काम करावेच लागेल. मी करायलाच लावणार. आरक्षणाच्या ठिकाणी बांधकाम चालू असताना मी पत्र दिले. पण ते पत्र विचारात घेतले नाही. रु.२५ कोटींचे काम डायरेक्ट दिले होते. दि.६ सप्टेंबर २०१० रोजी महापालिकेने दिलेली परवानगी बेकायदेशीर असल्याची बाब मी तत्कालीन आयुक्त आशिष शर्मा यांच्या निदर्शनास लेखी पत्राद्वारे आणून दिली. प्लॅनिंग ऑथोरीटी, एसआरएचे डी.सी रुल आपण पुण्याचे वापरले. यांना कोणीच बघणार नाही का? दुस-याची प्लॅनिंग ऑथोरीटी वापरुन आपण नकाशा पास करु शकतो. मग नगररचना विभाग, बांधकाम परवाना विभाग कशासाठी ठेवला आहे? मग नगररचना विभाग, बांधकाम परवाना विभाग काढून टाका. कोणी असेलतर तो हायकोर्टात जाईल. सगळ्या शहराला नोटीस लावेल. तुमच्या प्रकल्पाला धक्का लागला की तुम्ही सगळे लगेच सावध. मग मिटींगवर मिटींग लावून रात्रीतून तुमचे जी.आर. निघाले आहेत. मी खूप आनंदी आहे की तुम्हाला किमान हे करायला भाग तरी पाडले. बांधकाम परवानगीचा अधिकार सी.ओ. यांना असताना आपल्याकडील तत्कालिन सहशहर अभियंता काची साहेबांनी सह्या केल्या होत्या. पेपरमध्ये बातम्या आल्या होत्या. महापालिकेचे काचीसाहेब एसआरएचे सी.ओ. केव्हापासून झाले. यावर कारवाई नाही. कारवाई करायची म्हटलेतर इथे मोठे जाळे आहे. मुळालाच छाटावे लागेल म्हणून कारवाई करायची नाही. जेवढे काम करायचे असेल ते तरी कशाला करायचे? म्हणून कोर्टाचा दरवाजा वाजवला. जेव्हा पत्र देऊन सुद्धा थांबले नाहीत तेव्हा कोर्टाचा दरवाजा वाजवला. आयुक्तांना माहीत असून सुद्धा मे.बी.जी.शिर्के

यांना विनानिविदा टेंडर दिले. भाटनगरचा प्रकल्प जाऊन बघा किती मोडकळीस आला आहे. पाच मिनिटे उभे राहून दाखवा. काय काम करतात. काय अवस्था झाली आहे. आजही गटारात उतरणारी माणसे, तुमची घाण उचलणारी माणसे तिथे राहतात. ही माणसे नाहीत का? जिन्यातल्या खिडक्या मोडकळीस आल्या आहेत. भिंतीना तडे गेले आहेत. एखाद्या प्रायव्हेट बिल्डरचे घर घेतलेतर आपण पन्नास/पन्नास वर्षे एका फ्लॅटमध्ये राहतो. बिल्डींग पडत नाही. ही बिल्डींग लगेच मोडकळीस आली आणि तरीसुद्धा मे.बी.जी.शिर्के यांना विनानिविदा द्यायचे. किती मेहेरबानी करायची व किती भ्रष्टाचार करायचा याला मर्यादा राहीलेली नाही. म्हणून हायकोर्टाचे दार वाजवते. मी गरीबांच्या विरोधात नाही.

महापालिका राबवित असलेले जेएनएनयूआरएम,बीएसयूपी प्रकल्प राबविताना डीसी रूलमध्ये फेरबदल करायचा आदेश राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने दि.२४ डिसेंबर २००८ मध्ये दिला होता. एक बिल्डींग बांधायची अजून बाकी ठेवली आहे. आत्ता टेंडर काढले आहे. बिल्डींग बांधून तयार आहे. एका बिल्डींगसाठी कमिशनर यांनी टेंडर काढले. म्हणजे पहीली झालेली चूकच होती. हायकोर्टाने महापालिकेचे कान पिळले म्हणून तुम्ही ईथे टेंडर काढले आहे. जसे ३क, ३ड व्हायला पाहीजे. झोपडपट्टीतील लोकांचे शंभर टक्के पुनर्वसन झाले पाहीजे. जे खोटे दाखले करतात त्यांचे का जे खरे दाखले दाखवतात त्यांचे, त्यांच्यासाठीच खरेतर भाटनगर बांधले आहे. तिथे घुसखोर घुसले आहेत. रोजंदारीवर जाणारा माणूस काय करणार? तो गेला नाही लोक तलवार घेऊन घरांत घुसत होते. ६७२ घरे. तुम्ही डिपीआर बनवला, तुम्ही प्रकल्पाबरोबर यादी बनवली. मग तुम्ही कोण पात्र/अपात्रचा खेळ न करता त्यांना डायरेक्ट घरे द्यायला पाहीजे होते. परत नवा गडी नवा राज्य. परत पात्र अपात्रचा हा नवा खेळ चालू केला तर सगळ्यांचाच उत्कर्ष होतो. मग त्याला विरोध केलातर मग तुम्ही गरीबांच्या विरोधातले. मी पण गरीबच होते पण दोन बुके शिकले. डॉ.बाबासाहेबांच्या कृपेने. म्हणून इथे बोलायची ताकद आली. नाहीतर आमचा आवाज कोणी ऐकला असता. सेक्टर २२ गावाबाहेर बांधले. पहिला गावाबाहेर महारवाडा होताच. आजही गावाबाहेर ठेवताय. तुमच्यावर ॲट्रोसिटी दाखल झाली पाहिजे. संविधान होऊन ५० वर्षे झालीत. संविधान सगळ्यांना न्याय देतो. पण संविधान ज्या जाणत्यांनी लिहिले त्यांच्या लोकांना न्याय द्यायला तुमचे काळिज होत नाही आणि म्हणतात आम्ही गरीबांचे कैवारी. आम्हाला न्याय द्यायला तुम्हाला होत नाही. तुम्ही न्याय देऊ शकत नाही. सेक्टर २२ला परत गावाबाहेर महारवाडा केला. सगळे झोपडपट्टीतले एकत्र केले. सगळे चोरच असतात का. समाजात व्हाईट कॉलर्ड चोर पण आहेत. समाजात फिरतात. झोपडात राहतो म्हणून त्याला कुत्र्यासारखे हाकलून द्यायचे. त्यांना बघितले की तुम्हाला किळस येते म्हणून गावाबाहेर ठेवायचं. महापालिकेवर ॲट्रॉसिटी दाखल झाली पाहीजे. या देशाला स्वातंत्र्य मिळून इतकी वर्षे झाली, संविधान लिहून ५० वर्षे पूर्ण झाली तरी

संविधानाची पायमल्ली करता. पायदळी तुडवता. सगळे नियम कुठे नेता, पाळत नाहीत. एखादा मोठा बिल्डर असेल तर त्याला कशी सूट द्यायची,नियमांत कसे बदल करायचे हे पाहता. सगळे झोपडपट्टीधारक एकत्र केलेत, तुम्ही ते स्कॅटर करु शकला असता. झोपडपट्टी पूनर्वसनाचा मूळ उद्देश्य काय आहे की त्यांचे जीवनमान उंचवावे. इतरांकडे बघून त्यांनी स्वतःला सुधारावे. मला मुळात ही कन्सेप्टच मान्य नाही. मी काय म्हणून दुस-याकडे बघून काय सुधारणार. माझ्या विचारांमध्ये बाबासाहेब आहेत. माझ्या कृतीत बाबासाहेब आहेत. त्यांनी मला शिकवले आहेकसे वागायचे. एवढा महान नेता माझ्या समाजात होऊन गेला आहे. मी कसे वागायचे ते तुम्ही मला शिकवायचे नाही. तुम्ही त्यांना स्कॅटर केले नाही. त्यांना वेगवेगळ्या ठिकाणी स्प्लीट केले नाही. त्यांच्या रोजीरोटीचा विचार केला नाही. सगळे झोपडपट्टीधारक एकाच ठिकाणी नेले. मध्यंतरी गुन्हेगारीच्या बातम्या वाचल्या असत्या तर कळाले असते. हातापोटाची लढाई असते तिथे दुसरे काहीच दिसत नाही. ज्याठिकाणी होते, तिथेच त्यांचे पुनर्वसन केले असते तर उद्या हा विषय पण आला नसता. खरेतर अतिशय संवेदनशिलतेने हा विषय हाताळायला पाहिजे होता. परंतू तसे न करता आपण काय केले, बुलडोस करायचा प्रयत्न केला. एकदा झोपडपट्टीत गेलात तर ९९ टक्के लोक अत्यंत प्रामाणिक, अत्यंत कष्टाचे काम करणारे असतात. एक टक्का लोक घाण करणारे असतात. हे एक टक्का लोक एक एक टक्का करुन एका ठिकाणी नेले असते तर दहा टक्के झाले असते. तिथला एक टक्का चौकातला दादा असतो, तो ९९ टक्के लोकांचे जिवन मुश्कील करत असतो. इथे हे १० टक्के गेले असते तर आजूबाजूच्या लोकांचे जीवनमान तुम्ही खराब केले असते. मी सेक्टर २२ मध्ये प्रकल्प राबवला. आत्ता जसा भूकंप येतो. नेपाळमध्ये भूकंप येईल असे वाटले होते का. नेपाळमध्ये भूकंप आला, अजूनही येईल. भारतातही वेगवेगळ्या ठिकाणी हादरे बसले. कोण मरेल याची तुमच्या लेखी जीवाची काय किंमत आहे. मोफत घरे दिलीत. जीव तर आमचा आहे. त्या जीवाची किंमत तुम्हाला कळणार नाही. हे कळायला कोमल मन लागते, संवेदना लागते, जाणीव लागते. भिका-यांकडून पैसे घेतात त्यांच्याकडून काय अपेक्षा करायची. याठिकाणी पत्राशेडमध्ये पात्रता निश्चित करताना मोठा भ्रष्टाचार चालू आहे. हे कुठेतरी थांबवा म्हणून मी वारंवार पत्र लिहून विनंती केली आहे. कुठेतरी पात्रता यादी तयार केली आहे ती लोकांना दाखवा. चावडी वाचन करा. आणि त्यांना द्या. जे होत नव्हते त्याच्यासाठी तुम्ही काय करणार, मी काय करणार. तुम्ही माझ्या ठिकाणी असतातर काय केले असते? त्याठिकाणी असलेल्या सगळ्या लोकांना तिथे घर मिळण्यासाठी नीट प्रयत्न होत नसतील तर नियम, अटी, शर्ती, कायदा काहीतरी आहे. महापालिका म्हणून सगळे नियम पायदळी तुडवणार. आम्हाला मात्र सांगणार असे केले, अनधिकृत घरे बांधले,मोडायला येतो. कोणी टॅक्स भरला नाहीतर त्याची मिळकत जप्त करतो. सगळे नियम आम्हाला, तुम्हाला कोणतेच नियम नाहीत. असे

चालणार नाही. या पत्राशेडमध्ये आमच्या अंगावर लोक सोडायचा प्रयत्न करतात. लोक सोडले म्हणून आम्ही घाबरत नाही. घाबरणार पण नाही. प्रामाणिक प्रयत्न असेल तर त्याठिकाणी मन मोठे करायला विषय आलातर किती मन मोठे करु शकते हे या सभागृहाला दिसेल आणि शहराला सुद्धा दिसेल. काम नियमाने झाले पाहीजे म्हणून हायकोर्टात गेले. कारण विनानिविदा काम दिले. अधिका-यांवर, प्रशासनावर कारवाई झाली पाहीजे. पण तसे होताना दिसत नाही. अडीच एफएसआय मंजूर नसताना बांधकाम परवाना विभागाची परवानगी घेतली नाही, या सगळ्याची दखल घेतली म्हणून न्यायालयाने स्टे दिला. मा.महापौर साहेब, कोर्टात सन्मा.राजन पाटील असतात. त्यांना विचारा. कोर्ट म्हणते, पिटीशनर सांगतो,पिटीशनर मागणी करत नाही पाडा म्हणून. हे हायकोर्टात रेकॉर्ड आहे. पिटीशनर म्हणत नाही पाडा म्हणून तो सांगतो नियमाने काम करा. ज्यावेळी पिटीशनर सांगेल पाडा म्हणून त्याच्या दुस-या दिवशी तुम्ही पाडायचे आदेश द्याल. पाडा हा आमचा उद्देश्यच नाही. हा जो भ्रष्टाचाराचा वारु चहू बाजूंनी उधळला आहे, त्याला थांबवायचे आहे. त्यासाठी सगळे मार्ग अवलंबणार आहे. आरक्षण बदलण्यासाठी खरेतर हायकोर्टाने सांगितले होते, पत्राशेडचे आरक्षण बदला म्हणून. मा.आयुक्त साहेब, तुम्ही हायकोर्टाच्या निर्णयाचा विपर्यास केलात. मा.महापौर साहेब, महापालिकेचे बांधकाम आहेतर आरक्षण बदलायचे. का तर जनतेचा पैसा वाचला पाहीजे. जो डीपी प्रसिद्ध झाला आहे. त्याआधी ज्या गरीबांनी घरे बांधली आहेत, तुम्ही त्यांची घरे पाडायला जाता. रस्त्यातील असतील पाडाल, नदीपात्रातील असतील पाडाल, आरक्षणातील असतील पाडाल. हे आरक्षण बदलायला नको, बदलले पाहीजेत. तुम्ही तुमच्या बांधकामासाठी आरक्षणे बदलायचा घाट घातला. लोकांसाठी करत नाही. यांचे बांधकाम आहे, यांच्यासाठी घाट घालणार. लोकांसाठी पण करा. चांगले काम करा. मा.महापौर साहेब, खरेतर या सगळ्या विषयामध्ये मी मा.योगेश बहल यांचे खरेतर अभिनंदन करेन. मा.योगेश बहल साहेबांनी ऑगस्ट २००८मध्ये जेएनएनयूआरएम योजनेत सहभाग घेणे, त्या बाबतचा निर्णय, खर्च, आदि सर्व बाबींचे अधिकार मा.आयुक्त यांना देण्याबाबतचा प्रस्ताव मांडला होता. हा प्रस्ताव मंजूर करताना आयुक्तांसमोर मा.महापौर सांगतील त्या सदस्यांचा समावेश करुन समितीने संयुक्तपणे निर्णय घेण्याची उपसूचना मा.योगेश बहल यांनी दिली होती. मा.योगेश बहल यांनी दिलेली महत्वाची उपसूचना सन्मा.सभागृहाने स्विकारून दि.१८.८.२००५ रोजी हा ठराव क्रमांक ५५७३ मंजूर केला होता. आज याठिकाणी मा.महापौर यांच्या व्यतिरिक्त एकही सदस्य महापालिकेने नेमलेला नाही. महापौर सांगतील तो सदस्य घेण्याची तरतूद होती. एखादा सदस्य त्या सभागृहातील असतातर त्याने लक्षात आणून दिले असते. पण त्यांच्या उपसूचनेला देखील तुम्ही केराची टोपली दाखवली. किमान तुम्ही काय करता हे कळावे म्हणून उपसूचना मांडली होती. पण याचे सुद्धा तुम्ही काहीही केले नाही. म्हणून याठिकाणी संपूर्णपणे प्रशासनच दोषी आहे. प्रशासनावर

कारवाई झालीच पाहीजे. मा.आयुक्त साहेब, याठिकाणी जे जे महत्वाचे मुद्दे उचलले. पहिले तर तुम्ही या सभागृहाची नव्हेतर जनतेची माफी मागितली पाहीजे. तुमच्या अधिका-यांनी केलेला भ्रष्टाचार, तुम्ही केलेली बेकायदेशीर कामे म्हणून कोर्टाने दिलेला स्टे. सन्मा.कोर्टाचा किमान थोडासा मान ठेवा. हा प्रस्ताव सभागृहापुढे आणला आहे. दोन चार वेळा हा प्रस्ताव तहकूब केला. आज ना उद्या. पण सुदैवाने का होईना केंद्र शासनाने दोन वर्षे मुदतवाढ दिली आहे. ज्या त्रुटी झाल्या आहेत, त्या पहिल्या दुरुस्त करा. जे जे दोषी आहेत. राजन पाटील, श्रीकांत सवणे या अधिका-यांना बदला. ते काय महापालिकेचे जावई आहेत काय. चांगले अधिकारी तिथे जाऊ देत. यांच्यावर सुद्धा कारवाई झाली पाहीजे. मला कल्पना आहे मी सभागृहाचा खूप वेळ घेतला आहे. खूप दिवस झाले टिका सहन होत नव्हती. मी बोलते म्हणून लागते आहे. चुकीचे घडले आहे हे सांगण्यासाठी म्हणून वेळ घेतला.

**मा.सुलभा ऊबाळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह, सगळे सभागृह शांत बसलेले आहे. सर्व सभागृहाने दोन तास शांत चित्ताने सगळे ऐकून घेतले म्हणून मी सगळ्यांचे अभिनंदन करते. खरेतर मा.महापौर साहेब व मा.आयुक्त साहेब, हा प्रस्ताव एक नंबरचा जो ठराव आहे. मा.सिमाताईंचे भाषण ऐकत असताना मा.आयुक्त साहेबांनी त्यांना संपूर्ण २००७ पासून २०१५ पर्यंतच्या प्रकल्पातील त्रुटींचा पूर्ण इत्यंभूत खुलासा देण्यासाठी हा प्रस्ताव ठेवला होता काय? इतके मा.सिमाताईंचे भाषण अभ्यासपूर्ण वाटले. त्यांनी त्याची कारणमिमांसा सांगितली आहे. त्यानंतर प्रशासनाने भविष्यात सांगितलेल्या चूका टाळाव्यात असे सभागृहाचे म्हणणे आहे. खरेतर सर्व झोपडपट्टीधारकांच्या वतीने मी केंद्र शासनाचे पुन्हा एकदा मनापासून अभिनंदन करते. आपल्याला जी योजना गुंडाळायची वेळ आली होती, ज्या योजनेअंतर्गत मिळालेले पैसे आपल्याला परत द्यावे लागले असते, आपण ही योजना पुन्हा नव्याने सादर करणार आहोत. मा.अश्विनी चिंचवडे यांचे दीर आजारी असल्यामुळे त्या आज येऊ शकल्या नाहीत. त्यांच्या प्रभागातील वेताळनगरची योजना सुरु करत असताना तिथे कायद्याची कोणतीही अडचण नाही. काही गोष्टींचा तिथे संबंध नाही. ही योजना ताबडतोब हातात घ्यावी अशी सभागृहाच्या वतीने मी विनंती करते. आत्ताच रेडझोनचा उल्लेख झाला. जेव्हा आम्ही केंद्रीय मंत्र्यांना भेटलो, त्यावेळी त्यांनी जुलै,ऑगस्ट, सप्टेंबरपर्यंत ५०० मी.ची हद्द कमी होईल असे जाहीरपणे सांगितले आहे. त्यामुळे त्यासंदर्भात बाकी रेडझोन हद्द असेल, सेक्टर २२ असेल हे आपोआप त्या कचाट्यातून बाहेर निघणार आहेत. मा.आयुक्त साहेब, सूचनांचे तंतोतंत पालन व्हावे अशी आपल्याकडून अपेक्षा आहे. मागच्यांनी ज्या चूका केल्या आहेत, परंतू भविष्यात अशा चूका वारंवार होऊ नयेत. मी व मा.बाबासाहेब धुमाळ यांनी तुम्हाला सांगितले होते की, भक्ती-शक्ती समोर पीएमपीएमएलच्या बसस्टॉपचे बांधकाम रेडझोनमध्येच महापालिका करते आहे. त्याची प्लॅनिंग ऑथोरीटी प्राधिकरण आहे. परंतू आपण त्याचा प्लॅन पास करुन

घेतलेला नाही. म्हणजे मागच्याच चुका पुन्हा पुन्हा घडत आहेत. त्याचप्रमाणे हरीत लवादाने संभाजी उद्यान पुणे इथले बांधकाम थांबवायला सांगितले आहे. परंतू आपल्याकडे अशाच प्रकारचे समाजमंदीराचे काम चालू आहे याकडे आपले दूर्लक्ष आहे आम्ही प्रत्येक वेळी तुम्हाला पत्र द्यायचे, तुम्हाला सांगायचे. सिमाताईंसारखा प्रत्येकजण हायकोर्टात जाऊ शकत नाही. त्यांना भक्कम पाठिंबा आहे. त्यांचा अभ्यास आहे म्हणून त्या हायकोर्टात जाऊ शकतात. मा.महापौर साहेब, आपण इथेच ऐकलेतर आम्हाला पुढे जायची वेळ येणार नाही. सगळे समजूनही आपण असे केले तर निश्चितपणे आम्ही नाही पण सामान्य नागरीक कोणीतरी आपल्याविषयी तक्रार केल्याशिवाय राहणार नाही. धन्यवाद.

**मा.मंगलाताई कदम-**मा.महापौर साहेब,विषय क्रमांक २ वरील मा.आयुक्त यांचे विषयपत्र त्यांस मागे घेणेस परवानगी देणेत यावी अशी सूचना मांडते.

**मा.भारती फरांदे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक – ६७३ विषय क्रमांक – २
दिनांक – १३/५/२०१५ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ –१) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र. स्थापत्य BSUP
प्र/७१/२०१५, दिनांक – २४/०२/२०१५
२) मा.शहरसुधारणा समिती सभा ठराव. क्र.४६ दि.४/३/२०१५
३) मा.महापालिका सभा ठ.क.६६२ दि.६/४/२०१५

विषय क्रमांक २ वरील मा.आयुक्त यांचे विषयपत्र त्यांस मागे घेणेस परवानगी देणेत येत आहे.

अनुकूल - ८१ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.अपर्णा डोके -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ३

दिनांक – १३/५/२०१५ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.किरण मोटे, मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव –
२) मा.क्रिडा समितीकडील ठ.क्र. ९० दि. ६/४/२०१५

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ३० (२) मध्ये विशेष समित्या नियुक्त करण्याची तरतुदीनुसार मा.महापालिका सभा ठराव क्र.५१२९, दि.०९/०४/२००४ अन्वये क्रीडा समिती सभा स्थापन करणेस व अन्य विशेष समित्यांच्या सदस्य नेमणुकांच्या वेळीच क्रीडा समिती सदस्यांची नेमणूक करणे कामीची तजवीज ठेवणेस तसेच झोपडपट्टी सुधार, गृहनिर्माण आणि समाज कल्याण समिती प्रमाणेच सोयी सुविधा क्रीडा विभागामार्फत क्रीडा समितीस उपलब्ध करुन देणेस मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सन २००४-२००५ पासून क्रीडा समिती सभेची स्थापना झाली असून या समितीकडे खालीलप्रमाणे कामकाज सोपविणेत आलेले आहे.

१) क्रीडा कला विषयी सर्व प्रश्न, धोरण आखणी व अंमलबजावणी करणे.
२) क्रीडा विभागाकडील र.रु.५० लाख पेक्षा अधिक नाही अशा खर्चास प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावावर अंतिम निर्णय घेणेचे अधिकार व र.रु.५० लाखापेक्षा अधिक अशा खर्चास प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावावर शिफारस करुन मा.महापालिका सभेपुढे पाठविणे.
३) क्रीडा कला विभागाचे सर्व प्रकारचे कामकाज करणेबाबतचे अधिकार.

क्रीडा विभागांतर्गत विविध क्रीडा सुविधा, विविध क्रीडा स्पर्धा आयोजन कामकाज व नागरिकांच्या तक्रारी कमी होण्याच्या दृष्टीने व कामकाजाच्या सोईच्या दृष्टीने मा.क्रीडा समिती सभेकडे खालील प्रमाणे कामकाज सोपविणे आवश्यक आहे.

१) मनपा परिसरातील सर्व क्रीडा सुविधा देखभाल दुरुस्ती कामकाज करुन घेणेकामी क्रीडा विभागाकडे एक स्वतंत्र क्रीडा स्थापत्य विभाग स्थापन करणे व त्याकामी आवश्यक ती तरतूद क्रीडा विभागाकडे उपलब्ध करुन देणे.
२) कला विभाग, संगीत वर्ग, पिंपरी चिंचवड संगीत अकादमीचे कामकाज, सांस्कृतिक कार्यक्रम कामकाज, संगीत महोत्सव, सार्वजनिक वाचनालये, स्पर्धा परीक्षा केंद्र, मा.क्रीडा समिती मार्फत करणे.
३) क्रीडा विभाग या नावा ऐवजी क्रीडा, कला, साहित्य, सांस्कृतिक विभाग स्थापन करणे.
४) क्रीडा, कला, साहित्य, सांस्कृतिक विभाग स्थापन झाल्यानंतर सर्व प्रकारचे कला संगीत महोत्सव सांस्कृतिक कार्यक्रम क्रीडा समिती मार्फत पार पाडणे.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ३० (२) मध्ये विशेष समित्या नियुक्त करण्याचे तरतुदीनुसार क्रीडा समिती स्थापन करण्यात आल्याने सदर क्रीडा

समिती सभेकडे या पूर्वी नेमून दिलेल्या कामकाजासह वरील प्रमाणे मा.क्रीडा समिती सभेकडे नव्याने कामकाज सोपविणेस, विशेष अधिकार देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.साधना जाधव** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.राजेंद्र जगताप-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,सन्मा.सभागृह, हा विषय करणे गरजेचे आहे. त्यासंदर्भात सांगायचे आहे की, आत्तापर्यंत क्रिडा धोरणाबाबत पाहिले असेलतर, क्रिडा विभागात काय काम चालते, काय काम चालत नाही ते आपण कधी पाहिले नसेल. खरेतर क्रिडा विभागाची विभागणी करणे फार महत्वाचे आहे. कारण आत्तापर्यंत आपल्या शहरात १० स्विमिंगपूल, पिंपळे गुरव सांगवी इथे २ बॅडमिंटन हॉल व जिम्नॅशियम आहे. सांगवीतील जिम्नॅशियम हॉलमध्ये रु.७,०००/- रेंट आहे. जिम्नॅशियम हॉल आहे तिथे बघितले तर जावेसे वाटू नये अशी परिस्थिती आहे. जेव्हा ही बिल्डींग बांधून झाली, तेव्हापासून तो रेंटने दिलेलाच नाही. माझ्याकडे महिला बचत गट आहे. महिला बचत गटाने मागणी केली होती. मागणी केल्याप्रमाणे त्यांनी प्रस्ताव दिला. बॅडमिंटन हॉलची मुदतसुद्धा फेब्रुवारीमध्ये संपली आहे. मुदत संपल्यानंतरदेखील तो रेंटने दिलेला नाही. दिलेला नसताना त्यासाठी मी प्रस्ताव केला व तो क्रिडा विभागात दिलेला आहे. त्यावेळी क्रिडा विभागाकडून फाईल आली नव्हती. फाईल पाहिलीतर भूमि आणि जिंदगी इथे रेकॉर्डच नाही. महापालिकेची प्रॉपर्टी कुठे आहे का नाही ते त्यांना माहित नाही. रेंटची रक्कम ठरवून तो हॉल रेंटने द्यायचे ठरले होते. आयुक्त साहेब, आपल्याकडे ही फाईल आली आहे. सांगवी इथे रु.७,००० रेट आहे. पिंपळे गुरवला महिला बचत गटाला रेंटने द्यावे व चालवावे. ज्यावेळी भूमि आणि जिंदगी व नगररचना या विभागांकडे फाईल आली, त्यावेळी भाडेपट्टयावर देण्याचे ठरवले. ज्यावेळी रेट काढला तेव्हा रेडी रेकनरप्रमाणे रेट किती घ्यायचा ते पाहीलेतर त्याला रु.३७,०००/- भाडे यायला लागले. ६०० स्क्वे. फूटाला रु.३७,०००/- इतके भाडे लावले तर तो कोण घेणार आहे? ती फाईल अशीच पेंडींग पडली आहे. महापालिकेच्या अशा कितीतरी मिळकती आहेत. क्रिडा,नगररचना व भूमि आणि जिंदगी या विभागांमध्ये समन्वय नसल्यामुळे महापालिकेचा कितीतरी तोटा होतो आहे. मा.आयुक्त साहेब, आपले एक धोरण झाले पाहीजे. आमच्या परिसरात जवळजवळ अर्धा/एक कि.मी. अंतरामध्ये ३ स्विमिंग टॅंक आहेत. आमच्याकडे पुणे महापालिका, कॅंटोनमेण्ट बोर्ड या भागातील नागरीक स्विमिंगसाठी जास्तीत जास्त येत असतात. त्यामुळे इथल्या स्थानिक लोकांना तिथे एन्ट्री मिळत नाही. १०० ते १५० मुले तिथे एका बॅचला असतात अशी परिस्थिती आहे. काही वेळा २ वॉचमन असूनसुद्धा पोलिसांना बोलवावे लागते. तिथे भांडणे होतात. माझ्यासमोर ३ मुले बुडाली होती. आपले जीवरक्षक पाहिलेतर एक/दोनच आहेत. २७ जीवरक्षक सगळ्या स्विमिंग पूलसाठी कमी पडतात. तिथे एखादी अशी केस झालीतर काय

परिस्थिती होईल. बाहेरून एक व्यक्ती सुट्टीसाठी इथे आला होता. तो स्विमिंगसाठी आला. स्विमिंगला गेल्यानंतर तो बुडायला लागला होता. त्याला विचारल्यावर तो म्हणाला, तो पाहूणा म्हणून इथे आला आहे. अशी एखादी केस जर आपल्याकडे झालीतर काय परिस्थिती होईल. अशा पद्धतीने पूर्ण माहिती घेऊन आपण क्रिडा विभागांत जास्तीत जास्त लक्ष देणे गरजेचे आहे. जिथे जिथे आपल्याला रेंटने द्यायचे आहे तिथे द्यावे. तिथे नेमके काय होते आहे. भूमि आणि जिंदगी व नगररचना विभागातील अधिका-यांना मी ३ वेळा विचारले. कोणालाही रेट ठरवत आला नाही. त्याच्यावर त्यांनी रिमार्क दिला,आपले रेट ठरवून माझ्याकडे फाईल येऊ द्या. ६ महिने झालेतरी फाईलवर काहीच निर्णय झालेला नाही. असे आपल्याकडे होत असेल तर यात महापालिकेचे नुकसान होते आहे. आपल्या परिसरात स्विमिंग टँक व बॅडमिंटन हॉल याची मुदत किती आहे हे माहित नाही. मुदत कधी संपली हे माहित होत नाही. अधिकारी काय करत असतात? क्रिडा विभागात १००/१२५ कर्मचारी असताना क्रिडा विभागात कोणतेही काम वेळेत का होत नाही? मागील वर्षी पाण्याचा तुटवडा होता. म्हणून उन्हाळ्यात स्विमिंग टँक बंद ठेवला होता. २०,००० लि. चे दोन टँकर त्याठिकाणी द्यावे लागतात. तिथे एवढी मुले येतात. एकावेळी ५० मुले असतात. पुणे शहरात पाहीलेतर रु.५०/- तिकीट लावले आहे. आपल्याकडे रु.१०/- तिकीट आहे. याचा विचार चांगली क्वालिटी येण्यासाठी निश्चितपणे केला पाहीजे. भाड्याचा रेट वाढवला तर क्वालिटीचे लोक येतील. महिलांसाठी चांगले धोरण झाले आहे की, स्विमिंग टँकवर संध्याकाळी ६ ते ७ वा. पर्यंत महिलांसाठी एक शिफ्ट ठेवली आहे. मा.सिमा साळवे ताईंनी प्रस्ताव मांडला होता. महिलांना गरज होती. हा चांगला उपक्रम केला आहे. त्यामुळे महिलांना स्विमिंग टँकवर जायला मिळते आहे. आपल्या अधिका-यांवर आपले नियंत्रण राहिले पाहीजे. त्यांना कोणतेही काम सांगितले तर निश्चितपणे ते आपल्याकडून झाले पाहीजे. सारख्या त्याच-त्याच तक्रारी करणे आम्हाला चांगले वाटत नाही. एकदा सांगितल्यानंतर दुस-या वेळी ते काम झाले पाहीजे. मी गेले ३ महिन्यांत प्रत्येक विभागाला पत्र दिले आहे. कोणतेही काम सांगितल्यावर हे पाहिले आहे की, कोणते काम झाले, ते कधी पूर्ण होईल असे कुठे झालेले नाही. व्यायामशाळेत साहित्य मिळाले पाहीजे असे पत्र दिले होते. पत्रव्यवहार पाहिलातर माझ्याकडे पूर्ण लिस्ट आहे. पण एकाही पत्राचे उत्तर येत नाही. पत्राचे उत्तर समाधानकारक आले पाहीजे. प्रश्न वेगळा असतो, उत्तर वेगळे येते अशी टोलवाटोलवी होत असते. म्हणून यात गांभिर्याने लक्ष द्यावे. आपल्याकडे आज अशी परिस्थिती आली आहे की एलबीटी बंद झाल्यानंतर मनपाच्या उत्पन्नाचे स्त्रोत पाहीलेतर महापालिकेच्या अनेक बिल्डींगी अशाच पडून आहेत. त्यांच्यासाठी कुठलाही अधिकारी नाही. भूमि आणि जिंदगी विभागाला महापालिकेच्या कोणत्या इमारती आहेत हे सुद्धा सांगता येत नाही. अशी परिस्थिती आहे. म्हणून यात गांभिर्याने लक्ष घालावे व या विषयात जास्तीत जास्त लवकरात लवकर कसा

निर्णय घेता येईल ते पहावे. तुमचा फॉलोअप चालत नाही का? शहराच्या प्रथम नागरीक महापौर मॅडम आमच्या परिसरातील आहेत. सहा महिने झाले आहेत. बचत गटांना व्यवस्था करायची आहे. बचत गटांना दिले असतानासुद्धा त्यांना हे काम मिळू शकत नाही. खरेतर मलासुद्धा वाटले, अशी परिस्थिती असताना आमच्या सारख्याला महिलांनी असे विचारले तर आम्हाला उत्तर देत येत नाही. म्हणून यात जातीने लक्ष घाला. फास्ट कसे करता येईल, कमी रेटमध्ये, कमी बजेटमध्ये काम कसे होईल हे पहावे. आपण मला बोलायची परवानगी दिलीत त्याबद्दल धन्यवाद!

**मा.आरती चौंधे**–मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब,आमच्या पिंपळे निलखमधील भाजीमंडई इमारतीत व्यायामशाळा आहे ती तशीच पडून आहे. तिथे साहित्य आहे ते पडून आहे. तिथे पडदे पाहीजेत, मॅट पाहीजे. क्रिडा अधिका-यांकडे मी वारंवार मागणी करते आहे. पण मला साहित्य मिळत नाही. जे साहित्य आहे ते गंजून चालले आहे. खराब होते आहे. दोन दोन लाखांच्या मशिनरी आहेत. पण त्यांचा उपयोग होत नाही. अधिका-यांना व्यायामशाळा चालू करण्यासाठी वारंवार सांगितले. पत्र दिलेतरी ते लक्ष देत नाहीत. पीसीएमसीच्या इमारतींचा नागरीकांना उपयोग झाला पाहीजे. आपण एवढा खर्च करतो तर त्याचा उपयोगन नागरीकांना झाला पाहीजे. म्हणून क्रिडा अधिका-यांना आदेश द्या. व्यायामशाळा लवकरात लवकर चालू करावी अशी विनंती करते.

**मा.जितेंद्र ननवरे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह, याठिकाणी सर्वप्रथम एक खुलासा करावा की, सांस्कृतीक व साहित्य हा विभाग कसा चालवला जातो. नेमके धोरण काय आहे याचा खुलासा करावा.

**मा.महापालिका आयुक्त** – मा.महापौर साहेब, सर्व सन्मा. सभागृह, क्रिडा समितीचे सभापती यांना जो प्रश्न उपस्थित केला आहे, कला व संस्कृतीबाबतीत आपल्याकडे श्री.तुपे, सहशहर अभियंता आहेत, हे काम को-ऑर्डीनेट करतात. छोट्या कार्यक्रमापासून मोठे कार्यक्रम सगळेच कार्यक्रम त्यांच्या सुपरविजनखाली व त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे आपण पार पाडत असतो. वाचनालय विभाग साहित्याबाबत विचारले तर श्री.इंदलकर, कामगार कल्याण अधिकारी आहेत. ते हा विभाग पाहतात.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, क्रिडा समितीचे सभापती यांनी हा विषय क्रिडा समितीतून आलेला आहे. मला हे विचारायचे आहे की, त्यांच्या ज्या–ज्या मागण्या आहेत. पुणे महापालिकेसारखे कला, क्रिडा व साहित्य एकत्र करणार आहोत का? आज क्रिडा समिती बघितली, क्रिडा विषयक कामकाज बघितले तर सभागृहात आज लग्नतिथी असल्यामुळे इथे लोक नाहीत. परंतू क्रिडाचे कामकाज समाधानकारक नाही. तुम्ही हे त्यात ऍड करणार आहात. हे ऍड करताना तुम्ही तिथे अधिकारी नेमणार आहात का नाही? पहिलेच क्रिडा विभागात काही करत नाहीत आणि यात भर पडली तर विचारायलाच नको. खरेतर मा.आरती चौंधेताईंनी ज्या गोष्टी सांगितल्या. त्यात आपल्याकडे मला वाटत नाही, चांगल्या सुविधा आहेत. प्रायव्हेट बचत गटांना दिलेतर चांगले चालतात व महापालिकेचे असेलतर नीट चालत नाही. यात कुठल्याही परिस्थितीत काय बदल होणार आहे का? क्रिडा विभागाचे तुम्ही सांगितले, एक्सवायझेड हे बघतात, हा विभाग दुसरेच बघतात. तुम्ही स्थापत्य विभाग त्यात घेणार आहात. मग तुम्ही एकत्र करणार असालतर क्रिडा विभागाला एक चांगला अधिकारी देणार असालतर त्याला अर्थ आहे. आज आमचे क्रिडा समितीचे सभापती मा.जितेंद्र ननवरे यांना फार उत्साह आहे. परंतू चेअरमनपद संपल्यानंतर हा विषय केलातर आम्ही अडचणीत येऊ. पण तुम्ही क्रिडात चांगले काम करु शकत नसाल.

आपण स्पर्धा घेतो. तुम्ही बघितले असेल यावर्षी दोन/तीन स्पर्धा चांगल्या झाल्या. सभापती जसा असतो त्यापद्धतीने कामकाज केले जाते. नाहीतर नुसत्या स्पर्धा, स्पर्धा, एका महिन्यात ५० स्पर्धा. एक इकडे पळतोय, दुसरा तिकडे पळतोय. दोनशे रुपये मानधन देणार, दोनशे रुपयाचे बक्षिस देणार असे काही या धोरणात चालणार आहे का? यात नेमके काय होणार हे तरी कळाले पाहीजे. याचा नीट, पूर्ण खुलासा केला गेला पाहीजे. नाहीतर उपयोग होणार नाही. यात आपण ब-याचशा गोष्टी आल्या आहेत. आता फिल्म फेस्टिवल आला आहे. त्यादिवशी मा.महापौरांनी डिक्लरेशन केले होते की, आज आम्ही तुमच्याकडे आलो. पुढील वर्षी पिंपरी चिंचवडमध्ये एक कार्यक्रम दिला गेला पाहीजे. महापौरांनी त्यात अनाऊंस केले. मा.महापौर यांना तो अधिकार आहे. आपण त्याचा ठराव करुन दिला आहे का? सभागृहात ठराव आला का? त्या लोकांनी क्लिअर सांगितले होते, इंटरनॅशनल लेवलवर सगळ्या वर्षाची आखणी होत असते. मग तो ठराव आला का? मग आपण करुन दिला का? प्रत्येक वेळेला प्रत्येक गोष्ट झाली गेली पाहीजे नाहीतर काय उपयोग होणार. फिल्म फेस्टीवलला मा.महापौर यांनी अनाऊंस केले होते. उद्या विषय परत संपेल. विषय केला नसेलतर केला गेला पाहीजे. त्या गोष्टीला ३/४ महिने होऊन गेले. त्यांचे म्हणणे आहे, तुम्ही आम्हाला रितसर कागदपत्रे जी.बी. ठरावानुसार मा.आयुक्त यांनी दिलेतर आम्ही इंटरनॅशनल लेवलवर कळवू की, पुढील वर्षी पिंपरी चिंचवड त्यात सहभागी असणार आहे. ते बक्षीसाची अमाऊंट देणार होते. मा.आयुक्त

साहेब, तुम्ही ठरवा, कोणाला द्यायचे, मराठीला द्यायचे का हिंदीला द्यायचे. पिंपरी चिंचवडचे नाव जागतिक लेवलवर झाले पाहीजे या दृष्टिकोणातून विचार करतो. मग हे सांस्कृतिक धोरण झालेतर आपण त्यात काही केले का नाही? नुसत्याच कमिट्या करणार. मा.तानाजी शिंदे साहेबांनी क्रिडा धोरण केले. तुपे साहेबांनी सांस्कृतिक धोरण केले. याला विरोध नाही. आमचे काही म्हणणे नाही. परंतू कामकाज नीट झाले पाहीजे.

मतीमंद मुलगा आयुष्यात एकटा जाऊ शकत नाही. त्याला घरातील लोक, कोणीतरी बरोबर पाहीजेत. त्यांनासुद्धा बसपास देतो. क्रिडा विभागात स्पष्ट सांगतात, तुम्ही बस पाससाठी अर्ज करु शकत नाहीत. तुम्ही मतिमंद म्हणून अनुदान घेतले आहे. म्हणून बसपाससाठी अर्ज करु शकत नाही. मतिमंद मुले हा विषयच वेगळा आहे. मतिमंद मुलांना समजत नाही. अपंग मुले मेंटली फिट असतात, त्यांना समजू शकते. अंध मुलांना सुद्धा दिसत नसलेतरी ते मेंटली फिट असतात,कोण काय करते हे त्यांना समजू शकते. मतीमंद,गतीमंद मुलांना कळत नाही, त्यांचा आय.क्यू. कमी असतो. तुमचे खालचे लोक खुशाल उत्तर देतात की, तुम्हाला बसपास देऊ शकत नाही. म्हणजे आज त्यांना बसपास दिला नाहीतर ती मुले शाळेतच जाऊ शकणार नाहीत. ती मुले आज शाळेत जातात. तुम्ही त्यांना दोन हजार देऊ नका पण बस पास द्या. आपल्या अधिका-यांना भिती वाटते की, दोन हजार देऊनसुद्धा बसपास द्यावा लागेल. ठराव मंजूर केला असेलतर काही ठिकाणी हे लक्षात घेतले गेले पाहीजे. क्रिडा विभागातूनच अशा योजना येतात. अनुदान असेल किंवा इतर काही गोष्टी द्यायच्या असतील, मग असे वेगवेगळे असेल, आज क्रिडा विभाग सक्षम नाही. तुम्ही क्रिडा विभागात इतर विभाग मर्ज-इन करणार असालतर तुम्ही हे करु शकता का याचा खुलासा झाला पाहिजे. तुम्ही तिथे त्यासाठी अधिकारी नेमणार आहात का याचा खुलासा झाला पाहिजे. मा.महापौर यांनी जाहीर केले होते, फिल्म फेस्टिवलला रु.११ लाखाचे बक्षिस देणार होते. तुम्ही तो ठराव पाठवलात का? तुम्ही तो ठराव पाठवला नसेल तर मी आत्ता ठराव करते. तुम्ही तो ठराव अर्जन्टमध्ये लगेच पाठवावा. जेणेकरुन आपल्या यादीत किंवा त्यांच्या कॅलेंडरमध्ये आपले नाव येईल. बक्षिसाचे स्वरुप, बक्षिस कोणाला द्यायचे हे तुम्ही ठरवा. आम्हाला त्याच्याशी काही देणेघेणे नाही. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब यांना त्याचा अधिकार असावा. परंतू कुठेतरी ठराव झाला पाहीजे. वस्तुतः असे विषय करुन होणार नाही. यात एकदा खुलासा करा. तुम्ही सगळे विभाग एकत्र करणार आहोत. इंदलकर यांचा वाचनालय विभाग तुम्ही यात घेणार आहात. अभ्यासिका देखील यात घेणार आहात. विषयात तसे क्लिअर आहे. अभ्यासिका, वाचनालय, क्रिडांगण, सगळ्या गोष्टी त्यात येणार आहेत. हे या धोरणांत शक्य आहे का याचा पहिला खुलासा करण्यात यावा.

**मा.चंद्रकांता सोनकांबळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह, आत्ता मंगलाताईंनी सांगितले हेच माझे म्हणणे आहे. क्रिडा विभागाचे काम अजिबात चांगले नाही. तीन/तीन वर्षे आम्ही साहीत्य मागतोय. मला वाटते, तुम्ही व्यायामशाळेत येऊन बघितले आहे. बघून सुद्धा सहा महिने झाले. अजून एकही काम झालेले नाही. मशिनचे पार्ट तुटलेले आहेत. ते वेल्डींग करुन बसवले आहेत. मी मागेसुद्धा सांगितले होते, वेल्डींग केलेल्या मशिनवर व्यायाम करताना जर मशिनचा एखादा पार्ट तुटला, आणि त्याचा हात निखळला, तर तुम्ही त्याची भरपाई करुन देणार आहात का? कुशन्स निघाले आहेत. बेंच तुटलेले होते. लाईटची व्यवस्था नाही. तीन/तीन वर्षे टेंडर निघत नाही. ठेकेदार मिळत नाही का? त्यात कला,क्रिडा, साहित्य कशाला घेताय. जर आपल्याला कला, क्रिडा, साहित्य यात घ्यायचे असेलतर आपण याची वेगळी समिती स्थापन करा. यात शहरातील तज्ञ मंडळी घ्या. ज्यांना सांस्कृतिक कार्यक्रमातील समजते, ज्याला साहित्यातील कळते अशा तज्ञ लोकांना बोलवा. त्यांना फी देऊ नका. शहरातील लोकांना मोफत मार्गदर्शन करण्यासाठी येणार असतील, अशा लोकांना बोलवून मग कमिटी तयार करा. आपल्याला पिण्याचे पाणी नीट मिळत नाही. रस्त्यांना खड्डे पडले आहेत. दैनंदिन गरजा आधी भागवा, मग कला,क्रिडा, साहित्य याकडे वळू या. आमची एवढीच विनंती आहे, आधी क्रिडा विभाग मजबूत करा. महापालिका शाळेतील मुले-मुली यांना क्रिडा क्षेत्रामध्ये कसे आणता येईल ते बघा. या शहरात चांगले खेळाडू आहेत, त्यांना स्कोप कसा देता येईल हे आधी बघा. हा मुद्दा अत्यंत महत्वाचा आहे. जो निधी क्रिडा विभागासाठी आहे तो वाढवा. तो फार कमी आहे. आम्हाला यात कामच करता येत नाही. तरुण नगरसेवक यात काम करतात. परंतू बजेट नसल्यामुळे केवळ महापौर चषक कधी असेल, किंवा कोणत्या नेत्याचा वाढदिवस कधी असेल हे बघणार. तुम्ही पावसाळ्यात स्पर्धा घेणार आणि उन्हाळा व हिवाळ्यात काय करणार. त्यामुळे निधी वाढवा हा खूप महत्वाचा मुद्दा आहे. क्रिडा विभागात क्रिडा विभागच ठेवा. ते खूप चांगल्या पद्धतीने काम करु शकतात. त्या-त्या क्षेत्रातल्या नामांकित खेळाडूंची एखादी समिती तयार करा. ही समिती मार्गदर्शन करेल की, तुम्ही वर्षभरात काय करायचे, खेळ कसे राबवायचे. मला वाटते, आपली मुले ऑलिम्पिकमध्ये जाऊ शकतील. देशाच्या बाहेर पोचतील. आपली इच्छा आहे, आपली आवड आहे. त्यांना सुद्धा पैसे उपलब्ध करुन देऊ. परंतू हा विभाग वेगळा ठेवा. तीन/तीन वर्षे झालीतरी साहित्य पोचलेले नाही. हिवाळा संपून जातो. व्यायाम करायचे दिवस संपून जातात. आपण व्यायामाला येणा-या माणसाला हे सांगू शकतो का. तिथे मुले सकाळी येतात त्यांना हे सांगायचे का, टेंडर निघाले नाही म्हणून मशीन बंद आहे. मा.महापौर साहेब, खरेतर ही लाजिरवाणी गोष्ट आहे. क्रिडा साहित्य पोचायचे काम आधी करा. नंतर या सगळ्या समित्या करा अशी विनंती आहे.

**मा.झामाबाई बारणे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह, क्रिडा या विषयावर बरीच चर्चा झाली आहे. मा.मंगलाताई कदम यांनी हा विषय आपल्यासमोर ठेवला आहे. खरेतर व्यायामशाळा व गार्डनमध्ये जी खेळणी आहेत, बोटक्लबमध्ये आपण आला होता, त्याठिकाणी मी मागणी केली होती. आपल्या महापालिकेने पत्राशेड बांधलेली आहे. पत्राशेडची परिस्थिती देखील आपल्याला दाखवली आहे. तुमच्या अगोदर मा.तानाजी शिंदे साहेब येऊन गेले आहेत. प्रभाग अध्यक्ष सुद्धा येऊन गेले आहे. ३/४ वेळा तिथे व्हिजिट झालेली आहे. जी मागणी केली आहे. तिथे बोटक्लबसाठी, खेळण्यासाठी मुले येतात. परवा चेअरमन येऊन गेले. चेअरमन यांच्या हस्ते त्यांच्या प्रयत्नांतून लवकरात लवकर त्या बोटी मिळाल्या आहेत. त्यांचे सुद्धा मी अभिनंदन करते. आपण तिथे आलात, कार्यक्रम घेतला आहे. आपण सगळी परिस्थिती पाहीली आहे. तिथे चांगला स्पॉट आहे. आजुबाजूच्या शहरातील अनेक खेळाडू, पोहायला सुद्धा त्याठिकाणी येतात. त्याठिकाणचे वातावरण चांगले असल्यामुळे लोक फिरायला सुद्धा येतात. आजूबाजूची जी माहिती दिली होती की, ते करुन घेऊ. मला वाटते, स्थापत्य व क्रिडा एक केले होते. स्थापत्यचे काम सुद्धा तिथे झालेले नाही. साहेब म्हणाले होते, मी एक महिन्यात करुन देतो. तिथे मुलींना कपडे बदलण्यासाठी एकच रुम आहे. भिंतीला चिरा पडल्या आहेत, भिंत आत्ता अंगावर पडेल अशी तिथे परिस्थिती झाली आहे. फरश्या दबलेल्या आहेत. हे काम करत असताना लवकरात लवकर काम करतो असे सांगितले होते. या महिन्यात करतो, पुढील महिन्यात करतो असे सहा महिने झाले आहेत. मा.मंगलाताईंनी सांगितले, कोणत्या विभागातून ते काम करायचे ते आम्हाला सुद्धा माहिती पाहीजे. जेवढे लवकरात लवकर होईल हे बघावे. तिथे एखाद्या मुलाला किंवा मुलीला खेळताना दगाफटका झालातर त्याला कोण जबाबदार आहे? एखाद्याला काही झालेतर तिथे कोणी नसते. हे काम लवकरात लवकर झाले पाहीजे एवढीच विनंती करते. तिथे खेळण्याची मागणी केली आहे, ती सुद्धा तिथे उपलब्ध झाली पाहीजेत.

**मा.उल्हास शेट्टी** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, खेळ हा विषय म्हटला की सर्व सभागृह या विषयावर बोलायला उत्सुक असते. मा.मंगलाताई, मा.सोनकांबळे ताई यांनी या विषयावर व्यवस्थित चर्चा केली आहे. मूळात क्रिडा विभागात उत्साह राहीलेला नाही. इच्छाशक्ती नसल्यामुळे या समितीचा बट्याबोळ झाला आहे. क्रिडा समिती नावापुरती राहीलेली आहे. क्रिडा समितीत काय चालते. महापौर चषकाव्यतिरिक्त काही होत नाही. मा.जितेंद्र ननवरे यांनी प्रयत्न केला आहे. कला, क्रिडा व साहित्य एकत्र आणून समिती स्थापन करायची. काहीही स्थापन करा तरी इच्छाशक्तीची गरज आहे. क्रिडा या विषयावर मा.महेश लांडगे नेहमी बोलत असतात. मा.आयुक्त साहेब, आपण कितीही काही केलेतरी, कला व क्रिडा क्षेत्र एकत्र केलेतरी या विभागात इच्छाशक्ती नसेलतर इथे काहीही होणार नाही. महापालिकेत बोटावर मोजण्याइतकेच

काही विभाग आहेत, तिथे सगळ्यांचे जास्त लक्ष असते. क्रिडाकडे कुणाचेच लक्ष नाही. क्रिडा विभागाला वर्ल्डवाईड खूप महत्व आहे. तिथे क्रिडासाठी वेगळे बजेट असते. आयपीएल स्पर्धा आहेत. मोठेमोठे वर्ल्डकप किंवा हॉकी, फूटबॉलच्या स्पर्धा बघतो. तिथे क्रिडाला किती एक्सपोजर आहे. त्या देशांत करिअर म्हणून स्पोर्टस् कडे बघितले जाते आपल्याकडे चांगले खेळाडू आहेत. त्यांना मानसन्मान मिळत नाही. कितीतरी असू देत. स्पर्धेत बक्षिसपात्र विद्यार्थ्यांना नगरसेवक आपआपल्या परीने बक्षिस देण्याचा प्रयत्न करत असतात. त्यांनी किती मान मिळतो आहे. हे सर्वांनी प्रत्येकाने पाहीले आहे. याठिकाणी सत्कार करायला किती जणांना बोलवायचे, कशाला बोलवायचे, सभागृहाचा वेळ वाया जातो असाही रोष होत होता. म्हणजे आपण क्रिडाचा अपमान करतो. आपण त्यांना काही देत नाही. मग त्यांना एक फूल द्यायलाही वेळ नसेलतर त्यांनी तरी आपले आयुष्य खेळासाठी का बरबाद करायचे. ते अभ्यास करुन डॉक्टर किंवा इंजिनिअर होऊन त्यांचे आयुष्य घडवतील. पण असे व्हायला नाही पाहीजे, हे दूर्दैव आहे. इथे मा.सोनकांबळे ताईंनी सांगितले. कोणत्या अधिका-याची या कमिटीत काम करायची इच्छा आहे, कोणाचीच नाही. या कमिटीत महापौर चषकसाठी करोडो रुपये खर्च करतो. कोण असे करतो. एक स्पर्धा घेऊन काय कौतुक करणार आहोत. एक खेळाडू तयार होण्यासाठी फाऊंडेशन मजबूत झाले पाहीजे. त्याचा बेस चांगला व्हायला पाहीजे. पूर्वी व्हेकेशन कोर्सेस करत होतो. व्हेकेशनमध्ये लोकांना बोलवून क्रिडा स्पर्धांचे ट्रेनिंग देत होतो. आत्ता सगळे बंद झाले आहे. आता प्रायव्हेट कमर्शियल लोक आपलीच जागा भाड्याने घेऊन कोचिंग करतात. आपल्या मैदानांवर महापालिका करोडो रुपये खर्च करते. पण आपली मानसिकता कधी झालेली नाही. कुठेतरी मदनलाल धिंग्रा स्टेडीयम असू दे, हॉकीचे मैदान असू देत. व्हेकेशन बॅचेस घ्यायला सुरुवात करावी. वेंगसरकर ऍकॅडमीला पाहून आलो. बाहेरुन लोक येऊन आपल्या जागा घेऊन तिथे चांगले खेळाडू तयार करण्यासाठी प्रयत्न करतात. आपण ग्राऊंड दिले होते. त्यांनी बेस इम्प्लिमेंट केले आहे. आपण रोज पाहतोय ही ही स्पर्धा चालू आहे. या स्पर्धेचे उदघाटन केले आहे. याला बक्षिस मिळाले आहे. क्रिडा समितीला फ्रिडम नाही. कोणी स्थायी समिती चेअरमन झाला की तो आपल्याकडे कबड्डी स्पर्धा घेऊन जाणार. उद्या मी काही झालो की मी माझ्याकडे हॉकी स्पर्धा घेऊन जाणार. या स्पर्धेत क्रिडा समितीचे वाट्टोळे झाले आहे. सांस्कृतिक कार्यक्रम असेल तो अमुक अमुक ठिकाणी झाला पाहिजे. व्याख्यानमाला असेल यांच्याकडे झाला पाहीजे. कुठेही बेस तयार करायचा नाही. शहरात नावलौकिक वाढेल. आपल्याकडे असणारे विद्यार्थी असू द्यात, कला क्षेत्र असू देत, व्यासपीठ तयार करण्यासाठी कोणती संधी नाही. आपले लोक पुण्यात जाऊन चमकतात. आपण त्यांचे कौतुक करतो. मुंबईला जाऊन खेळतात. आपण त्यांचे कौतुक करतो. स्कॉलरशीप असू द्यात, मानसन्मान असू द्यात कधी दिला आहे का. गेले दहा वर्षांपासून इथे फूटबॉल, हॉकी स्पर्धा खेळलेले, कबड्डीत

इंटरनॅशनल खेळलेल्या लोकांना एक लाख/दोन लाख देण्याच्या भरपूर घोषणा झाल्या. पण कोणाला सुद्धा कधी दिले नाहीत. जिथे फायदा नाही. तिथे अधिका-यांना, कोणालाच इंटरेस्ट नाही. टाऊन प्लॅनिंग व बिल्डींग परमिशनमध्ये बदली पाहीजे. तिथेच काम पाहीजे. काहीतरी चांगले करायचे, काहीतरी चांगले खेळाडू पिंपरी चिंचवडमध्ये तयार करायचे असे शहराचे नाव मोठे करायचे. एकातरी अधिका-याला वाटते का? कोणीतरी स्पोर्टस् मध्ये चांगले प्रदर्शन केलेले माजी खेळाडू यांनी कमिटीत घ्यायचे कर इथे सुद्धा राजकारण. माझ्या माणसाला द्या. इकडे नका देऊ, तिकडे द्या. व्यायामशाळांची परिस्थिती काय. काही लोक आपलीच प्रॉपर्टी घेऊन व्यवसाय करतात. व्यायामशाळा चांगल्या पद्धतीने चालवतात. अधिका-यांना चांगले काम का करता येत नाही. स्विमिंगमध्ये अशीच परिस्थिती आहे. त्याच्या मेंटेनन्सपेक्षा फक्त टेंडरमध्ये लोकांचे लक्ष आहे. माझा माणून टेंडरमध्ये कसा बसतो, त्याला काय मिळते यातच त्याचे लक्ष आहे. प्रत्येकाला महापौर चषक पाहीजे. मा.मंगलाताई कदम यांनी सांगितल्याप्रमाणे महापौर मॅरेथॉनचे उदघाटन करतात. दीड/दोन महिन्यांच्या कालावधीत ही कमिटी काम करते. तिथे मंगलाताईसारख्यांचे काहीच चालत नाही. कला क्रिडा क्षेत्र एकत्र करणार असालतर त्यांची पहिली इच्छाशक्ती पाहीजे. गाण्याची आवडे असणारे, डान्सची आवड असणारे असे अजूनही काही कलागुण असणारे या शहरात आहेत. ते पुणे शहरात जातात. पुणे महापालिकेने सिंहगड इथे गाण्यासाठी मोठे सेमिनार भरवले होते. तिथे त्यांना खूप मोठा रिस्पॉन्स मिळाला होता. आपला असा प्रस्ताव कधीतरी आला होता का की, अशा अशा पद्धतीने करु. तुम्ही याला मान्यता द्या. कधीच असा प्रस्ताव येत नाही. कधी चेअरमन यांच्याकडे आला होता का. आपल्याला क्रिडासाठी या वर्षी फूटबॉल स्पोर्टसमन यांना सुट्टीत एक कॅम्प भरु व चांगले स्पोर्टसमन निवडून, चांगली टिम तयार करु. पुणे जिल्ह्याचे फेडरेशन करायला आपल्याला कधी संधी मिळत नाही. आपण कधी प्रयत्न करत नाही. आज पुण्याच्या माध्यमातून स्पर्धा भरवतो. मी पूर्वी ऍथेलेटीक्समध्ये होतो. मला माहित आहे. आम्ही पिंपरी चिंचवडसाठी बाळासाहेब मोहोळ स्पोर्टस् क्लब असू द्या पिंपरी ट्रॅक असू द्या. या माध्यमातून आमच्या दोन दोन बसेस भरुन पुण्यात जात होत्या. पिंपरी चिंचवडमध्ये स्पर्धा कधीच झाली नाही. पुण्यातले खेळाडू पिंपरी चिंचवडच्या ऍथेलेटीक्सला घाबरत होते. ठाणे इथे मॅचेसला जायचो. काहीही मानधन मिळत नव्हते. आम्ही मिसळपाव खाऊन दोन दोन/ तीन तीन दिवस काढायचो. या शहरात असे खेळाडू घडले आहेत. ऍथेलेटीक्स असू देत. हॉकी असू देत. आपले हॉकी स्टेडीयम देशातील बोटावर मोजण्याइतक्या हॉकी स्टेडीयमपैकी आहे. त्याची दूर्दशा काय झाली आहे? त्याचे महत्व का नाही? तिथे सुद्धा स्पर्धेसाठी दोन संघटन. तो तिकडून घेऊन येणार, हा इकडून उशीरा घेऊन येणार. मग त्या हॉकी स्पर्धेचा बट्टयाबोळ होतो. फूटबॉलची स्पर्धा झाली आहे. माझे सांगायचे तात्पर्य हेच आहे की, क्रिडा क्षेत्र असू दे, कलाक्रिडा क्षेत्र असू देत. या

विभागाकडे पहिली इच्छाशक्ती पाहीजे. असे ठराविक अधिकारी पाहीजेत. शहरात बेस फाऊंडेशन केले पाहिजे. मा.महापौर साहेब, माझी आपल्याला नम्र विनंती राहील की, हि क्षेत्र भरवत असताना सगळीकडे समान न्याय द्या. एखादा नवीन नगरसेवक म्हणून आमच्या वॉर्डात कोणताही कार्यक्रम नाही, व्याख्यान नाही, कोणता उपक्रम नाही. आकुर्डी परीसरात व्याख्यान भरवा म्हणून किती वेळा सांगितले. आमच्या भागातल्या नागरीकांच्या कानावर काहीतरी दोन शब्द, आमच्याही कानावर पडतील. बोदडेंना चार वेळा पत्र दिले होते. तरी होत नाही. महापौर सांगतील, आयुक्त साहेबांना सांगितले आहे, होत नाही, ही नकारघंटा आहे ती कुठेतरी बंद झाली पाहीजे. असा विषय आल्यानंतर आम्ही पाच मिनिटे बोलणार. परत आपण विसरणार. परत रज्जाक पानसरे काम करायला तयारच आहेत. त्या रज्जाक पानसरेंना काय अधिकार दिले आहेत? ते काय काम करणार? त्यांना एक रुपयाचे पण अधिकार दिलेले नाहीत. फक्त पोस्ट दिली आहे. नागपुरे यांना काय अधिकार आहेत? जेएनएनयूआरएमच्या माध्यमातून करोडो रुपये सल्लागारावर खर्च करतो. असे खेळाडूंवर खर्च केलेतर महापालिकेचे नाव तरी होईल. त्यांचे आई-वडील कौतुक करतील. माझ्या मुलाला शाबासकी दिली म्हणून. म्हणून कोण म्हणतो, सत्कार करायचे नाही. हे केले पाहीजे, ते केले पाहीजे. टप्प्याटप्प्याने करा. या मिटींगला दहा जणांचे सत्कार करा. पुढील मिटींगला दहा जणांचे सत्कार करा. पण त्यांचे कौतुक करा. त्यांना कौतुकाची थाप मिळणे आवश्यक आहे. त्यांना मोरल पुशिंग आहे. आज इंटरनॅशनल लेवलवर स्पोर्टसकडे करिअर म्हणून पाहिले जाते. आपल्याकडे खेळात कोण करीअर करतो. आईवडील म्हणतात, कुठल्या खेळाच्या नादी लागतोस. दहावी, बारावीनंतर माणूस खेळ सोडतो. आजही तशीच परिस्थिती आहे. आपण भरपूर काम करावे. पण हे काम करायचे केवळ समाधान मिळेल. ते कोणत्याही कामात मिळणार नाही असे आवर्जून सांगतो. मी अपेक्षा व्यक्त करतो की, पिंपरी चिंचवडमधील खेळाडूंना चांगले दिवस येतील,मानाचे स्थान मिळेल.

**मा.सुलभा ऊबाळे** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा. सदस्य, मी क्रिडा समितीचे सभापती व समितीच्या सर्व सदस्यांचे अभिनंदन करेन की, त्यांना याठिकाणी चांगला विषय समोर आणला आहे. खरेतर महाराष्ट्र शासनाचा विभाग आहे, कला क्रिडा विभाग. या विभागाकडून कला क्रिडा व सगळ्या गोष्टी एकत्रितपणे राबविल्या जातात. सगळ्यांनी खास करुन उल्हासभाईंनी विषय मांडला, यात त्यांची ताळमेळ आहे की तो झाला नाही. पण तो झाला नाही म्हणून होणार नाही असे नाही. सभापतींनी स्वतः पाण्यात उडी मारून जलतरण तलावाचे उद्घाटन केले. म्हणजे त्यांना काहीतरी बदल घडवायचा आहे. म्हणजे अशा मंडळींना पाठिंबा देणे सभागृहाचे, महापौरांचे कर्तव्य आहे. क्रिडा विभागाबाबत जेवढे बोलू तेवढे वाईट आहे. अधिकारी आहेत त्यांचे नाव घ्यायचे तरी आम्हाला आतमध्ये बोलता बोलता मरगळ

येते. अशा प्रकारची निगेटीव्हीटी त्या विभागात आहे. माझ्या वॉर्डात एवढा मोठा स्केटींग ब्रीज आहे. तिथे खेळून मुले नॅशनल प्लेअर झाले आहेत. पण तुम्ही पिंपरी चिंचवडच्या अधिका-यांना विचारा, महापालिकेच्या माध्यमातून तुम्ही एकदा तरी स्पर्धा भरवली आहे का? मी वारंवार सांगते, आपण क्रिडांगण करतो. जलतरण तलाव तर बंदच असतो. आपण कोच का ठेवत नाहीत. कारण सर्वसामान्य घरांतली मुले कोचला पैसे देऊन शिकतील अशी या मुलांची घरती परिस्थिती नसते. माझ्या वॉर्डातला स्केटींग ब्रीज फक्त पंचवीस रुपये भाडे घेऊन एका प्रायव्हेट असोसिएशनला भाड्याने देतो. ते प्रत्येक मुलाकडून एक हजार फी घेतात. अशी शंभर मुले स्केटींग खेळतात. ज्यांची परिस्थिती आहे हजार रुपये फी देण्याची व चार ते पाच हजारांना स्केटस् विकत घेण्याची. सर्वसामान्य मुलांना स्केटींग खेळायची इच्छा झालीतर ते महापालिकेच्या स्केटींग ब्रीजवर खेळू शकतील. परंतू दूर्देवाने जे प्रोफेशनली काम करतात. अशांसाठी सर्व सुविधा करुन ठेवली आहे. आपल्या महापालिकेतील मुलांना वाटत नाही का की त्यांनी स्केटींग शिकावे. परंतू स्केटींग हा खर्चिक खेळ असल्यामुळे आई वडील त्यांना स्केटस् घेऊन देऊ शकत नाहीत. व त्या स्केटींग ब्रीजचा त्यांना उपयोग होत नाही. तोच प्रकार जलतरण तलावाचा आहे. जलतरण तलावात कोच ठेवा. मुलांना डायरेक्ट पाठवायचे म्हटले तरी रिस्क असते. मुले जात नाही. वाचनालय विभाग – माझ्या वॉर्डात सुद्धा वाचनालय आहे. ते या समितीत जॉईंन झाले तर त्याच्याकडे विशेष लक्ष राहील असे मला वाटते. वाचनालयात कधीही वॉचमन उपस्थित नसतो. वाचनालय आठवड्यातले चार/पाच दिवस बंदच असते. तीच तीच रद्दी झालेली पुस्तके असतात. त्यामुळे नागरीकांना वाचनालयांत जाण्यासाठी उल्हास रहात नाही. त्यामुळे माझी विनंती आहे, हे सर्व विभाग त्या समितीत ऍड झालेतर सदस्यांनाही त्या समितीत काम करायला उत्साह राहील. या सगळ्या विषयावर वाचनालय असेल, क्रिडा असेल, कला असेल, सांस्कृतिक असेल यावर दर १५ दिवसांनी चर्चा तरी घडेल. इतर वेळी या विषयावर कोणी बोलत नाही.ही चर्चा दरवर्षी बजेट मिटींगला घडवतात. आपण क्रिडाचा विषय आल्यानंतर महापालिका सभेत बोलतो. प्रभाग समितीत या विषयावर बोलत नाही. दर १५ दिवसांनी समितीत विषय आल्यावर त्यावर चर्चा घडेल. अधिकारी सुद्धा अनेक गोष्टींना अन्सरेबल राहतील. आणि महत्वाचे म्हणजे हे विभाग वाढवले तर अधिकारी सुद्धा वाढवावे लागतील. काही खर्चाची तरतूद सुद्धा वाढवून द्यावी लागेल. दरवर्षी सांस्कृतिक विभाग आला की कोणीतरी एचओडी ची नियुक्ती करतो. संगित महोत्सव आली की तुपे साहेबांना त्रास देतो. तुपे साहेबांना त्यांच्या व्यस्त वेळापत्रकातून वेळ काढून लक्ष द्यावे लागते. गटनेता म्हणून सदस्यांना विचारले की क्रिडा समितीत जायचे का तर सदस्य क्रिडा समिती नको म्हणतात. असे काहीतरी निश्चितपणे घडवलेतर सदस्य देखील क्रिडा समितीत जायला इच्छुक राहतील. मा.महापौर साहेब, हा विषय मंजूर करत असताना योग्य ते मनुष्य बळ, त्यासाठी लागणारी सगळी साधन

सामुग्री सकट आणि काही खर्चाची तरतूद असेल तर त्यासह हा विषय मंजूर करावा अशी विनंती करते.

**मा.आर.एस.कुमार** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सदस्य, गेली अनेक वर्षांपासून पाहतोय, या विभागाकडे दूर्लक्ष केले जाते आहे. क्रिडा विभागात अधिकारी जायला तयार नाहीत. सदस्य सुद्धा समितीमध्ये जायला तयार नाहीत. मा.जितेंद्र ननवरे हे क्रिडा समितीचे सभापती झाल्यानंतर त्यांनी स्वप्न बघितले की काय काय करु शकू. पण ते करु शकले नाहीत. केलच तरी फायनान्शियल रिस्ट्रीकशन्स, मॅनपॉवर रिस्ट्रीकशन्स आहेत. स्थापत्यचे लोक तिथे जात नाहीत. जसे उद्यान स्थापत्य केले तसे क्रिडा विभागासाठी वेगळे क्रिडा स्थापत्य केले पाहीजे. नाहीतर मदनलाल धिंग्रा स्टेडीयम सारखे होईल. मदनलाल धिंग्रा स्टेडीयमवर स्थापत्यचे लोक काम करत होते. पण तिथे ॲडव्हाईजर कोणी नसल्यामुळे क्रिडाने स्थापत्यकडे हॅण्डओव्हर करताना टेकओव्हर केले नाही. तिथे तसा व्ह्यु नव्हता. क्रिडा अधिका-यांकडे इतर अनेक विभागांचा देखील चार्ज होता म्हणून रु.५० लाख पाण्यात गेले. माझी विनंती आहे की, जसे गार्डन स्थापत्य केले. एका जे.ई. ला दोन प्रभाग द्या. क्रिडाला देखील वेगळे स्थापत्य पाहीजे व ते स्थापत्य कमिटीच्या अंडर पाहीजे. या वर्षी क्रिडा विभागासाठी रु.७५ लाख बजेट केले आहे. क्रिडासाठी फक्त ७५ लाख रुपये शेमफुल. प्रत्यक्षात दोन, तीन किंवा पाच कोटी द्या. आपल्याला इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलप करायचे नाही. ७५ लाखात कमिटी काय करणार? स्वतंत्र कमिटी स्थापन करत असताना स्वतंत्र अधिकारी, असि.कमिशनर स्वतंत्र दिला पाहीजे. अधिकारी जिथे इंटरेस्ट आहे तिथेच काम करतात. क्रिडा विभागाकडे लक्ष देत नाहीत. म्हणून इंडिपेण्डंट असिस्टंट कमिशनर दिला पाहीजे. स्थापत्य फायनान्स यांच्याकडे ठेवा. मग इन्फ्रास्ट्रक्टर डेव्हलप करायचे असेल तर ते करु शकतात. रु.७५ लाखाचे बजेट खूप कमी आहे. एकूण बजेटच्या ३ ते ५ टक्के रक्कम अशी तरतूद ठेवावी. आपल्याला डेव्हलप करायचे आहे. आपल्या जिमस् जुन्या प्रकारच्या आहेत मॉडर्न नाहीत. साहीत्य मागितले तर मी ५ वर्षे मागतोय तरी जिमचे साहित्य मिळत नाही. जो अधिकारी नेमला आहे तो काही करु शकत नाही. सहा.आयुक्त हे शासनाकडून डेप्युटेशनवर आलेले असतात. त्यांना क्रिडा या विषयात जास्त इंटरेस्ट नसतो. त्यांच्याकडे एकापेक्षा अधिक विभागांचा चार्ज असतो. म्हणून मा.जितेंद्र ननवरे यांनी जी सूचना दिली आहे. ही सूचना मान्य करायला हरकत नाही. हे मान्य करत असताना तुम्ही त्यांना फायनान्स द्यायला पाहीजे, मनुष्यबळ द्यायला पाहीजे. इंडीपेण्डंट डिसिजन मेकर दिला पाहीजे. इंडिपपेण्डंट डिसिजन मेकर दिलातरी त्यांना पॉवर द्यायला पाहीजे. तरच ही कमिटी काम करु शकेल.

**मा.बाबासाहेब धुमाळ** – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा. सभागृह, क्रिडा या विभागावर चर्चा चालू आहे. सदस्यांनी सांगितले तिथे फंड नाही. फंड नाही म्हणून तिथे कोणी जायला मागत नाही. इथे मी विनंती करतो की, आत्ता सभागृहात प्रत्येक विभागात क्रिडासाठी रु.१० कोटी, हेडसाठी रु.१० कोटी डिक्लेअर करा. ही वस्तुस्थिती आहे. माणूस दिसेल तिथे जातो. दिसले नाही तिथे माणूस जाणार नाही. अशी माझी कल्पना आहे. आपण पाहिले असेल, सगळी देवाला मानणारी मंडळी आहोत. एकालातरी देव दिसला का. आत्ता आपण जयमल्हार मालिका पाहतोय. त्यात दाखवले आहे खंडेराय कसे आहेत. हेल्थ ईज वेल्थ. आपले शरीर हीच आपली संपत्ती आहे. ही संपत्ती टिकवायची असेलतर त्यासाठी क्रिडाला फार महत्व देणे गरजेचे आहे. शिक्षण तर पाहीजेच पण शरीर चांगले नसेल तर नुसते शिक्षण उपयोगी नाही. क्रिडा विभागात कला, सांस्कृतीक, साहित्या सगळे एकत्रित केले आहेत. म्हणजे त्या त्या विभागाची कामे होतात त्यावेळी प्रत्येक विभागाला फंड असतो. आपल्याला तो उपलब्ध होत नाही. प्रत्येक वेळी जी.बी.कडे किंवा स्थायी समितीकडे विषय मांडून तो सँक्शन करुन घ्यावा लागतो. नंतर तो पैसा फ्लो करावा लागतो. माझे म्हणणे आहे की, याठिकाणी आपण क्रिडा बद्दल व्हिजन पाहिले आहे ते व्हायचे असेलतर प्रत्येक भागाला रु.५/५ कोटी सँक्शन करा. तरतूद करा. आपले चेअरमन, आमदार मा.महेश लांडगे यांनी अर्धा तास कुस्तीबद्दल चर्चा केली होती. कुस्ती असू द्या, क्रिकेट असू द्या, कबड्डी असू द्या, प्रत्येक खेळात प्रवेश मिळवायचा असेलतर त्याठिकाणी नवीन भावी जनरेशन उभी करुन देणे गरजेचे आहे. क्रिडांगण उपलब्ध करुन देण्याची गरज आहे. आत्ताच मा.उल्हास शेट्टी यांनी सांगितले. दोन व्यक्तींची नावे सभागृहात घेतली. मला कोणाला नावं ठेवायची नाहीत. पण इथे राजकारण आहे. तू मोठा का मी मोठा. जेव्हा एवढे क्रिडांगण केले त्यावेळी सभागृहात वर्षभर चर्चा चालली होती. त्यावेळी खर्च कोणी केला, कसा केला ही वस्तुस्थिती आहे. त्यावेळी सुद्धा कोर्टकचेरी झाली होती. असे कार्य केले की माणसाला त्यात वास येतो, दुर्गंधी येते. आपण स्वतंत्र विभाग स्थापन करावा अशी विनंती आहे. त्या विभागाला पैसे द्यावेत, ते वर्ग करावेत. तुपे साहेब आम्हाला कधी कधी फोन करतात. असा-असा कार्यक्रम आहे. तुम्ही तुमच्या ट्रान्सपोर्टवाल्यांकडून काहीतरी अनुदान द्या. त्यावेळी कार्यक्रमसुद्धा केला होता. संस्कृतीचे जतन करणारी आपली महापालिका आहे. आपण पहिल्यांदा नियोजन करताना आपली डिमांड काय आहे त्या भावनेने नियोजन करणे गरजेचे आहे. म्हणून इथे फक्त समित्या नेमून कार्य साधणार नाही. तिथे फंड उपलब्ध करुन कार्य करा.

**मा.जितेंद्र ननवरे-**मा.महापौर साहेब,मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा. सभागृह, मी याठिकाणी सर्व सदस्यांचे अभिनंदन करतो. त्यांनी या विषयाविषयी चौफेर अशी चर्चा केली आहे. सर्वप्रथम मी सर्वांना सांगू इच्छितो की, इंदलकर साहेब वाचनालय विभाग सांभाळत असतील. तुपे साहेब

सांस्कृतिक विभाग सांभाळत असतील याला माझा काही आक्षेप नाही. छत्रपती शिवाजी महाराज नेहमी म्हणायचे, अश्वतस्य पागा, पागातस्य बेदीरी, बेदीरी तस्य राज्य म्हणजे घोड्याला बांधणा-या पागा त्या जागा जशा मजबूत असतात, तसे ते राज्य विस्तारते, तसा महसूल गोळा होतो. मी संस्कृती, कला व साहित्य या विभागात काही हस्तक्षेप करणार नाही. फक्त दर १५ दिवसांनी जी सभा होईल त्या सभेला या अधिका-यांनी उपस्थित रहावे. यात नमूद केले आहे, क्रिडा स्थापत्य. शहरात ३ नाट्यगृहे आहेत. चवथ्याचे काम चालू आहे. मुंबई इथून कलाकार येतात. ज्यावेळी सांस्कृतिक कार्यक्रम होतात, अशी दूरावस्था आहे. कै.रामकृष्ण मोरे सभागृहाच्या व्हीआयपी रुममध्ये असा घाण वास येतो. त्यावर कोणाचा नियंत्रण नाही. शहरात जी वाचनालय आहेत, संस्कृतीक हॉल आहे किंवा क्रिडाची मैदाने आहेत. ते आमच्या विभागाकडून दुरुस्त होतील. त्याच्यावर लक्ष राहील. त्यामुळे हा विषय करा. सांस्कृतिक भावना शालेय वयापासून जोपासली जाणे गरजेचे आहे. त्याचे स्वरुप चित्रपट महोत्सव, सांस्कृतिक महोत्सव एवढेच न रहाता त्याचे स्वरुप व्यापक झाले पाहीजे. महापालिकेच्या प्रत्येक शाळेत ग्रंथालय सक्षम झाले पाहीजे. विद्यार्थ्यांना वाचनाचीपण आवड निर्माण झाली पाहीजे. या विभागाचे स्वरुप वाढवा. आम्ही क्रिडावाले यात हस्तक्षेप करणार नाही. फक्त त्यावर नियंत्रण राहील. मी मा.महापौर साहेब यांना विनंती करतो की, या विभागाचे स्वरुप व्यापक व्हावे म्हणून हा विषय आहे तसा मंजूर करावा.

**मा.योगेश बहल-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब,सर्व सन्मा.सभागृह, वास्तविक पाहता क्रिडा समितीने विशेषतः मा.जितेंद्र ननवरे यांचे याठिकाणी अभिनंदन करेन. या विषयाकडे गांभिर्याने पहायची गरज आहे. कारण आपण हेड जरी वेगळे केले असले, स्विमिंगपूल असेल, पॉलीग्रास मैदान असेल, आण्णासाहेब मगर स्टेडीयम असेल, व्यायामशाळा असेल त्यातील साहित्य असेल, टेनिस कोर्ट असेल, कल्चरल हॉल असेल, हे सगळे स्थापत्यखाली घेऊन तिथे आपण कोट्यावधी रुपयांची गुंतवणूक करतो. तो खर्च झाल्यानंतर इथे तीन ऑडीटोरीयम यांचा उल्लेख केला. स्थापत्यवाले खर्च करुन मोकळे होतात. कोट्यावधी रुपये तिथे इन्व्हेस्ट होतात. परंतू स्विमिंगपूल असेल,पॉलीग्रास मैदान असेल,आण्णासाहेब मगर स्टेडीयम असेल,बॅडमिंटन हॉल असेल,लायब्ररी असेल, जिम साहित्य असेल या ठिकाणी कंट्रोल कोणाचाही नाही. मा.जितेंद्र ननवरे यांनी उल्लेख केला. संत तुकारामनगर येथील आचार्य अत्रे सभागृह, रामकृष्ण मोरे सभागृह इथे हिच परिस्थिती आहे. वरचे लिकेजचे काम होत नाही. या वर्षी बजेटमध्ये तरतूद केली आहे. आपण पुन्हा ६०/७० लाख खर्च करु, पुन्हा हिच परिस्थिती आहे तशी होईल. अशा वेळी वेळेवर मेटेनन्स झाली नाहीतर, युटीलिटी झाली नाहीतर कामाने काम वाढत जाते. ते आणखी खराब होत जाते. हे सर्व हेड एका छताखाली येण्यासाठी तिथे एक सक्षम अधिकारी दिला गेला पाहीजे. एक सहा.आयुक्त दिला पाहीजे ज्याला यात इंटरेस्ट आहे. एकदा

बांधल्यानंतर पुढील मेटेनन्स केले गेले पाहीजे. That has to rotate to that particular office. सर्व पक्षांचे सदस्य त्या समितीत असतात. त्यांना पण वाटले पाहीजे, आपण त्या कमिटीत गेल्यावर आपल्याला आचार्य अत्रे सभागृहविषयी बोलता येईल, रामकृष्ण मोरेबद्दल विषयी बोलता येईल, जिमबद्दल बोलता येईल, लायब्ररीबद्दल बोलता येईल, जिम्नॅशियमबद्दल बोलता येईल. हे सर्व हेडस् कला, क्रिडा याखाली येणार असतील तर तिथे भरीव तरतूद करणे देखील गरजेचे आहे. जरी यावर्षाच्या बजेटमध्ये नसलेतरी आपण हा विषय महापालिका सभेपुढे स्थापत्यकडून घेऊन आणा. त्यासाठी भरीव तरतूद करुन घ्या. इतर हेडवरुन तरतूद वर्ग करुन घेऊ. परंतू आपण जे म्हणतो, हरित पिंपरी चिंचवड शहर. हरित होणार मग आपली उद्याने आहेत, त्याच्या मेंटनन्सचा विषय आहे. त्याचबरोबर लाखो रुपये खर्च करुन इमारती बांधलेल्या आहेत. लाखो रुपये खर्च करुन तिथे साहित्य ठेवले आहे, पण ते सुद्धा नीट मेंटेन होते का नाही. या साध्या साध्या गोष्टी असतात. डम्बबेल खराब होत नाही. पण त्याचा नट पडला तर ते रहात नाही. मल्टीपर्पज जीम असते. त्याची पुली असते त्याची वायर पडलीतर ती पुली अशीच पडून राहते. म्हणजे एक केबल नसल्यामुळे ते मशीन वर्कआऊट होत नाही. व्यायाम करु शकत नाही ही डेंजर परिस्थिती आहे. त्या त्या वॉर्डातली चांगली मंडळी असतील, ती पुढे येऊन काम करत असतील, त्यांना जिम्नॅशियम चालू करायला काहीच हरकत नाही. त्यांना लिमिटेशन ठरवून द्यायला पाहीजे की, दहा रुपये, पंधरा रुपये फी लावा. तिथे व्यवसाय किंवा धंदा करता कामा नये. का करता कामा नये. कारण त्या भागातला नगरसेवक असतो. दोन नगरसेवक असले तरी त्यांनी मिळून एक जिम अमुक संस्थेला चालवायला द्यायची. त्यांची देखरेख असेल, जबाबदारी त्यांची असेल. त्यांच्याकडून ठराविक डिपॉझिट घ्यावे. त्यामुळे जिम उघडण्याचे, बंद करायचे काम व्यवस्थित होते. आपल्या कर्मचा-याला रु.२०,०००/- पगार द्यायला लागतो. त्याने एकदा व्यायामशाळा उघडली की तो संध्याकाळी सात आठलाच येतो. चावी देऊन जातो व सांगतो, ही जिम रात्री बंद आहे. अशीच परिस्थिती आपल्या सगळ्या कर्मचा-यांची आहे. हजेरी लावायची व गुल व्हायचे. म्हणून या विभागाकडे कटाक्षाने बघणे गरजेचे आहे. त्यांची सूचना अतिशय योग्य आहे. सांस्कृतिक विभागाबद्दल असेच आहे. कोणीतरी बघायचे. पूर्वी डॉ.नागकुमार बघत होते. आता श्री.तुपे साहेब बघतात. श्री.संजय कांबळे आहेत. त्यांना त्यात रस आहे. ते पाहतात, बघतात. त्याबद्दल त्यांचा आक्षेप नाही. परंतू त्यांनासुद्धा चांगला कार्यक्रम असेलतर बजेटचा विचार करावा लागतो. मा.महापौर यांचे पत्र घ्यावे लागते. आयुक्त साहेबांची मंजूरी घ्यावी लागते. स्थायी समितीकडे ऐनवेळी यावे लागते. परत तिथे वाद होतात. असे न करता, हेडवर बजेटची तरतूद केली की, अमुक-अमुक गोष्टींवर एवढा खर्च होणार आहे, एवढा खर्च क्रिडावर होणार आहे. असे बायफरकेशन करुन तुम्ही एक सक्षम अधिकारी द्यावा. फक्त टिका करण्यात काही अर्थ नाही. आपल्याकडे इतकी

क्रिडांगणे, व्यायामशाळा आहेत. पिंपरी चिंचवड महापालिकेचे कौतुक करावे तेवढे कमी आहे. फक्त त्याची देखभाल नीट होत नाही. ते चांगल्या स्थितीत नाहीत हे आपले दूर्दैव आहे. आपण इतका खर्च करतो. पाचवे नाट्यगृह पिंपळे गुरवला पण काम सुरु करतोय. अशा परिस्थितीत किती खर्च करतो. फक्त क्रिडाला तुटपुंजे अधिकार दिलेतर त्याने काही होणार नाही. आत्ता रज्जाक पानसरे यांचा उल्लेख झाला. त्याआधी तिथे सातव होते. आता नांगरे आहेत. या लोकांना साधे दहा हजार देण्याचे पण अधिकारी नाहीत. त्यांनी पैसे द्यावेत असे आमचे मुळीच म्हणणे नाही. तिथे सक्षम अधिकारी देऊन या सगळ्या जबाबदा-या त्यांच्यावर टाकायच्या. कला असेल, क्रिडा असेल, सांस्कृतिक असेल एक वेगळा विभाग होऊन चांगल्या रुपाने त्याच्यावर कंट्रोल करता येईल. लायब्ररी विभाग अधिक सक्षम होईल. या नेहमीच्या कटकटी कमी होतील. आत्ता मा.जितेंद्र ननवरे यांनी सांगितल्याप्रमाणे, प्रत्येक शाळेत सगळीकडे शिक्षक काळजी घेतात, वॉचमन ठेवला आहे. कितीतरी ठिकाणी कॉम्प्यूटर लॅब केल्या आहेत. पण तिथे विद्यार्थ्यांचे ज्ञान अपडेट होण्यासाठी अंतर्गत सूसज्ज ग्रंथालय असेल तर अशा पद्धतीने त्या शाळा चांगल्या करु शकतो. तिथे खर्च करु शकतो, अशा पद्धतीने क्रिडाला प्रमोट करण्यासाठी, शिक्षणाला प्रमोट करण्यासाठी, सांस्कृतिक कार्यक्रमांना प्रमोट करण्यासाठी आपण काहीतरी वेगळे करतो आहोत असे दाखवून द्यावे. इतर महापालिकांपेक्षा आपण आदर्श दाखवून द्यावा. या सर्व गोष्टींचे समायोजन करुन आपण हा विषय मंजूर करावा अशी मी विनंती करतो.

**मा.मंगलाताई कदम** – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडते - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत पुणे अंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव (PIFF) आयोजित करणेकामी अंदाजपत्रकात तरतूद आहे. पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवामध्ये दरवर्षी र.रु.११ लक्ष रकमेचे हिंदी चित्रपट फिल्म फेस्टिवल पुरस्कार देणेस मान्यता देणेत यावी.

**मा.जितेंद्र ननवरे** – मा.महापौर साहेब, मा.मंगलाताई कदम यांनी जी उपसूचना मांडली आहे त्याला अनुमोदन देतो.

**मा.अपर्णा डोके** – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक - ६७४ विषय क्रमांक – ३
दिनांक – १३/५/२०१५ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.किरण मोटे, मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव –
२) मा.क्रिडा समितीकडील ठ.क्र. ९० दि. ६/४/२०१५

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ३० (२) मध्ये विशेष समित्या नियुक्त करण्याची तरतुदीनुसार मा.महापालिका सभा ठराव क्र.५१२९,

दि.०९/०४/२००४ अन्वये क्रीडा समिती सभा स्थापन करणेस व अन्य विशेष समित्यांच्या सदस्य नेमणुकांच्या वेळीच क्रीडा समिती सदस्यांची नेमणूक करणे कामीची तजवीज ठेवणेस तसेच झोपडपट्टी सुधार, गृहनिर्माण आणि समाज कल्याण समिती प्रमाणेच सोयी सुविधा क्रीडा विभागामार्फत क्रीडा समितीस उपलब्ध करुन देणेस मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सन २००४-२००५ पासून क्रीडा समिती सभेची स्थापना झाली असून या समितीकडे खालीलप्रमाणे कामकाज सोपविणेत आलेले आहे.

१) क्रीडा कला विषयी सर्व प्रश्न, धोरण आखणी व अंमलबजावणी करणे.

२) क्रीडा विभागाकडील र.रु.५० लाख पेक्षा अधिक नाही अशा खर्चास प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावावर अंतिम निर्णय घेणेचे अधिकार व र.रु.५० लाखापेक्षा अधिक अशा खर्चास प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावावर शिफारस करुन मा.महापालिका सभेपुढे पाठविणे.

३) क्रीडा कला विभागाचे सर्व प्रकारचे कामकाज करणेबाबतचे अधिकार.

क्रीडा विभागांतर्गत विविध क्रीडा सुविधा, विविध क्रीडा स्पर्धा आयोजन कामकाज व नागरिकांच्या तक्रारी कमी होण्याच्या दृष्टीने व कामकाजाच्या सोईच्या दृष्टीने मा.क्रीडा समिती सभेकडे खालील प्रमाणे कामकाज सोपविणे आवश्यक आहे.

१) मनपा परिसरातील सर्व क्रीडा सुविधा देखभाल दुरुस्ती कामकाज करुन घेणेकामी क्रीडा विभागाकडे एक स्वतंत्र क्रीडा स्थापत्य विभाग स्थापन करणे व त्याकामी आवश्यक ती तरतूद क्रीडा विभागाकडे उपलब्ध करुन देणे.

२) कला विभाग, संगीत वर्ग, पिंपरी चिंचवड संगीत अकादमीचे कामकाज, सांस्कृतिक कार्यक्रम कामकाज, संगीत महोत्सव, सार्वजनिक वाचनालये, स्पर्धा परीक्षा केंद्र, मा.क्रीडा समिती मार्फत करणे.

३) क्रीडा विभाग या नावा ऐवजी क्रीडा, कला, साहित्य, सांस्कृतिक विभाग स्थापन करणे.

४) क्रीडा, कला, साहित्य, सांस्कृतिक विभाग स्थापन झाल्यानंतर सर्व प्रकारचे कला संगीत महोत्सव सांस्कृतिक कार्यक्रम क्रीडा समिती मार्फत पार पाडणे.

तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ३० (२) मध्ये विशेष समित्या नियुक्त करण्याचे तरतुदीनुसार क्रीडा समिती स्थापन करण्यात आल्याने सदर क्रीडा समिती सभेकडे या पूर्वी नेमून दिलेल्या कामकाजासह वरील प्रमाणे मा.क्रीडा समिती सभेकडे नव्याने कामकाज सोपविणेस, विशेष अधिकार देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत पुणे अंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव (PIFF) आयोजित करणेकामी अंदाजपत्रकात तरतूद आहे. पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवामध्ये दरवर्षी र.रु.११ लक्ष रकमेचे हिंदी चित्रपट फिल्म फेस्टिवल पुरस्कार देणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.अपर्णा डोके -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ६७५ विषय क्रमांक – ४
दिनांक – १३/५/२०१५ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.किरण मोटे, मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव –
२) मा.क्रिडा समितीकडील ठ.क्र. ९१ दि. ६/४/२०१५

मा.महापालिका सभा ठराव क्र.४२१, दि.१८/०१/२०१४ अन्वये म.न.पा.क्रीडा धोरण मंजूर करणेस मान्यता दिलेली आहे. या क्रीडा धोरणातील भाग-१ ई खेळाडू दत्तक योजनेमध्ये अट क्र.२४ मध्ये फेडरेशनमार्फत घेणेत आलेल्या राज्य, राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडूंना याचा लाभ घेता येणार नाही असे नमुद आहे. या अटीमुळे म.न.पा.परिसरातील फेडरेशनमार्फत खेळलेल्या मुलांना या योजनेचा लाभ मिळत नाही. त्यामुळे महाराष्ट्र ऑलिंपिक असोशिएशनशी संलग्न असलेल्या राज्य क्रीडा संघटना व इंडियन ऑलिंपिक फेडरेशनशी संलग्न असलेल्या राष्ट्रीय क्रीडा संघटना यांनी घेतलेल्या वार्षिक राज्य अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धा, राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत प्राविण्य मिळविलेल्या (प्रथम/द्वितिय/तृतीय क्रमांक प्राप्त) खेळाडूंना मा.महापालिका सभेने निश्चित केलेल्या खेळ प्रकारात खेळाडू दत्तक योजनेचा लाभ देणेत येईल अशी अटी व नियम यामध्ये दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.मंदाकिनी ठाकरे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.अपर्णा डोके -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ५
दिनांक – १३/५/२०१५ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र. प्रशासन/८/कावि/१३७/२०१५ दिनांक ११/०३/२०१५
२) मा.महापालिका सभा ठ.क.६६७ दि.६/४/२०१५

डॉ.जगदाळे आनंदराव दत्ताजीराव, वैद्यकीय अधिक्षक (निवृत्त) यांचे कार्यकाळात यशवंतराव चव्हाण रुग्णालयासाठी एच.बी.ओ.टी मशिन खरेदीतील अनियमितता, रुग्णालयीन कर्मचा-यांच्या बदल्यां ज्येष्ठतेने न करणे, एन.एस.टी मशिन उपकरणे खरेदी नस्तीतील अनियमितता, सुपर स्पेशालिस्ट अल्ट्रा मॉड्युलर ओ.टी उभारणीची निविदा प्रक्रिया करतानाचे मूलभूत नियमांचे पालन न करता, सदर निविदा प्रक्रियेमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता आढळून आल्याने सेवेत असताना निवृत्तीच्या दिवशी दिनांक ३१/०१/२०१३ रोजी खातेनिहाय चौकशीचे आदेश पारित करण्यात आले असून सदर आदेशानुसारच सेवानिवृत्तीविषयक लाभ रोखून ठेवण्यात आलेले आहेत. दिनांक १५/०३/२०१३ रोजी चौकशीकामी दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. प्रस्तुत प्रकरणी विधानसभा तारांकित प्रश्न क्र १०३१८१ उपस्थित झालेला असून विधानपरिषद तारांकित प्रश्न क्र ३८८५६ च्या अनुषंगाने कक्ष अधिकारी, नगर विकास विभाग यांनी दिनांक २५ मार्च २०१३ रोजी विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांना चौकशी करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

डॉ.जगदाळे आनंदराव दत्ताजीराव, वैद्यकीय अधिक्षक (निवृत्त) यांचे प्रकरणी विभागीय चौकशीचा अहवाल दिनांक २७/१०/२०१४ रोजी प्राप्त झालेला आहे. सदर विभागीय चौकशी अहवालानुसार खालील प्रमाणे निष्कर्ष प्राप्त झालेले आहेत.

<u>दोषारोप पत्र बाब १</u>

डॉ. जगदाळे यांनी मल्टीप्लेस मशीनचे खरेदी बाबत शिफारस करतांना मल्टीप्लेस मशीन हे Risk to patient and attendant असले बाबत नमूद असतांनाही, तसेच एका वेळी मल्टीप्लेस मशीनसाठी ६ कर्मचारी एका शिफ्टमध्ये लागत असतांना व ३ शिफ्टमध्ये १८ होत असतांनाही व त्या मशीनची किंमत र.रु.२,७९,२४,७५०/- म्हणजेच मोनोप्लेस मशीनचे किमती पेक्षा ५.५ पट जास्त असतांनाही या बाबत अभिप्रायात नमूद केलेले नाही. त्यामुळे डॉ. जगदाळे यांनी वस्तुनिष्ठ अभिप्राय सादर केला नसल्याचे दिसून येते.

मोनोप्लेस मल्टीप्लेस बाबत सविस्तर माहिती न घेता त्या मशीनची पाहणी न करता, प्रत्यक्ष डेमो न घेता, डॉ.जगदाळे यांनी शिफारस केल्याचे दिसून येते.

वायसीएम रुग्णालयामध्ये सदरच्या उपकरणाची तातडीने आवश्यकता असले बाबत कोणतेही ठोस कारण नमूद केलेले नाही.

डॉ. जगदाळे वैद्यकीय अधिक्षक यांनी सदर मशीनची वायसीएमएच रुग्णालयास गरज आहे असे शेरांकन मशीनची पाहणी न करता माहिती न घेता, डेमो न घेता, केलेली असल्याने त्या शेरांकनास / अभिप्रायास ते जबाबदार असल्याचे स्पष्ट होत आहे.

दि.३०/९/२०१२ व दि.५/११/२०१२ अखेर आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. जगदाळे यांनी मुदत वाढ दिलेली आहे. वास्तविक या कामी मा. आयुक्त यांची मान्यता घेऊन मुदतवाढ देणे आवश्यक होते.

मशीन प्रत्यक्ष कार्यान्वीत झालेले नसतांना दि.२०/११/२०१२ च्या आदेशान्वये मनाली एन्टरप्राईजेस यांना ५ टक्के अनामत वजा करुन उर्वरीत रकमेचा धनादेश अदा करण्यात आलेला आहे.

प्रशासनाचा अभिप्राय :

१. M/S Kasco उत्पादीत Multiplace HBOT Chamber/Machine खरेदीचे आदेश देण्यापूर्वी या HBOT च्या Technical Specifications चे कोणाही सक्षम अधिका-याकडून/एजन्सीकडून परिक्षण/निरिक्षण करुन अभिप्राय घेण्यात आलेला नाही. त्यामुळे Specifications मधील प्रत्येक बाबीसंबंधी स्पष्टता/खातरजमा करुन घेणे राहून गेले आहे.

२. वाय.सी.एम.एच मधील बायोमेडिकल इंजिनिअर यांनी ज्या HBOT मशीनचे निरिक्षण व परिक्षण करुन अभिप्राय दिला होता ते अमेरीकेतील M/S Sechrist यांच्याकडून उत्पादित Monoplace (Single Seater) with ventilator मशीन होते. सदर मशीनची खरेदी झाली असती तर त्यात त्रृटी राहून जाण्याची शक्यता नव्हती.

३. HBOT Machine/ System ही उपरोक्त M/S Sechrist यांचेकडील Monoplace पध्दतीची असावी असे प्रस्तावित होते. हा प्रस्ताव M/S Sechrist यांचेकडील Monoplace HBOT System च्या तांत्रिक माहितीपत्राच्या आधारे सादर करण्यात आला होता. प्रत्यक्षात त्यासाठी कोणाचीही सुस्पष्ट व रितसर मागणी नसताना तशी मागणी असल्याचे प्रस्तावात खोटे नमूद करण्यात आले होते. डॉ. जगदाळे तत्कालीन वैद्यकीय अधिक्षक व डॉ. गायकवाड तत्कालीन उपअधिक्षक तसेच ज्येष्ठतम सर्जन डॉ. पानसे ह्यांनी मुंबईच्या जसलोक हॉस्पिटल भेटीनंतर दि. २९/०७/२०१० रोजी केलेल्या स्पष्ट व जोरदार शिफरशीनुसार मा.आयुक्त यांनी M/S Sechrist कंपनीचे Monoplace HBOT System खरेदी करण्यास मान्यता दिली होती. ह्यानंतर मा.आयुक्तांचे अपरोक्ष तत्कालीन आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ.अय्यर, वैद्यकीय अधिक्षक डॉ.जगदाळे व डॉ.गायकवाड ह्यांनी अचानक व संगनमताने M/S Sechrist कंपनीचे Monoplace HBOT System ऐवजी M/S Kasco यांचेकडील Monoplace HBOT System खरेदी करण्याचा निर्णय घेतला व मा.आयुक्तांची स्वाक्षरी थेट निविदा प्रसिध्दीच्या प्रस्तावावर घेतली.

४. Multiplace HBOT System चे पुरवठादार M/S Manali Enterprises यांना HBOT System चा पुरवठा करण्यासाठी तत्कालीन आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. जगदाळे यांनी एकुण दोन वेळा ९५ दिवसांची (दि. ३०/०७/२०१२ ते ०५/११/२०१२ या कालावधीत) नियमबाह्यपणे व स्वत:च्या मर्जीने मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे Multiplace HBOT System वाय.सी.एम.एच मध्ये पोहचण्यास ९५ दिवस विलंब झाला व त्यामूळे मशीनचे Inspection करुन त्रृटींची पुर्तता करुन घेण्यास तेवढा वेळ कमी पडला.

५. रुग्णालयासाठी कोणतेही Machine/Equipments खरेदी करण्यापुर्वी त्यासाठी लागणारी जागा, विद्युत पुरवठा, पाणीपुरवठा, आवश्यक गॅसेसचा पुरवठा, आवश्यक कर्मचारी वर्ग व त्यांचे प्रशिक्षण, Machine / Equipments चे रक्षण इत्यादी बाबींचे नियोजन करुन त्यांची पुर्तता करुन घेणे आवश्यक असते. Multiplace HBOT Machine सारखे अवाढव्य, गुंतागुंतीचे अनेक घटक/कार्यप्रणाली असणारे, प्रचंड किमतीचे मशीन बाबत अशा पायाभूत बाबींची आधी पुर्तता करुन घेणे आवश्यक आहे. प्रकरणी पायाभूत बाबींच्या पुर्ततांच्या बहुतांशी निर्देशांकडे डॉ.जगदाळे यांनी पुर्णतः दुर्लक्ष केल्याचे दिसून येते.

६. Multiplace HBOT System चे Installation व कार्यान्वयन पुर्ण झाले नसताना पुरवठादारास एकुण किंमतीच्या ५०% रक्कम म्हणजे रुपये १,३९,६२,३७५/- नियमबाह्यपणे अदा करण्यात आली आहे.

<u>दोषारोप पत्र बाब २</u>

वैद्यकीय विभागाने दिनांक ०५/०९/२०१२ चे बदल्यांबाबतचे परिपत्रकातील सुचनांचे पालन केले नसल्याचे व काही सेवाजेष्ठ कर्मचा-यांच्या बदल्या न करता कमी कालावधी कार्यरत असणा-या कनिष्ठ कर्मचा-यांच्या बदल्या केल्या बाबतचे प्राप्त तक्रारीत तथ्य आढळून आलेले आहे. म्हणजेच डॉ.जगदाळे यांनी विभाग प्रमुख म्हणून कार्यरत असतांना दि.५/९/२०१२ चे परिपत्रकामध्ये दिलेल्या सुचनांचे पालन न करुन मा.आयुक्त यांची मान्यता न घेता अंतर्गत बदल्या केल्याचे स्पष्ट होत आहे.

प्रशासनाचा अभिप्राय :

दिनांक ०५/०९/२०१२ चे परिपत्रकातील सुचनांचे पालन न करता जेष्ठता डावलून डॉ.जगदाळे यांनी विभाग प्रमुख म्हणून कार्यरत असताना बदल्या केलेल्या आहेत. हे लक्षात आल्यानंतर प्रशासन विभागाने बदल्या न झालेल्या सेवाज्येष्ठ कर्मचा-यांच्या बदल्या केलेल्या आहेत.

<u>दोषारोप पत्र बाब ३</u>

नस्तीमधील कागदपत्रे काढून नविन कागदपत्रे त्यात समाविष्ट करणे ही बाब गंभीर स्वरुपाची आहे. अपचारी सेवक हे आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदावर त्यावेळी कार्यरत असल्याने, विभाग प्रमुख म्हणून त्यांनी त्यांची जबाबदारी प्रमाणिकपणे पारपाडणे आवश्यक होते. तथापि, त्यांनी विभाग प्रमुखाच्या जबाबदारीचे उल्लंघन केल्याचे स्पष्ट झाले आहे.

प्रशासनाचा अभिप्राय :

नस्तीतील कागदपत्रे काढतांना व नविन कागदपत्रे समाविष्ट करताना डॉ.जगदाळे यांनी विभाग प्रमुख म्हणून जबाबदारीचे पालन केले नाही.

<u>दोषारोप पत्र बाब ४</u>

Super Specialty Ultra Modular O.T उभारणीची निविदा नोटीस प्रसिध्द केल्यानंतर मुख्य लेखा परीक्षक यांनी चौकशी करुन केलेल्या तपासणीत आढळून आलेल्या अनियमितता नमूद केलेली आहे. त्यामध्ये संदर्भिय कामास होणा-या खर्चास मा.महासभेची प्रशासकीय मान्यता घेतल्याचे दिसून येत नाही, बांधकाम परवानगी विभागाची मंजूरी घेतल्याचे दिसून येत नाही. तसेच ओटी कॉम्प्लेक्सचे ड्राईंग तत्सम आर्किटेक्ट यांचेकडून तयार व प्रमाणित करुन घेतलेले नाहीत. तसेच कामाचे तयार केलेले प्लॅन व नमूद केलेल्या निविदा स्पेसीफीकेशन प्रमाणे स्थापत्य विषयक कामाचे तसेच विद्युत विषयक कामाचे खर्चाचे अंदाज पत्रक शहर अभियंता व विकास अभियंता यांचेकडून तयार करुन घेतलेले नाही. तसेच त्यास तांत्रिक मंजूरीही घेतलेली नाही, तसेच ओटी साठी लागणारे साहित्य व मशीनरीचे स्पेसीफीकेशन प्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी किमान तीन संस्थांकडून दरपत्रकासोबत स्पेसीफीकेशन, ब्रोशर इ. मागविणे आवश्यक असतांना फक्त दोनच संस्थाकडून दरपत्रके मागविलेली आहेत. तसेच येणारे खर्चाचे तपशिलवार अंदाजपत्रक तयार करुन त्यास बायामेडिकल इंजिनियर यांची मान्यता घेणे आवश्यक असतांना ती घेतलेली नाही. निविदा प्रक्रियेमध्ये मुख्य लेखा परीक्षक यांनी नमूद केलेल्या अनियमित बाबींमुळे व ऑस्टीन तसेच मेडिकल प्रॉडक्ट सर्व्हीसेस यांचेकडून ई-निविदे बाबत व त्यातील त्रृटी बाबत तक्रारी आल्याचे कागदपत्रावरुन स्पष्ट होत आहे व त्या तक्रारीच्या अनुषंगानेच निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आलेली असल्याने, आढळून आलेल्या अनियमिततेस डॉ.जगदाळे हे जबाबदार असल्याचे स्पष्ट होत आहे.

प्रशासनाचा अभिप्राय :

प्रकरणी होणा-या खर्चास महासभेची प्रशासकीय मान्यता नाही, बांधकाम परवानगी विभागाची मंजूरी नाही. तसेच ओटी कॉम्प्लेक्सचे ड्राईंग तत्सम आर्किटेक्ट यांचेकडून तयार व प्रमाणित करुन घेतलेले नाहीत. तसेच कामाचे तयार केलेले प्लॅन व नमूद केलेल्या निविदा स्पेसीफीकेशन प्रमाणे स्थापत्य विषयक कामाचे तसेच विद्युत विषयक कामाचे खर्चाचे अंदाजपत्रक शहर अभियंता व विकास अभियंता यांचेकडून तयार करुन घेतलेले नाही. तसेच त्यास तांत्रिक मंजूरीही घेतलेली नाही, तसेच ओटी साठी लागणारे साहित्य व मशीनरीचे स्पेसीफीकेशन प्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी किमान तीन संस्थांकडून दरपत्रकासोबत स्पेसीफीकेशन, ब्रोशर इ. मागविणे आवश्यक असतांना फक्त दोनच संस्थाकडून दरपत्रके मागविलेली आहेत. तसेच येणारे खर्चाचे तपशिलवार अंदाजपत्रक तयार करुन त्यास बायामेडिकल इंजिनियर यांची मान्यता घेणे आवश्यक असतांना ती घेतलेली नाही. या अनियमिततेस डॉ.जगदाळे हे कारणीभूत असल्याचे चौकशीत स्पष्ट झाले असून निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आलेली असल्याने व तसे चौकशीत शाबीत झाले आहे. परंतु सदर प्रकरणी निविदा रद्द झाल्याने मनपाचे कोणतेही आर्थिक नुकसान झालेले नाही.

<u>दोषारोपपत्र बाब ५</u>

डॉ.जगदाळे यांनी वैद्यकीय अधिक्षक या पदावर कार्यरत असतांना एच.बी.ओ.टी मशिन खरेदीपोटी अदा करावयाच्या रकमेच्या संदर्भात जकातीची रक्कम भरली किंवा नाही याबाबत खात्री करुन नंतरच बीलाची अदायगी करणे विभाग प्रमुख म्हणून डॉ.जगदाळे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांची जबाबदारी होती. तथापि दंडासहित जकात वसूल केल्याने महापालिकेचे आर्थिक नुकसान झालेले नाही.

प्रशासनाचा अभिप्राय :

एच.बी.ओ.टी मशिन खरेदीपोटी अदा करावयाच्या रकमेच्या संदर्भात जकातीची रक्कम भरली किंवा नाही याबाबत खात्री करुन नंतरच बीलाची अदायगी करणे विभाग प्रमुख म्हणून डॉ.जगदाळे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांची जबाबदारी होती तथापी त्याचे पालन झाले नसल्याची बाब चौकशी अहवालावरुन स्पष्ट होते. तथापि दंडासहित जकात वसूल केल्याने महापालिकेचे आर्थिक नुकसान झालेले नाही.

डॉ.जगदाळे आनंदराव, वैद्यकीय अधिक्षक यांच्या सेवानिवृत्तीच्या दिवशी दिनांक ३१/०१/२०१३ रोजी त्यांच्यावरील आरोप कळविण्यात येऊन त्यांची विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेली आहे. सदर कार्यवाहीकामी डॉ.जगदाळे यांनी आवश्यक ते सहकार्य केलेले आहे सदर कार्यवाही पुर्ण होऊन अहवाल प्राप्त झाला असून सदर अहवालावर डॉ.जगदाळे यांनी दि.१०/१२/२०१४ रोजी अभिवेदन सादर केलेले आहे. सदर अहवालानुसार सिध्द झालेल्या आरोपांसाठी योग्य शिक्षा करणे आवश्यक आहे.

डॉ.जगदाळे आनंदराव दत्ताजीराव, वैद्यकीय अधिक्षक हे दिनांक ३१/०१/२०१३ रोजी सेवानिवृत्त झालेले असून महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील २७ (१) नुसार निवृत्तीवेतनधारक हा, त्याच्या सेवेच्या कालावधीत गंभिर गैरवर्तणूकीबद्दल किंवा निष्काळजीपणाबद्दल अपराधी असल्याचे कोणत्याही विभागीय किंवा न्यायिक कार्यवाहीमध्ये दिसून आले तर, महानगरपालिकेला लेखी आदेशाव्दारे निवृत्तीवेतन किंवा त्याचा कोणताही भाग कायमचा किंवा विशिष्ट कालावधीसाठी रोखून ठेवता येईल किंवा काढून घेता येईल आणि झालेल्या कोणत्याही आर्थिक नुकसानीची वसुलीदेखील अशा निवृत्तीवेतनातून पुर्णत: किंवा अंशत: करण्याचा आदेश देता येईल. डॉ.जगदाळे आनंदराव दत्ताजीराव, वैद्यकीय अधिक्षक यांच्या केलेल्या विभागीय चौकशीस कार्योत्तर मान्यता मिळण्याकरीता व विभागीय चौकशी अहवालातील निष्कर्ष विचारात घेवून डॉ.जगदाळे आनंदराव दत्ताजीराव, वैद्यकीय अधिक्षक (निवृत्त) यांच्या निवृत्तीवेतनातील २०% भाग ५ वर्षापर्यंत रोखून ठेवण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.मंदाकिनी ठाकरे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.निता पाडाळे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ चा विचार दि.२०/०७/२०१५ चे सभेत करणेत यावा अशी सूचना मांडते.

**मा.शुभांगी बो-हाडे** – मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन देते.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक - ६७६ विषय क्रमांक – ५
दिनांक – १३/५/२०१५ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र. प्रशासन/८/कावि/१३७/२०१५ दिनांक ११/०३/२०१५
२) मा.महापालिका सभा ठ.क.६६७ दि.६/४/२०१५

विषय क्रमांक ५ चा विचार दि.२०/०७/२०१५ चे सभेत करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.अपर्णा डोके -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ६
दिनांक – १३/५/२०१५ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र. क्र.प्रशासन/८/कावि/१३८/२०१५ दिनांक ११/०३/२०१५
२) मा.महापालिका सभा ठ.क्र.६६८ दि.६/४/२०१५

डॉ.जगदाळे आनंदराव दत्ताजीराव, वैद्यकीय अधिक्षक (निवृत्त) यांचे कार्यकाळात यशवंतराव चव्हाण रुग्णालयासाठी एच.बी.ओ.टी मशिन खरेदीमध्ये व इतर प्रकरणी अनियमितता आढळून आल्याने सेवेत असताना निवृत्तीच्या दिवशी दिनांक ३१/०१/२०१३ रोजी खातेनिहाय चौकशीचे आदेश पारित करण्यात आले होते. प्रकरणी विभागीय चौकशीचा अहवाल दिनांक २७/१०/२०१४ रोजी प्राप्त झालेला आहे. सदर विभागीय चौकशी अहवालानुसार डॉ.राजशेखर अय्यर, वैद्यकीय संचालक (सेवानिवृत्त) यांचेप्रकरणी खालील प्रमाणे निष्कर्ष प्राप्त झालेले आहेत.

१. मोनोप्लेस प्रस्तावात निविदा काढणेस मान्यता मा. आयुक्त यांनी दिलेली असतांनाही आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अय्यर यांनी डॉ. जगदाळे यांचा अभिप्राय प्राप्त झाले नंतर वरील वस्तूनिष्ठ माहिती घेऊन छाननी करुन निर्णय घेणे आवश्यक असतांनाही ती न घेता व खात्री न करता निविदा प्रक्रिया राबवणेस मा. आयुक्त यांची मान्यता न घेता मल्टीप्लेस मशीन खरेदी करणे संबंधात निविदा प्रक्रियेस स्व: अधिकारात मान्यता दिलेली आहे.
२. दोन बेड व ४ सीट क्षमतेचे मल्टीप्लेस उपकरण र.रु.२,७९,२४,७५०/- इतक्या किमतीस महानगरपालिकेने खरेदी करणेपुर्वी राष्ट्रीय अथवा राज्य पातळीवरील सर्वात खप असलेल्या वर्तमान पत्रामध्ये निविदा जाहिर करणे आवश्यक होते. तथापि, सदरची निविदा नोटीस ही दि.१३/१२/२०११ रोजी दैनिक पुढारी, सामना व प्रभात या स्थानिक वर्तमान पत्रात विशेष निविदा नोटीस प्रसिध्द करण्यात आल्याने फक्त दोनच निविदा प्राप्त झाल्या असल्याचे व अधिक महाग मशीन खरेदी करणेचे असल्याने निकोप स्पर्धा होणे आवश्यक होते व त्यासाठी फेर निविदा काढणे गरजेचे होते. तथापि, फेर निविदा काढल्या नसल्याचे दिसून येते.
३. डॉ. अय्यर, आरोग्य वैद्यकीय अधिकारी यापदावर एप्रिल २०११ पासून मे २०१२ या कालावधीत कार्यरत होते. म्हणजेच सदरची निविदा नोटीस डॉ. अय्यर हे आरोग्य वैद्यकीय अधिकारी या पदावर कार्यरत असतांना प्रसिध्द करण्यात आल्याचे दिसून येते.
४. मशीन खरेदी संबंधात निविदा प्रक्रिया राबविणे पासून मशीन खरेदी करे पर्यंत संपुर्ण सहभाग डॉ. अय्यर यांचा असल्याचे कागदपत्रावरुन स्पष्ट होत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयासाठी खरेदी करण्यात आलेल्या Multiplace HBOT System चे Inspection (तपासणी/परिक्षण), Installation (प्रस्थापना) व Commissioning (कार्यान्वयन) करणे तसेच अन्य काही अनुषंगिक बाबीसंबंधी अभिप्राय देणे ह्या प्रयोजनार्थ गठित करण्यात आलेल्या "तदर्थ समितीचा (HBOT Adhoc Committee)" अहवाल सादर करणेकामी मा.आयुक्त यांचेकडील आ.कक्ष/कावि/१८०/२०१३ दि. १५/०६/२०१३ अन्वये आदेश देण्यात आले असले बाबत तदर्थ समितीने सादर केलेल्या अहवालावरुन निदर्शनास येते. सदर समितीने आपला अहवाल दिनांक १३/०१/२०१४ रोजी सादर केलेला आहे. तदर्थ समितीच्या अहवालानुसार डॉ.राजशेखर अय्यर, वैद्यकीय संचालक (सेवानिवृत्त), यांची पुढील बाबतींत जबाबदारी निश्चित केलेली आहे.

१. M/S Kasco कडील HBOT Machine/Chamber खेरदीचा आदेश तत्कालीन आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ.अय्यर यांनी कोणाचीही मागणी नसलेल्या अत्याश्यकता नसलेल्या व प्रचंड किंमतीच्या तसेच गुंतागुंतीच्या HBOT Machine च्या खरेदीचे आदेश त्यांच्या सेवानिवृत्तीच्या दिवशी दिनांक ३१/०५/२०१२ रोजी म्हणजेच सेवानिवृत्तीच्या दिवशी दिला आहे.
२. HBOT Machine/Chamber खरेदी नस्तीमध्ये डॉ.अय्यर यांनी प्रस्तावात अमेरीकन बनावटीचे (Sechrist) Monoplace HBOT Machine/Chamber घेण्यासाठी निविदा प्रक्रिया सुरु करण्यास मा.आयुक्तांनी मान्यता दिली होती. त्याऐवजी स्थानिक बनावटीचे (Kasco)

Multiplace HBOT खरेदी करण्याची जी कलाटणी या प्रकरणास मिळाली आहे तिचे मुळ डॉ.अय्यर ह्यांच्या दिनांकरहीत शेरांकनात आहे.

३. खरेदीसाठी किमान ३ निविदांचा नियम असताना दोनच निविदा येऊनही निविदा प्रक्रिया पुर्ण करण्यात आली व M/S Kasco कडील Multiplace HBOT ची खरेदी करण्यात आली

खातेनिहाय चौकशी अहवाल व तदर्थ समितीच्या अहवालातील उपरोक्त निष्कर्ष पहाता सदर प्रकरणातील अनियमिततेकरिता जबाबदार डॉ.राजशेखर अय्यर, वैद्यकीय संचालक (सेवानिवृत्त) यांची विभागीय चौकशी होणे आवश्यक आहे. तरी डॉ.राजशेखर अय्यर, वैद्यकीय संचालक हे दिनांक ३१/०५/२०१२ रोजी सेवानिवृत्त झालेले असून महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील २७ (१) (ब) नुसार कर्मचारी सेवानिवृत्त होण्यापुर्वी विभागीय कार्यवाही चालू झाली नसेल तर शासनाच्या मंजूरीशिवाय ती चालू केली जाणार नाही. अशी तरतुद आहे. त्यामुळे महापालिका अधिका-यांच्या बाबतीत सेवानिवृत्तीनंतर विभागीय कार्यवाही करण्यासाठी मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. डॉ.राजशेखर अय्यर, वैद्यकीय संचालक (निवृत्त) यांच्या विरोधात महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम २७ मधील तरतुदी नुसार खातेनिहाय चौकशी सुरु करण्यास मा.महापालिका सभेची मान्यता घेण्याकरीता व महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधील नियम ८ मध्ये विनिर्दिष्ठीत केलेल्या कार्यपध्दतीनुसार, प्रकरणात दोषारोपपत्र दाखल करणे, चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नियुक्ती करणेबाबत व एकुण प्रकरणी विभागीय कार्यवाही प्रस्तावित करण्यास आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.मंदाकिनी ठाकरे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.निता पाडाळे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ चा विचार दि.२०/०७/२०१५ चे सभेत करणेत यावा अशी सूचना मांडते.

**मा.शुभांगी बो-हाडे** – मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन देते.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक - ६७७ — विषय क्रमांक – ६

दिनांक – १३/५/२०१५ — विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र. क्र.प्रशासन/८/कावि/१३८/२०१५ दिनांक ११/०३/२०१५

२) मा.महापालिका सभा ठ.क.६६८ दि.६/४/२०१५

विषय क्रमांक ६ चा विचार दि.२०/०७/२०१५ चे सभेत करणेत यावा.

अनुकूल- ८१ — प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.अपर्णा डोके -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ७

दिनांक – १३/५/२०१५ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र. क्र.प्रशासन/८/कावि/१३९/२०१५ दिनांक ११/०३/२०१५

२) मा.महापालिका सभा ठ.क्र.६६९ दि.६/४/२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयासाठी खरेदी करण्यात आलेल्या Multiplace HBOT मशीन प्रकरणामध्ये डॉ.जगदाळे आनंदराव, वैद्यकीय अधिक्षक (सेवानिवृत्त) यांची खातेनिहाय चौकशी करण्यात आली आहे. Multiplace HBOT System चे Inspection (तपासणी/परिक्षण), Installation (प्रस्थापना) व Commissioning (कार्यान्वयन) करणे तसेच अन्य काही अनुषंगिक बाबीसंबंधी अभिप्राय देणे ह्या प्रयोजनार्थ गठित करण्यात आलेल्या "तदर्थ समितीचा (HBOT Adhoc Committee)" अहवाल सादर करणेकामी मा.आयुक्त यांचेकडील आ.कक्ष/कावि/१८०/२०१३ दि. १५/०६/२०१३ अन्वये आदेश देण्यात आले असले बाबत तदर्थ समितीने सादर केलेल्या अहवालावरुन निदर्शनास येते. सदर समितीने आपला अहवाल दिनांक १३/०१/२०१४ रोजी सादर केलेला आहे. तदर्थ समितीच्या अहवालानुसार डॉ.गायकवाड शामराव बाजीराव, वैद्यकीय उपअधिक्षक (सेवानिवृत्त) यांची पुढील बाबतीत जबाबदारी निश्चित केलेली आहे.

डॉ. जगदाळे हे दि. ३१/०१/२०१३ रोजी निवृत्त झाल्याने त्यांचा पदभार डॉ. गायकवाड यांच्याकडे आला डॉ. गायकवाड हे दि. ३१/०५/२०१३ रोजी निवृत्त झाले त्यांचे चार महिन्यांचे सेवाकालात Machine/Chamber च्या कर्मचारी प्रशिक्षणासह अन्य सर्व पायाभूत बाबींची पुर्तता करवून HBOT Machine कार्यान्वीत करणे त्यांना शक्य होते. डॉ.जगदाळेंसह डॉ.गायकवाड हे आरोग्य वैद्यकीय आधिकारी होण्यापूर्वी वैद्यकीय उपअधिक्षक असल्याने HBOT Machine बाबतच्या पायाभूत बाबींची पुर्तता करुन घेण्याबाबत ते अधिकच जबाबदार होते. परंतु त्याद्ष्टीने त्यांनी पावले उचलेली नाहीत. मशिन कार्यान्वीत होईपर्यंत पुरवठादारास रक्कम अदा न करण्याची खरेदी आदेशात जी अट होती ती पुर्णत: डावलून बायोमेडिकल इंजिनिअरचा दाखला नसताना डॉ. गायकवाड व डॉ. जगदाळे यांनी पुरवठादार M/S Manali Enterprises ह्यांना एकुण किंमतीच्या ५०% रक्कम म्हणजे रु १,३९,६२,३७५/- अदा करण्याचा निर्णय घेतलेला आहे."

तरी डॉ.गायकवाड शामराव बाजीराव, वैद्यकीय उपअधिक्षक हे दिनांक ३१/०५/२०१३ रोजी सेवानिवृत्त झालेले असून महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील २७ (१) (ब) नुसार कर्मचारी सेवानिवृत्त होण्यापुर्वी विभागीय कार्यवाही चालू झाली नसेल तर शासनाच्या मंजूरीशिवाय ती चालू केली जाणार नाही. अशी तरतुद आहे. त्यामुळे महापालिका अधिका-

यांच्या बाबतीत सेवानिवृत्तीनंतर विभागीय कार्यवाही करण्यासाठी मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. डॉ.गायकवाड शामराव बाजीराव, वैद्यकीय उपअधिक्षक (सेवानिवृत्त) यांच्या विरोधात महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम २७ मधील तरतुदी नुसार खातेनिहाय चौकशी सुरु करण्यास मा.महापालिका सभेची मान्यता घेण्याकरीता व महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधील नियम ८ मध्ये विनिर्दिष्ठीत केलेल्या कार्यपध्दतीनुसार, प्रकरणात दोषारोपपत्र दाखल करणे, चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नियुक्ती करणेबाबत व एकुण प्रकरणी विभागीय कार्यवाही प्रस्तावित करण्यास आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.मंदाकिनी ठाकरे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.निता पाडाळे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ चा विचार दि.२०/०७/२०१५ चे सभेत करणेत यावा अशी सूचना मांडते.

**मा.शुभांगी बो-हाडे** – मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन देते.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक - ६७८ विषय क्रमांक – ७
दिनांक – १३/५/२०१५ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.
क्र.प्रशासन/८/कावि/१३९/२०१५ दिनांक ११/०३/२०१५
२) मा.महापालिका सभा ठ.क्र.६६९ दि.६/४/२०१५

विषय क्रमांक ७ चा विचार दि.२०/०७/२०१५ चे सभेत करणेत यावा.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.अपर्णा डोके -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – ८

दिनांक – १३/५/२०१५ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.प्रशासन/८/कावि/ १७३/२०१५ दिनांक ४/०४/२०१५

ज्या अर्थी श्री.संजय सिताराम रणदिवे, सर्व्हेअर व श्री.मिलींद जगन्नाथ निकाळजे, अनुरेखक हे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नगररचना व विकास विभागामध्ये नेमणुकीस आहेत. त्या अर्थी ते लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ चे कलम २ च्या अर्थानुसार लोकसेवक आहेत.

श्री.संजय सिताराम रणदिवे, सर्व्हेअर व श्री.मिलींद जगन्नाथ निकाळजे, अनुरेखक हे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नगररचना व विकास विभागामध्ये कर्तव्य बजावत असताना त्यांनी खालील नमुद भ्रष्ट व अवैध कृत्य केले.

श्री.संजय सिताराम रणदिवे, सर्व्हेअर यांनी अभिकथीत भ्रष्ट व अवैध साधनांचा अगर अन्यथा लोकसेवक म्हणुन स्वतःचे स्थानाचा दुरुपयोग करुन स्वतः करीता ३,०००/ रुपये लाचेची मागणी केली व ती त्यांनी स्विकारली तसेच पुनावळे गावचा डि.पी.प्लॅनचा नकाशा श्री.मिलींद जगन्नाथ निकाळजे, अनुरेखक यांच्याकडे असल्याने तो त्यांनी श्री.निकाळजे यांच्याकडून घेवून त्यातील लाच रक्कमेतील काही रक्कम ही श्री.निकाळजे यांना दिली व श्री.निकाळजे यांनी देखील ती रक्कम घेवून स्वत:च्या खिशात ठेवली असल्याचे सापळ्यात निष्पन्न झालेमुळे पोलीस निरिक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांनी सरकार तर्फे दिले फिर्यादिवरुन श्री.संजय सिताराम रणदिवे, व श्री.मिलींद जगन्नाथ निकाळजे, यांचे विरुध्द पिंपरी पोलीस ठाणे, पुणे शहर, गुन्हा रजि.नं ३२३८/२०१४ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम ७,१२,१३(१)(ड) सह १३(२) अन्वये दिनांक १८/१०/२०१४ रोजी २१.०५ वाजता गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्यात श्री.संजय सिताराम रणदिवे, व श्री.मिलींद जगन्नाथ निकाळजे, यांना दिनांक १८/१०/२०१४ रोजी २१.२५ वा. अटक करण्यात आले असल्याची बाब पोलिस निरिक्षक अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे जा.क्र./सीजेटी/पोनि/एसीबी/पुणे २०१४-४८ दिनांक २८/१०/२०१४ चे पत्रान्वये कळविले. त्यानुसार श्री.संजय सिताराम रणदिवे, सर्व्हेअर व श्री.मिलींद जगन्नाथ निकाळजे, अनुरेखक यांना दिनांक ३१/१०/२०१४ तसेच चे आदेशान्वये महापालिका सेवेतून तात्काळ सेवानिलंबीत करण्यात आले आहे. तथापि महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ४ (२) (अ) नुसार फौजदारी आरोपाखाली अटकेत ठेवल्याच्या दिनांकापासून ते निलंबनाधीन असल्याचे मानण्यात येत असले बाबत दिनांक २०/११/२०१४ रोजी आदेश पारीत करण्यात आलेला आहे.

श्री.संजय सिताराम रणदिवे, सर्व्हेअर व श्री.मिलिंद जगन्नाथ निकाळजे, अनुरेखक यांनी स्वत:च्या पदाचा व अधिकाराचा दुरुपयोग करुन गुन्हेगारी स्वरुपाचे उदघृत कृत्य केले आहे. प्रत्येक महापालिका कर्मचा-याने नितांत सचोटी राखणे आवश्यक असून श्री.रणदिवे व श्री.निकाळजे यांनी स्वत:चा आर्थिक फायदा होण्यासाठी दुषित हेतुच्या उद्देशाने, हेतुपुरस्सर नियमबाह्य, अशोभनिय ठरेल असे गैरवर्तन केले आहे. त्यामुळे महापालिकेची प्रतिमा जनमानसात मलिन झालेली आहे. त्यामुळे महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम ३ चा भंग केला असल्याने त्यांच्या विरुध्द महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५६ (१) चे तरतुदींच्या अधिन महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ८ नुसार खातेनिहाय चौकशी सुरु करण्याचे आदेश दिनांक ०३/०२/२०१५ रोजी निर्गत करण्यात आले आहेत.

पोलिस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांनी जा.क्र.सीआर/९९३/पुणे /२०१४-२१४ दिनांक २३/०१/२०१५ चे पत्रान्वये श्री.संजय सिताराम रणदिवे, सर्व्हेअर व श्री.मिलिंद जगन्नाथ निकाळजे, अनुरेखक यांच्या विरुध्द न्यायालयात गुन्हा दाखल करण्यास परवानगी देणे बाबत या प्राधिकरणास कळविले आहे. सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक: अभियो-१३१२/प्र.क्र३०/पुर्नबांधित-१/११अ दिनांक १२ फेब्रुवारी २०१३ नुसार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून अभियोग दाखल करण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर अशा प्रस्तावावर सक्षम प्राधिका-यांनी ३ महिन्यांच्या कालावधीत मंजूरी मिळविण्यात यावी व मंजूरी देण्यासंदर्भातील किंवा नाकारण्या संदर्भातील आदेश ३ महिन्यांच्या कालावधीतच निर्गमित करण्यात यावेत असे स्पष्ट निर्देष आहेत. पिंपरी पोलीस ठाणे, पुणे शहर, गुन्हा रजि.नं ३२३८/२०१४ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम ७,१२,१३(१)(ड) सह १३(२) अन्वये दाखल गुन्ह्याचे तपासाचे कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर श्री.संजय सिताराम रणदिवे, सर्व्हेअर व श्री.मिलींद जगन्नाथ निकाळजे, अनुरेखक हे दोषी असल्याची व त्यांनी वरील कलमानुसार गुन्हा केल्याची तसेच त्यांच्या विरुध्द न्यायालयात गुन्हा दाखल करण्यास परवानगी देणे आवश्यक असल्याची खात्री झाली.

श्री.संजय सिताराम रणदिवे, सर्व्हेअर व श्री.मिलींद जगन्नाथ निकाळजे, अनुरेखक यांना त्यांचे पदावर नेमण्याचे व पदावरुन काढून टाकण्याचे अधिकार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आयुक्तांना आहेत. लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ चा अधिनियम क्र. ४९ कलम १९(१)(क) नुसार लोकसेवकावर न्यायालयात खटला दाखल करण्यास त्या कर्मचाऱ्याच्या नियुक्ती प्राधिकाऱ्याची व त्यास सेवेतून काढून टाकण्यास सक्षम असणाऱ्या प्राधिकाऱ्याची मंजूरी आवश्यक आहे. त्यानुसार लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम सन १९८८ चा अधिनियम क्र. ४९ कलम १९ (१) (क) उपबंधाच्या हेतुसाठी आणि वापर करुन क्र. प्रशासन/८/कावि/१३०/२०१५ दिनांक ०९/०३/२०१५ रोजीच्या आदेशाव्दारे श्री.संजय सिताराम रणदिवे, सर्व्हेअर व श्री.मिलींद जगन्नाथ निकाळजे, अनुरेखक पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी पुणे ४११ ०१८ यांचेवर, उदघृत कृत्यामुळे प्रस्थापीत होणाऱ्या गुन्ह्यासाठी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम ७,१२,१३(१)(ड) सह १३(२) प्रमाणे सक्षम न्यायालयात खटला भरण्यास मंजुरी देण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५९-अ मधील तरतुंदींच्या अर्थांतर्गत "महानगरपालिकेच्या कोणत्याही अधिका-यांवर किंवा कर्मचा-यांवर खटला भरण्याची मागणी पोलिसांकडून किंवा अन्य कोणत्याही शासकीय अभिकरणाकडून करण्यात आली असेल तर त्यास मंजूरी देण्यास आयुक्त सक्षम असेल. आयुक्तांस अशा कोणत्याही कार्यवाहीच्या मंजूरीची माहिती महानगरपालिकेच्या पुढील सभेमध्ये कळविणे आवश्यक असल्याने" श्री.संजय सिताराम रणदिवे, सर्व्हेअर व श्री.मिलींद जगन्नाथ निकाळजे, अनुरेखक पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी पुणे ४११ ०१८ यांचेवर, भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम ७,१२,१३(१)(ड) सह १३(२) प्रमाणे सक्षम न्यायालयात खटला भरण्यास मंजुरी देण्यात आली असल्याची बाब अवलोकन करणेत येत आहे.

**मा.मंदाकिनी ठाकरे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.निता पाडाळे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ चा विचार दि.२०/०७/२०१५ चे सभेत करणेत यावा अशी सूचना मांडते.

**मा.शुभांगी बो-हाडे** – मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन देते.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक - ६७९ विषय क्रमांक – ८
दिनांक – १३/५/२०१५ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा. क्र.प्रशासन/८/कावि/ १७३/२०१५ दिनांक ४/०४/२०१५

विषय क्रमांक ८ चा विचार दि.२०/०७/२०१५ चे सभेत करणेत यावा.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.अपर्णा डोके -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ६८० विषय क्रमांक – ९

दिनांक – १३/५/२०१५ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र वैद्य/७/कावि/८७१/२०१५ दिनांक ६/४/२०१५

पुणे महानगरपालिकेमार्फत त्यांचे नगरसदस्यांना सीजीएचएस दराने वैद्यकीय सहाय्य म्हणून आर्थिक मदत देण्यात येत आहे. याबाबत पुणे महानगरपालिकेच्या महानगरपालिका सभेमध्ये ठराव क्र. २०० दि. १९/१२/१९६७ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सदर योजनेपोटी प्रत्येक सभासदाकडून रु. २/- इतकी मासिक वर्गणी त्यांचे मानधनातून कपात करणेबाबत मान्यता देण्यात आलेली होती.

त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमधील सन्माननीय नगरसदस्यांकरिता व त्यांचे कुटुंबिय (पती / पत्नी व त्यांचेवर अवलंबून असलेली २१ वर्षाखालील २ अपत्ये) यांचेकरिता र.रु. १० लाख इतक्या रकमेचा आरोग्य विमा उतरविणेबाबत मा.महापालिका सभेमध्ये ठराव क्र. ५४९ दि.१९/०८/२०१४ अन्वये उपसूचनेद्वारे मान्यता देण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने प्रस्तावित करण्यात आलेल्या नस्तीवर मा.आयुक्त सो. यांचेमार्फत कायदा विभाग व मुख्यलेखापरिक्षक यांचे अभिप्राय मागविण्यात आलेले होते. सदर प्रकरणी कायदा सल्लागार यांचेमार्फत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामध्ये स्पष्ट तरतूद नसल्याचे तसेच मुख्यलेखापरिक्षक यांचेमार्फत याकरिता येणा-या खर्चाबाबत व शासनाकडे माजी नगरसेवकांबाबत काही धोरण असल्यास त्याबाबत माहिती घेणेबाबत अभिप्राय देण्यात आलेले आहेत.

त्याअनुषंगाने कक्ष अधिकारी, नगरविकास विभाग यांना दि. २०/०३/२०१५ रोजीचे पत्रान्वये विचारणा करण्यात आलेली आहे. तथापि, नगरविकास विभागाकडून अद्यापपर्यंत मार्गदर्शन प्राप्त झालेले नाही.

तदनंतर दि.३/०४/२०१५ रोजी मा.आयुक्त सो. यांचेसमवेत झालेल्या चर्चेनुसार आजी व माजी नगरसदस्यांकरिता आरोग्य विमा उपलब्ध करुन देणेकरिता निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार आजी व माजी नगरदस्यांकरिता र.रु. १० लाखांऐवजी र.रु. ५ लाख रकमेचा विमा उतरविणेबाबत आदेश दिलेले आहेत. तसेच सर्व नगरदस्य, शिक्षण मंडळ सदस्य व नामनिर्देशित सदस्यांकरिता सदर विमा उतरविण्यात येणार आहे.

याबाबत विमा प्रतिनिधींमार्फत माहिती घेतली असता र.रु. १० लाखांचा विमा उतरविण्याकरिता अंदाजे र.रु. २०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे. त्यानुसार १५० नगरसदस्यांकरिता एकूण ३० लाख रुपयांचा वार्षिक हप्ता विमा अपेक्षीत आहे. त्यामुळे र.रु. ५ लाखांचा विमा उतरविणेकरिता साधारणपणे र.रु.१५ लाख इतका खर्च कंपनीकरिता अदा करावा लागणार आहे. त्यामध्ये १० टक्के रक्कम ही संबंधित नगरसदस्य व उर्वरित ९० टक्के रक्कम महापालिका अदा करणार आहे.

तथापि, नगरसदस्यांकरिता विमा योजना राबविणेकामी उपरोक्त बाबींचे अनुषंगाने मा.महापालिका सभेची खालील बाबींसंदर्भात मान्यता घेणे आवश्यक आहे.

१. आजी व माजी नगरसदस्यांना व त्यांचे कुटुंबियांना म्हणजेच पती / पत्नी व २ अपत्ये यांचेकरिता विमा योजना लागू राहील.
२. सदर योजनेचा लाभ हा सर्व आजी व माजी नगरसदस्य तसेच शिक्षण मंडळ सदस्य व सर्व नामनिर्देशित सदस्यांना देय राहील.
३. विमा हप्त्याचा तपशिल खालीलप्रमाणे
   अ. आजी सदस्यांकरिता प्रत्यक्ष विमा हप्त्याचे १० टक्के हिस्सा हा संबंधित सदस्यामार्फत व ९० टक्के हिस्सा हा महानगरपालिकेमार्फत अदा करण्यात येईल.
   ब. माजी नगरसदस्यांकरिता प्रत्यक्ष विमा हप्त्याचे २५ टक्के हिस्सा हा संबंधित सदस्यामार्फत व ७५ टक्के हिस्सा हा महानगरपालिकेमार्फत अदा करण्यात येईल.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत नगरसदस्यांकरिता विमा योजना राबविणेकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामध्ये स्पष्ट तरतूद असल्याचे दिसून येत नाही. तथापि, अधिनियमातील कलम ६६(४२) नुसार खालीलप्रमाणे तरतूद करण्यात आलेली आहे.

**कलम ६६(४२) -**

सार्वजनिक सुरक्षितता, आरोग्य, सोय किंवा शिक्षण यांचे संवर्धन होण्याचा संभव असेल अशी यात यापूर्वी खास निर्दिष्ट न केलेली कोणतीही उपाययोजना करणे.

उपरोक्त कलमातील तरतुदीनुसार नगरसदस्यांकरिता विमा योजना राबविणेकामी धोरण निश्चित करुन मा.महापालिका सभेमध्ये ठराव पारित झाल्यानंतर त्याबाबत अंमलबजावणी करणे संयुक्तिक ठरेल. तसेच दरवर्षी विमा हप्त्याचे नुतनीकरणापोटी होणारी रक्कम भरण्यासही मान्यता देण्यात यावी.

सबब, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६६(४२) नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील आजी व माजी नगरसदस्यांकरिता विमा धोरण लागू करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.मंदाकिनी ठाकरे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.अपर्णा डोके -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १०वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ६८१ विषय क्रमांक – १०
दिनांक – १३/५/२०१५ विभाग – मा.नगरसचिव

**मा.महिला व बालकल्याण समिती**

अ) दि.२८/१/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ब) दि.११/२/२०१५ व २५/२/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
क) दि.११/३/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.मंदाकिनी ठाकरे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.अपर्णा डोके -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ६८२ विषय क्रमांक – ११
दिनांक – १३/५/२०१५ विभाग – मा.नगरसचिव

**मा.शहर सुधारणा समिती**

अ) दि.१७/१२/२०१४, ७/१/२०१५, २१/१/२०१५, ४/२/२०१५,९/२/२०१५, १८/२/२०१५ व ४/३/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ब) दि.७/१/२०१५, २१/१/२०१५, ४/२/२०१५, ९/२/२०१५, १८/२/२०१५ व ४/३/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
क) दि.१८/२/२०१५ व दि.४/३/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ड) दि.४/३/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.मंदाकिनी ठाकरे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.अपर्णा डोके -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ६८३ विषय क्रमांक – १२
दिनांक – १३/५/२०१५ विभाग – मा.नगरसचिव

**मा.क्रिडा समिती**

अ) दि.१८/२/२०१५ व दि.४/३/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ब) दि. ४/३/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
क) दि.१८/३/२०१५ व दि.२५/३/२०१५ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.मंदाकिनी ठाकरे** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता –

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ६८४ विषय क्रमांक – १३
दिनांक – १३/५/२०१५ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.संअ/१/कावि/३०/२०१५ दि.१८/०४/२०१५

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक शिक्षण विभागांतर्गत संगीत अकादमी निगडी, संत तुकारामनगर संगीत वर्ग, चिंचवड संगीत वर्ग कार्यरत आहेत. या ठिकाणी शहरातील विद्यार्थ्यांना शास्त्रीय संगीताचे दर्जेदार शिक्षण देणेत येते. उदा. तबला, हार्मोनियम, शास्त्रीय गायन, सुगम संगीत इ. सदर विषयाच्या सांगितीक परीक्षांना प्रविष्ठ होण्यासाठी अखील भारतीय गांधर्व महाविद्यालयाचे केंद्र संगीत अकादमी येथे आहे.

मनपा क्षेत्रामध्ये वारकरी संप्रदायामधील अनेक नावाजलेल्या व्यक्ती आहेत. तसेच देहु, आळंदी, टाळगाव चिखली गावामध्ये श्रेष्ठ संताचे वास्तव्य होते आणि बहुतांशी सर्व गावांमध्ये भागवत धर्माचे/वारकरी धर्माचे आचारण करणारी कुटुंबे मोठया प्रमाणात आहेत म्हणून ऐच्छिक शिक्षणाबरोबरच पारंपारिक शिक्षण देण्याची जबाबदारी किंवा आवश्यकता आहे. टाळगाव चिखली हे श्री. जगदगुरू तुकाराम महाराज यांच्या वास्तव्याने पावन झालेली भूमी आहे. त्या परिसरात वारकरी संप्रदायाचे अनेक अनुयायी स्थायिक आहेत. भागवत धर्मामध्ये

वादन, गायन, किर्तन, प्रवचन इ. कला अवगत करण्यासाठी नवीन पिढीला प्रशिक्षण देणे ही काळाची गरज असणार आहे. म्हणुन "संगीत अकादमीच्या" धर्तीवर वारकरी संप्रदायातील सर्व कलागुणांचे जतन, प्रसार व शिक्षण होण्यासाठी संतश्रेष्ठ श्री. तुकाराम महाराज यांचे नावे सोनवणे वस्ती, चिखली रोड, दादासाहेब नातेकर वृद्धाश्रम टाळगाव चिखली येथे संतपीठ सुरू करावयाचे आहे यासाठी जेष्ठ अभ्यासक किर्तनकार व वारकरी शिक्षण संस्था अध्यक्ष या मान्यवरांचे मार्गदर्शन घेण्यात येईल.

सदर अभ्यासक्रम हा ४ वर्षाचा निर्धारीत आहे. शिकविला जाणारा अभ्यासक्रम खालीलप्रमाणे -

प्रथम वर्ष अभ्यासक्रम –

१) व्याकरण मराठी पुस्तक २) संस्कृत भांडारकर पुस्तक पहिले व दुसरे बारा पाठ

२) श्रीमद्भगवतगीता संथा व विष्णुसहस्त्रनाम ४) ज्ञानेश्वरी अध्याय बारावा पूर्ण व नवव्या अध्ययातील ५० ओव्या ५) वारकरी भजन संग्रहातील पहिला भाग पूर्ण पाठांतर

द्वितीय वर्ष अभ्यासक्रम –

१) विचारसागर २) गीता संपूर्ण अन्वय अर्थासह ३) ज्ञानेश्वरीचा नववा अध्याय ओवी ५१ पासून पुढे संपुर्ण ४) भजनसंग्रहातील वाराचे व जन्माचे संपूर्ण अभंग

तृतीय वर्ष अभ्यासक्रम –

१) सार्थ ज्ञानेश्वरी अध्याय २) पंचदशी प्रकरण १ ते ७ ३) ज्ञानेश्वरीतील १५ वा अध्याय ४) भजनसंग्रहातील नाटाचे अभंग

चतुर्थ वर्ष अभ्यासक्रम –

१) सार्थ ज्ञानेश्वरी अध्याय १३ ते १८ २) पंचदशी प्रकरण ८ ते १५ ३) ज्ञानेश्वरी पाचवा व सातवा अध्याय ४) गाथेतील संतपर प्रकरण (पाठांतर) ५) कीर्तन आठवडयातून तीन दिवस

अशाप्रकारे अभ्यासक्रम सुरू करता येईल. सदर अभ्यासक्रम शिकविण्यासाठी खालीलप्रमाणे पदनिर्मिती करणे आवश्यक आहे.

१) मानद सल्लागार – १ पद
२) प्रवचनकार – २ पद
३) कीतर्नकार - २ पद
४) तबला वादक - २ पद
५) पखवाज वादक - २ पद
६) हार्मोनियम वादक - २ पद
७) मुख्य लिपिक – १ पद
८) लिपिक - १ पद
९) शिपाई - २ पद
१०) सफाई कामगार – २ पद

"जगदगुरु संत तुकाराम महाराज संतपीठ" सल्लागार समिती खालीलप्रमाणे

१) मा. महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८.
२) मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८.
३) मा. अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८.
४) मा. स्थायी समिती अध्यक्ष, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८.
५) मा. शिक्षणाधिकारी, माध्यमिक पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८.
६) डॉ. सदानंद मोरे, संत साहित्य गाढे अभ्यासक
७) मारुती महाराज कुरेकर, वारकरी शिक्षण संस्था अध्यक्ष
८) बंडातात्या कराडकर, कीर्तनकार
९) जगदगुरू साखरे महाराज, कीर्तनकार
१०) डॉ. देखणे प्रवचनकार

वरीलप्रमाणे सल्लागार समिती गठित करून सदर अभ्यासक्रमामध्ये बदल करावयाचे झाल्यास सदरचे अधिकार सल्लागार समितीस राहतील. तसेच इमारत बांधकामाबाबत मा. कार्यकारी अभियंता व पद भरणेबाबत प्रशासन विभागाने कार्यवाही करावी.

"जगदगुरु संत तुकाराम महाराज संतपीठ" स्थापन करणेकामी वरील सर्व बाबींना मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक – १४

दिनांक – १३/५/२०१५ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.भूजि/७/कावि/१४/२०१५ दि.१५/४/२०१५

पुणे महानगर परिवहन महामंडळाकडे सद्यस्थितीत १४५० बसेस व भाडेतत्वावरील ६६२ बसेस अशा मिळून एकूण २११२ बसेस आहेत. यासाठी महामंडळाकडे पुणे हद्दीत ७ डेपो व पिंपरी चिंचवड हद्दीत ३ डेपो असे+मिळून एकूण १० डेपो आहेत. बस संख्येच्या प्रमाणात जागा

उपलब्ध नसल्याने सद्यस्थितीत महामंडळाच्या शेकडो बसेसचे पार्किंग रस्त्यावर करण्यात येते. भविष्यामध्ये जे.एन.यु.आर.एम. अंतर्गत ५०० नविन बसेस परिवहन महामंडळास प्राप्त होणार आहेत. सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून सर्व बसेसचे पार्किंग संरक्षित जागेत होणे आवश्यक आहे. तरी सदर बसेसचे अंतर्गत पार्कींग व देखभाल दुरुस्तीसाठी महामंडळास जागेची अत्यंत आवश्यकता आहे व त्यासाठी मनपा हद्दीतील रिकाम्या झालेल्या विविध जकात नाक्यांच्या जागा बस डेपो/बसस्थानकाचे वापरासाठी मिळणेस परिवहन महामंडळाने विनंती केलेली आहे व अशा १० जकात नाक्यांच्या जागेंची यादी त्यांनी दिलेली आहे.

तथापी यापूर्वी मनपा हद्दीतील बस टर्मिनससाठी आरक्षित असलेल्या एकूण ४ जागा आदेश क्रं.भूजि/सर्व्हे-२/कावि/१७०/१४ दि.३/२/१४ अन्वये परिवहन महामंडळास सदर जागांची असणारी तातडी लक्षात घेता तात्पुरत्या स्वरुपात देणेत आल्या आहेत.

पि.चि.म.न.पा. हद्दीतील एकूण १० जकात नाक्यांच्या संपूर्ण जागा ताब्यात मिळणेबाबत परिवहन महामंडळाने विनंती केली आहे. सदर जकात नाक्यांचे जागांचा ताबा दि. ८/४/१५ रोजी एल.बी.टी. (जकात) विभागाकडून या विभागांस प्राप्त झाला आहे. सदर मागणी केलेल्या १० जकात नाक्यापैकी एकूण ३ जागा परिवहन महामंडळास देता येणे शक्य आहे. याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे –

| अ.क्रं. | गावाचे/जकात नाक्याचे नाव | प्रयोजन | स.नं. | क्षेत्र (हे.आर.) | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | निगडी | | से.क्रं.२२ | १.०० | प्राधिकरणाकडून ताबा |
| २ | च-होली | | ९९३ पै. | ०.४३ | T.D.R. ने ताबा |
| ३ | डुडुळगाव | | ५० पै. | ०.४० | ताबा आहे. |
| | | | एकूण क्षेत्र | १.८३ हे. | |

सदर जागा परिवहन महामंडळास देणेबाबतची तातडी पाहता, सद्यस्थितीत उपरोक्त नमूद केलेप्रमाणे मनपाच्या एकूण ३ जकात नाक्यांच्या जागा कायदा, नगररचना विभाग यांचे अभिप्राय/अटी-शर्तीस अधिन राहून पुणे महानगर परिवहन महानगर लि. यांस बसडेपो/बसस्थानकाचे वापरासाठी तात्पुरत्या स्वरुपात देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर** – मा.महापौर साहेब, सदर ठरावाला अनुमोदन आहे.

**मा.निता पाडाळे** – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मांडते.

**मा.शुभांगी बो-हाडे** – मा.महापौर साहेब, सदर सूचनेला अनुमोदन देते.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता –

ठराव क्रमांक - ६८५ | विषय क्रमांक – १४
दिनांक – १३/५/२०१५ | विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.भूजि/७/कावि/१४/२०१५ दि.१५/४/२०१५

विषय क्रमांक १४ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.महापौर -** सर्वांचे आभार मानून आजची सभा संपली असे जाहीर करणेत येत आहे.

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक – नस/१०/कावि/६०/२०१५
दिनांक – ०४/०६/२०१५

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.